
नोव्हेंबर २०२२/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## चला जाणूया नदीला...

# बा...विठ्ठला

## शेतकरी, कष्टकरी वर्गाला सुजलाम सुफलाम कर !



गोरगरीब जनता, कष्टकरी व शेतकऱ्यांवर येणारी संकटे दूर होऊन तो सुजलाम् सुफलाम् व्हावा, यासाठी शक्ती आणि आशीर्वाद द्यावा, असे साकडे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्तिकी एकादशीनिमित्त आयोजित शासकीय महापुजेच्याप्रसंगी श्री विठ्ठलाच्या चरणी घातले.

श्री विठ्ठल-रुक्मिणीची कार्तिकी एकादशीनिमित्त शासकीय महापूजा उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस व सौ. अमृता फडणवीस यांच्या हस्ते पंढरपूर येथे पार पडली. या वेळी शिरोडी खुर्द (ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद) येथील उत्तमराव साळुंखे आणि कलावती साळुंखे हे दांपत्य मानाचे वारकरी ठरले. त्यांचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अमृता फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी महसूलमंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ. तानाजी सावंत, आमदार हरिभाऊ बागडे, बबनराव पाचपुते, सुभाष देशमुख, रणजितसिंह मोहिते-पाटील, समाधान आवताडे, सचिन कल्याणशेट्टी, पृथ्वीराज देशमुख, सुनील कांबळे, गोपीचंद पडळकर, राणा जगजितसिंह पाटील, जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर, अप्पर जिल्हाधिकारी तथा मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी संजीव जाधव, श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे सदस्य उपस्थित होते.

## ६ नद्यांची परिक्रमा

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त ७५ नद्यांच्या परिक्रमेचा शुभारंभ राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी झाला. नद्या समजून घ्याव्यात, त्यासाठी आवश्यक असणारी जनजागृती आणि प्रबोधन करण्यासाठी 'चला जाणूया नदीला' हे अभियान सुरू करण्यात आले आहे.

## १० अमृतवाहिनी होण्यासाठी..

महाराष्ट्र शासनाने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने राज्यभरात सुमारे ७५ नद्यांवर, नदी संवाद यात्रा 'चला जाणूया नदीला' या नावाने सुरू केली आहे. नदीचा अभ्यास करून त्यांचे निष्कर्ष आणि अहवाल शासनास प्राप्त होतील. शासन आणि समाजाने एकत्र येऊन काम करावे आणि नद्यांना अमृतवाहिनी बनवण्यासाठी प्रयत्न करावेत.

## १६ प्रत्येकासाठी पाणी!

पाणी हा प्रत्येकासाठीच एक अत्यावश्यक असा घटक आहे. मात्र प्रतिमाणसी पाण्याची उपलब्धतता दिवसेंदिवस कमी होत आहे. महाराष्ट्र शासनाने एक सुनियोजित व्यवस्थापनाची जलनीती तयार करून, जलआराखडाही तयार केलेला आहे.

## १९ भूशास्त्रीयरचना व नद्या

भूशास्त्रीय दृष्टिकोनातून पाणी योग्य जागी 'मुरवणे' (जिरवणे) व मोठ्या प्रमाणात योग्य जागी, गावोगावी 'पाणी साठवणे' या दोन तंत्रांची खूप गरज आहे. उपलब्ध पाणीसाठा जमिनीत योग्य पद्धतीने मुरण्यासाठी पाणलोट क्षेत्रांची भूस्तरीय रचना कोठे आणि किती अनुकूल आहे, याची तपशीलवार क्षेत्रीय पाहणी करायला हवी आणि तशा योजना तयार कराव्या लागतील.



## २२ कोकणातील नद्या

इतर ठिकाणच्या नद्या हजार दोन हजार किलोमीटरच्या प्रवासात कठीण कातळाला भरडून रगडून गोटे, वाळू किंवा चिखलात परिवर्तित करतात. हेच काम कोकणातील नद्या फक्त पन्नास शंभर किलोमीटर लांबीत करतात. त्यांची क्षमता इतर नद्यांच्या तुलनेत दहा ते वीस पट जास्त आहे.

## २८ नदी : जीवनदायी परिसंस्था

समृद्ध अन्नसाखळी असलेल्या भुरूपात सौरऊर्जेच्या वापरातून भौगोलिक आणि जैविक घटकांत देवाण-घेवाण चालू असते. यालाच परिसंस्था म्हणतात. नदीच्या निर्जीव आणि सजीव घटकातून ऊर्जा आणि पदार्थांची देवाणघेवाण चालू असते. या विनिमयातून पर्यावरणीय सेवा म्हणजे 'इकॉलॉजिकल सर्व्हिसेस' मिळतात. अशा प्रकारच्या अन्योन्यक्रियेत गुंतलेल्या सर्वांच्या योगदानातून सशक्त परिसंस्था बनते.

## ३२ नद्यांशी संवाद

राज्याला पूर, दुष्काळ आणि प्रदूषण मुक्त करणे ही केवळ राज्य शासनाची अथवा केंद्र शासनाची एकट्याची जबाबदारी नव्हे ही संपूर्ण समाजाची जबाबदारी ठरते. समाज आणि शासन या दोघांनी एकत्रपणे आणि समविचाराने काम करणे अपरिहार्य ठरते. म्हणून 'चला जाणूया नदीला' हे अभियान सार्थ ठरवण्यासाठी आपण सर्वांनी सहभागी होवू या...

## ३६ वर्षाचक्र आणि पीकचक्र

मागील काही वर्षात पाहिले तर नेमका पीक काढणीस तयार असताना येणारा पाऊस आणि होणारे नुकसान सातत्याने दिसत आहे. आपल्याला व आपल्या शेतीला हवामान बदलाच्या चक्राबरोबर फिरत राहण्यासाठी आपल्या पिकचक्रात काय बदल करता येतो का ते पाहिले पाहिजे.


| | | | |
|---|---|---|---|
| नद्यांची परिक्रमा | ६ | नदी : जीवनदायी परिसंस्था | २८ |
| अमृतवाहिनी होण्यासाठी... | १० | नद्यांशी संवाद | ३२ |
| नदी संवाद यात्रा | १३ | वर्षाचक्र आणि पीकचक्र | ३६ |
| नद्यांचे पुनरुज्जीवन | १५ | नद्या आणि भूजल | ३९ |
| प्रत्येकासाठी पाणी! | १६ | चळवळीचा शुभारंभ | ४१ |
| भूशास्त्रीयरचना व नद्या | १९ | पाऊल पडते पुढे | ४३–५२ |
| कोकणातील नद्या | २२ | मंत्रिमंडळात ठरले! | ५३–५७ |
| गोष्ट एका नदीची | २५ | पेन्शन तुमच्या दारी | ५८ |

वर्ष ७४ वे | अंक २ | नोव्हेंबर २०२२

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,**
**महाराष्ट्र शासन**

लोकराज्य

- मुख्य संपादक — जयश्री भोज
- प्रबंध संपादक — हेमराज बागुल, गणेश रामदासी
- संपादक — अनिल आलूरकर
- सहसंपादक — अश्विनी पुजारी, गजानन पाटील
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, तळोजा एमआयडीसी, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# कार्यमान प्रतवारी निर्देशांकात राज्याची पहिल्या क्रमांकावर झेप

**केंद्रीय** शिक्षण मंत्रालयाच्या कार्यमान प्रतवारी निर्देशांकात एकूण एक हजार गुणांकनापैकी ९२८ गुण मिळवून महाराष्ट्राने देशात प्रथम क्रमांक पटकावला आहे. २०१९ च्या तुलनेत २०२०-२१ मध्ये ५९ गुणांची वाढ झाली असून भौतिक संसाधने व सुविधा आणि शासकीय प्रक्रिया या दोन क्षेत्रामध्ये सर्वाधिक वाढ झाली आहे. शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी या कामगिरीबद्दल राज्यातील शिक्षण प्रणालीतील सर्व संबंधितांचे अभिनंदन केले असून, पुढील काळात आपले राज्य गुणांकनामध्ये आणखी सुधारणा करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.



कार्यमान प्रतवारी निर्देशांक शालेय शिक्षणाची जिल्हा पातळीवरील कामगिरीचे मूल्यांकन करते. शालेय शिक्षणाच्या क्षेत्रात बदल घडवून आणण्यासाठी राज्ये / केंद्रशासित प्रदेशांची कामगिरी एकसमान प्रमाणात मोजण्यासाठी हा निर्देशांक मदत करतो. शालेय शिक्षण आणि साक्षरता विभागाने आतापर्यंत राज्य/ केंद्रशासित प्रदेशांसाठी म्हणजे २०१७-१८ ते २०१९-२० या वर्षांसाठी ३ निर्देशांक अहवाल प्रसिद्ध केले आहेत. निर्देशांक अंतर्गत दोन प्रमुख विभागांतर्गत ५ क्षेत्रे व ७० निदर्शक आहेत. या निर्देशांकाची रचना कार्यक्षम, समावेशक आणि न्याय शालेय शिक्षण प्रणाली निर्मिती करण्यासाठी करण्यात आलेली आहे. या निर्देशांक संरचनेत एकूण एक हजार गुणांतर्गत ७० निर्देशक समाविष्ट आहेत, जे दोन श्रेणींमध्ये निष्पत्ती तसेच प्रशासन आणि व्यवस्थापन अंतर्गत गटबद्ध आहेत. या श्रेण्या अध्ययन निष्पत्ती, प्रवेश, पायाभूत सुविधा, समता आणि शासकीय प्रक्रिया या पाच क्षेत्रांमध्ये विभागल्या आहेत. मागील वर्षांमध्ये राज्य कार्यमान प्रतवारी निर्देशांकाच्या समान दृष्टिकोनाचा अवलंब करून राज्ये/ केंद्रशासित प्रदेशांना श्रेणीबद्ध केले जाते.

**क्षेत्रनिहाय महाराष्ट्राच्या गुणांकनाची तुलना पुढीलप्रमाणे :** अध्ययन निष्पत्ती आणि गुणवत्ता श्रेणीमध्ये २०१९-२०च्या १४४ गुणांकनाच्या तुलनेत २०२०-२० मध्ये कोणताही बदल नाही. शाळा प्रवेश व निष्पत्ती या श्रेणीमध्ये २०१९-२० च्या ७६ गुणांकनाच्या तुलनेत २०२०-२१ मध्ये बदल नाही. भौतिक संसाधने व सुविधा या श्रेणीमध्ये २०१९-२० च्या १२६ गुणांकनाच्या तुलनेत २०२०-२१ मध्ये १७ गुणांकनाची वाढ झाली असून ते १४३ झाले आहे. समता या श्रेणीमध्ये २२४ च्या तुलनेत एका गुणाची वाढ होऊन २०२०-२१ मध्ये २२५ गुण झाले आहेत, तर शासकीय प्रक्रिया या श्रेणीमध्ये २०१९-२० च्या २९९ गुणांच्या तुलनेत ४१ गुणांची वाढ होऊन २०२०-२१ या वर्षी ते ३४० झाले असल्याची माहिती केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या वतीने एका अहवालात देण्यात आली आहे.

पंजाब आणि केरळ राज्यांनी देखील ९२८ गुणांकन प्राप्त करून महाराष्ट्रासह संयुक्त प्रथम स्थान प्राप्त केले आहे.

# नद्यांचे संवर्धन आणि संरक्षण

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त राज्य शासनाने 'चला जाणूया नदीला' या शीर्षकाखाली लोकसहभागातून 'नदी संवाद' यात्रा हा उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. यानिमित्ताने महाराष्ट्र राज्यातील ७५ नद्यांच्या परिक्रमेचे आयोजन केले आहे. २०१९ मध्ये राज्य शासनाने जलनीती धोरण हाती घेतले होते. या अनुषंगाने राज्यातील प्रत्येकी नदी खोरे, पाणलोट खोरेनिहाय क्षेत्रांचे नियोजन केले होते. 'चला जाणूया नदीला' या उपक्रमात जास्तीत जास्त लोकसहभाग मिळवण्याचा आणि हा उपक्रम यशस्वी करण्याचा अधिक प्रयत्न केला जाणार आहे.

राज्यात नद्यांच्या संवर्धन आणि संरक्षणासाठी राज्य सरकार विशेषत्वाने प्रयत्न करत आहे. महाराष्ट्राला नद्यांची आणि त्यांच्या अनुषंगाने मोठी नैसर्गिक संपत्ती लाभली आहे. त्यामुळे येथे जैवविविधताही मोठ्या प्रमाणात आहे. राज्य शासन या जैवविविधतेच्या जतनासाठी आवश्यक ती पावले टाकत आहे. नद्या आणि मानव यांच्यातील परस्परसंबंध जतन करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. 'चला जाणूया नदीला' या उपक्रमामध्ये नद्यांचे संरक्षण आणि संवर्धन याबरोबरच जलसंधारण आणि जलसाक्षरता या दोन्ही संकल्पनांची सांगड घालणारे महाराष्ट्र राज्य हे देशातील एकमेव राज्य ठरले आहे. राज्यातील नद्यांना अमृतवाहिनी बनवण्याचा राज्य सरकारने घेतलेला निर्णय वैशिष्ट्यपूर्ण आणि दूरगामी परिणाम करणारा आहे. एकूणच नद्यांच्या माध्यमातून जनजागृती आणि समाज प्रबोधन करण्याचा प्रयत्न या उपक्रमाद्वारे केला जात आहे, ही अत्यंत आनंदाची बाब आहे.



राज्यातील काही भागातील जनतेस दुष्काळ आणि महापूर या समस्यांना दरवर्षी तोंड द्यावे लागते. राज्यातील अनेक भागात अतिवृष्टी होऊन शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते, तर अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होते. पाण्याच्या उपलब्धतेपेक्षा मागणी जास्त असल्यामुळे भूभागावर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. त्यामुळे शेती, उद्योग व्यवसायाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. राज्यातील जनतेला दुष्काळ, महापूर या समस्येपासून मुक्त करायचे असेल, तर ठोस उपाययोजना कराव्या लागणार आहे. यासाठी लोकसहभाग, जनजागृती, नद्यांविषयीचा प्रसार आणि प्रचार होणे आवश्यक आहे.

वीज निर्मितीमध्येदेखील नद्यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. डोंगराळ भागातील धरणांमध्ये हायड्रो-इलेक्ट्रिसिटीचे उत्पादन घेतले जाते. देशातील सुमारे १२ टक्के म्हणजे ४५ हजार मॅगावॅट वीज निर्मिती ही निव्वळ जलस्रोतातून होते. 'चला जाणूया नदीला' या उपक्रमांतर्गत राज्यातील ७५ नद्यांचा समावेश केला आहे. नद्या प्रदूषणमुक्त करण्याची जबाबदारी फक्त शासनाची नाही, तर पर्यायाने ती आपली म्हणजेच प्रत्येक नागरिकाची आहे.

'लोकराज्य'च्या विशेषांकामध्ये राज्यात राबवण्यात येत असलेल्या 'चला जाणूया नदीला' या उपक्रमासंदर्भात विशेष लेखांचा समावेश केला आहे. राज्यातील नद्यांचे संवर्धन करणे, नद्या समजून घेणे, नद्यांची जपणूक कशी करावी, पावसाचे पाणी मुरवणे जिरवणे, तसेच भूशास्त्रीयरचना व नद्या, वर्षाचक्र आणि पीकचक्र, नद्यांशी संवाद इत्यादी मुद्दे केंद्रस्थानी ठेवले आहेत. याबरोबरच नद्यांच्या अनुषंगाने राज्य सरकार करत असलेल्या उपाययोजनांची माहितीही लेखांमध्ये देण्यात आली आहे.

हा विशेषांक नदी आणि पाण्याविषयी सर्वसामान्य वाचकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरावा, असा प्रयत्न करण्यात आला आहे.

'नदीचे मूल्य जाणूया आणि तिचे जतन करूया' हा संदेश प्रत्येक नागरिकांनी ध्यानात ठेवून राज्य शासनाने हाती घेतलेला हा उपक्रम आपण सर्वांनी एकत्र येऊन यशस्वी करूया.

**जयश्री भोज**
(मुख्य संपादक)

# नद्यांची परिक्रमा

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त ७५ नद्यांच्या परिक्रमेचा शुभारंभ राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी झाला. नद्या समजून घ्याव्यात, त्यासाठी आवश्यक असणारी जनजागृती आणि प्रबोधन करण्यासाठी ‘चला जाणूया नदीला’ हे अभियान सुरू करण्यात आले आहे. ही नदी परिक्रमा नेमकी कशी असेल, याचा उद्देश काय असेल याविषयी हा लेख.

**सुधीर मुनगंटीवार**
मंत्री, सांस्कृतिक कार्य, वने, मत्स्यव्यवसाय

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विविध अभियानाचे आयोजन राज्यभरात करण्यात येत आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्ताने वर्धा येथे ‘राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा’ समारोप, ‘हॅलो’ ऐवजी ‘वंदे मातरम्’ अभियानाचा शुभारंभ, वर्धा जिल्हाधिकारी कार्यालय आणि नियोजन भवनाचे उद्‌घाटन याबरोबरच ७५ नद्यांच्या परिक्रमेचा शुभारंभ झाला. या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, मॅगसेसे पुरस्कार विजेते आणि जलबिरादरीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजेंद्र सिंग उपस्थित होते.

## नदी परिक्रमा उपक्रम

जगातील सर्व संस्कृती नदीच्या काठावरच निर्माण झाल्या आणि बहरल्या. जेव्हा या नद्या नष्ट झाल्या, तेव्हा संस्कृती नष्ट झाल्या. सर्वांनी नद्यांचे माहात्म्य जाणून घ्यावे. ती आपली माता आहे ती वाचली तरच आपण वाचणार आहोत. त्यामुळे या भावनेने साऱ्या नद्या समजून घ्याव्यात. त्यासाठी आवश्यक असणारी जनजागृती आणि प्रबोधन करण्यासाठी तसेच या नद्या प्रवाही, स्वच्छ आणि अतिक्रमणमुक्त करण्यासाठी सुरू करण्यात आलेला ७५ नद्यांच्या परिक्रमेचा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. या उपक्रमामुळे नद्यांशी असलेले आपले नाते पुनरुज्जीवित होण्यास मदत होणार आहे. जलसंधारण आणि जलसाक्षरता या दोन्ही संकल्पनांची सांगड घालणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. आजच्या काळात पाणी हेच अमृत आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त आयोजित ७५ नद्यांची परिक्रमा हा राज्यातील नद्या अमृतवाहिनी करण्याचा उपक्रम आहे. त्या माध्यमातून नदी जाणून घेण्याचा प्रयत्न होणार आहे. अतिक्रमण, अस्वच्छतेसारख्या विविध प्रकारच्या समस्यांपासून आता नद्यांनाही स्वातंत्र्य हवे आहे. त्यासाठी असे प्रयत्न महत्त्वाचे आहेत.



‘चला जाणूया नदीला’ अभियानांतर्गत राज्यातील ७५ नद्यांची परिक्रमा मोहिमेत सहभागी चमूंना मंगलकलश आणि तिरंगा सुपूर्द करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी मान्यवर.

## लोकसहभाग महत्त्वाचा



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त २ ऑक्टोबरला प्रारंभ झालेल्या 'चला जाणूया नदीला' अभियानांतर्गत 'नदी संवाद यात्रा' राज्यभर वेग घेत आहे. या अभियानाचे यश लोकसहभागात आहे. लोकसहभागातून हे अभियान निश्चित यशस्वी होईल, यासाठी जास्तीत जास्त नागरिकांनी या आभियानात सहभाग घ्यावा, असे मी आवाहन करतो.

राज्यातील नद्या अमृतवाहिनी करण्याचा हा उपक्रम आहे. त्या माध्यमातून नदी जाणून घेण्याचा प्रयत्न होणार आहे. अतिक्रमण, अस्वच्छतेसारख्या विविध प्रकारच्या समस्यांपासून आता नद्यांनाही स्वातंत्र्य हवे आहे. त्यासाठी असे प्रयत्न महत्त्वाचे आहेत. या संदर्भात राज्य सरकारने घेतलेला निर्णय अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. उत्सवांना लोककल्याणकारी योजनांशी जोडण्याचा हा एक प्रयत्न आहे. महाराष्ट्रातील नद्यांचे आरोग्य चांगले राहिले तरच आपले आरोग्य चांगले राहणार आहे आणि हेच ओळखून गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा, पश्चिम वाहिन्यांच्या खोऱ्यातील ७५ नद्यांचे संवर्धन करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. या अभियानात लोकसहभाग मिळाला तरच हा महोत्सव यशस्वी होणार आहे.

**- एकनाथ शिंदे, मुख्यमंत्री**

या संदर्भात राज्य सरकारने घेतलेला निर्णय अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. उत्सवांना लोककल्याणकारी योजनांशी जोडण्याचा हा एक प्रयत्न आहे.

## नद्यांचे संवर्धन

महाराष्ट्रातील नद्यांचे आरोग्य चांगले राहिले तरच आपले आरोग्य चांगले राहणार आहे आणि हेच ओळखून महाराष्ट्रातील गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा, पश्चिम वाहिन्यांच्या खोऱ्यांतील एकूण ७५ नद्यांचे संवर्धन करण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. वर्धा येथील सेवाग्राममध्ये 'चला जाणूया नदीला' या महोत्सवाचेदेखील आयोजन करण्यात आले आहे. राज्यातील ७५ नद्यांचे संवर्धन करीत असाताना राज्यातील नद्यांची सद्य:स्थिती नेमकी काय आहे. तसेच नदी संवर्धन करताना काय करणे आवश्यक आहे, याची दिशा मिळण्यास या महोत्सवाच्या माध्यमातून मदत होणार आहे. या राज्य शासनाच्या उपक्रमात लोकसहभाग मिळाला तरच हा महोत्सव यशस्वी होणार आहे.

## समिती गठित

या अभियानाचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली असून याबाबतचा शासन निर्णय पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाने निर्गमित केला आहे. गठित करण्यात आलेल्या समितीत मुख्य सचिव हे अध्यक्ष असतील. महसूल विभागाचे आणि ग्राम विकास विभागाचे अपर मुख्य सचिव हे सदस्य असतील. वने विभागाचे प्रधान सचिव या समितीचे कार्याध्यक्ष असतील. जलसंपदा, जलसंधारण, कृषी, शालेय शिक्षण, नगरविकास -२, पर्यावरण, उद्योग, पशुसंवर्धन, मत्स्यव्यवसाय, पाणीपुरवठा व स्वच्छता या विभागाचे प्रधान सचिव या समितीमध्ये सदस्य असतील. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक, महाराष्ट्र जैवविविधता मंडळ, नागपूर, पुण्याचे प्रधान मुख्य वन संरक्षक, सांस्कृतिक कार्याचे सचिव आणि जल व भूमी व्यवस्थापन संस्था अर्थात वाल्मी या समितीत सदस्य असणार आहेत. याशिवाय या समितीमध्ये अशासकीय सदस्य असणार आहेत. डॉ. राजेंद्र सिंग विशेष निमंत्रित म्हणून असणार आहेत, तर डॉ. सुमंत पांडे, नरेंद्र चौघ, जयाजी पाईकराव, रमाकांत कुलकर्णी, डॉ. गुरूदास नुलकर, अनिकेत लौयीया, राजेश पंडित, महेंद्र महाजन या समितीचे सदस्य असणार आहेत, तर सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक या समितीचे सदस्य सचिव असतील. या समितीचा कार्यकाळ एक वर्ष अथवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत असेल.





## पूर आणि दुष्काळ मुक्तीसाठी

राज्याला वारंवार भेडसावणाऱ्या पूर आणि दुष्काळ या समस्यांच्या मुक्तीसाठी नदी संवाद अभियानाचे आयोजन करणे, अभियानांतर्गत जनसामान्यांना नदीसाक्षर करण्याबाबत उपाययोजना आखणे, त्याची अंमलबजावणी करणे, अमृतवाहिनी बनवण्यासाठी मसुदा तयार करणे, नदीचे स्वास्थ्य आणि मानवी आरोग्य याबाबत प्रचार व प्रसार रूपरेषा आखणे, नदीचा तट प्रवाह परिसरातील जैवविविधतेबाबत प्रत्येक जिल्ह्यात प्रचार, प्रसार व नियोजन करणे, नदीच्या पाणलोट क्षेत्राचा अभ्यास करून त्यावर संबंधितांना कार्यवाहीसाठी अहवाल सादर करणे, पावसाचे पाणी अडवून भूजल स्तर उंचावणे, अतिक्रमण तसेच शोषण आणि प्रदूषण या तीन कारणांचा अभ्यास आणि त्याचा नदी व मानवी जीवनावर होणार परिणाम अभ्यासणे, महाराष्ट्रातील सुमारे ७५ नदी खोऱ्यांतून नदी संवाद यात्रा आयोजित करण्याबाबत आराखडा तयार करणे, शासनाबरोबर समाज आणि नदीवर काम करणाऱ्या संस्थांमध्ये सुसूत्रता आणणे, स्थानिक स्वराज्य संस्था यांचे जलव्यवस्थापन तपासणे अशी या समितीची ध्येये आणि उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

## नदी संरक्षण आणि संवर्धन

राज्यातील ७५ नद्यांचे संवर्धन करताना जलबिरादरी संस्थेच्या विशेष नैपुण्याची मदत घेतली आहे, तर राज्य शासनाचे जलसंपदा, जलसंधारण, वन इत्यादी विभाग यामध्ये जोडले आहेत.

नदी संरक्षण आणि संवर्धनासाठी सांस्कृतिक कार्य विभाग काम करणार असून सांस्कृतिक कार्य विभागामार्फत महाराष्ट्रातील ७५ नद्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यातील एक नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती केली जाणार आहे. हे नोडल अधिकारी संबंधित नदीच्या विकासासाठी, पुनरुज्जीवनासाठी काम करतील.

## लोकसहभाग आवश्यक

भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत असताना महाराष्ट्रात नदी महोत्सव आयोजित करणे. तसेच ७५ नद्यांचे पुनरुज्जीवन केले जाणे ही बाब अत्यंत आनंदाची आहे.

राज्य शासनाच्या या मोहिमेत जलबिरादरीचा पूर्ण पाठिंबा असून आपल्या सर्वांसाठी नद्यांचे प्रदूषण थांबवणे, त्यांचे संरक्षण आणि संवर्धन करणे याला महत्त्व असणार आहे. केवळ निधी देऊन नद्या

## जिल्हानिहाय समिती गठित

'चला जाणूया नदीला' या अभियानाचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक जिल्ह्यातून वाहणाऱ्या निवडक नद्यांबाबतची माहिती, तिचा प्रचार-प्रसार आणि त्यानुषंगिक बाबींसाठी साहाय्य करण्याकरिता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हानिहाय समित्या गठित करण्यात आल्या आहेत. जलसंपदा विभागातील सिंचन व्यवस्थापनाचे अधीक्षक अभियंता समितीत सहसदस्य सचिव असतील, तर जिल्हा वनसंरक्षक सदस्य सचिव असतील. समितीचा महत्त्वाचा दुवा हे संबंधित जिल्हाधिकारी असतील.

यात्रेदरम्यान २ ऑक्टोबर २०२२ ते २६ जानेवारी २०२३ या कालावधीमध्ये राज्यभरातील किमान ७५ नद्यांपर्यंत यात्रा पोहोचणार आहे. ३० नोव्हेंबर २०२२ पर्यंत यात्रेचा / अभ्यासाचा पहिला टप्पा पूर्ण करण्यात येणार असून १ डिसेंबर २०२२ पासून ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत यात्रेचा दुसरा टप्पा असेल. या अभ्यासावर आधारित लोकशिक्षणाचा आणि प्रबोधनाचा कार्यक्रम नियोजित होईल व १ जानेवारी २०२३ ते २० जानेवारी २०२३ या काळात अहवालास अंतिम स्वरूप दिले जाईल.


## भविष्यासाठी नदीला जोपासूया !



भारतीय संस्कृतीत नदीला माता मानले आहे. जगभरातील संस्कृती आणि सभ्यता नदीच्या काठावरच विकसित झाल्या आहेत. परंतु प्रचंड लोकसंख्या, वाढते शहरीकरण, नदीत थेट टाकला जाणारा कचरा आदी कारणांमुळे नद्या प्रदूषित झाल्या आहेत. नद्यांची हीच दुरवस्था कायम राहिली, तर त्याचे भयंकर दुष्परिणाम संपूर्ण मानवजातीला भोगावे लागणार आहेत.

नद्यांना त्यांचे गतवैभव पुन्हा प्राप्त करून देण्यासाठी केंद्र व राज्य शासन विविध उपक्रम राबवत आहे. जनजागृती, नदी किनाऱ्यावरील अतिक्रमणे तसेच नदीतील कचरा व गाळ काढून नद्यांचे प्रदूषण कमी केले जात आहे. यामुळे नदीच्या पाणलोट क्षेत्रात भूगर्भातील पाणीपातळीत वाढ होत आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त ७५ नद्यांची परिक्रमा हा उपक्रम सुरू करण्यात आला असून, त्यामध्ये अधिकाधिक नागरिकांनी सहभागी होऊन नदीचे महत्त्व जाणून घ्यायला हवे. त्याचबरोबर नदी प्रदूषित करणार नाही आणि करूही देणार नाही, अशी शपथ घेऊ या.

**- देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री**



स्वच्छ होणार नाहीत, तर यासाठी आपला नदीशी व्यवहार कसा आहे, आपले संस्कार काय आहेत आणि आपली आत्मदृष्टी यामध्ये परिवर्तन होणे आवश्यक आहे, तरच नदी स्वच्छ होईल. नदीला समजून घेताना नदीवर प्रेम करणे आवश्यक आहे. जसे नदी संवर्धन करण्यासाठी निधीचे नियोजन किंवा आराखडा आवश्यक आहे, त्याचप्रमाणे नदी संवर्धन कामाला लोकसहभागाची जोड मिळायला हवी. मुळातच नदी यात्रा किंवा नदी परिक्रमा आयोजित करण्यामागचा मुख्य उद्देश हा राज्यातील नद्यांच्या सद्य:परिस्थितीची माहिती घेणे हा आहे.

## अभियानाचे उद्दिष्ट

या अभियानाचे उद्दिष्ट प्रामुख्याने जनसामान्यांना नदीसाक्षर करण्याबाबत उपाययोजना आखणे, नागरिकांच्या सहकार्याने नद्यांचा सर्वंकष अभ्यास करणे व त्याबाबतचा प्रचार व प्रसार करणे असणार आहे. तसेच नदीला अमृतवाहिनी बनवण्यासाठी कार्यक्रमाचा मसुदा तयार करणे, नदीचे स्वास्थ्य आणि मानवी आरोग्य याबाबत प्रचार व प्रसार रूपरेषा आखणे, नदीचा तट, प्रवाह आणि परिसरातील जैवविविधतेबाबत प्रत्येक जिल्ह्यात प्रचार प्रसार याबाबत नियोजन करणे, नदी खोऱ्यांचे नकाशे, नदीची पूर रेषा व पाणलोट क्षेत्रांचे नकाशे, मातीचे क्षरण, पर्जन्याच्या नोंदी, मागील पाच वर्षांतील पूर आणि दुष्काळाच्या नोंदी याबाबतची माहिती संकलित करणे, पावसाचे पाणी योग्य जागी अडवून भूजल स्तर उंचावणे यावर भर असेल. याचबरोबर अभियानाबाबत जनजागृती करणे,अतिक्रमण, शोषण आणि प्रदूषण या तीन प्रमुख कारणांचा अभ्यास व त्याचा परिणाम अभ्यासणे, नदी संवाद यात्रा आयोजित करण्याबाबत आराखडा तयार करून अंमलबजावणी करणे ही कामेही या समित्या करतील. नदी, समाज आणि शासन यांच्यात सुसंवादालाही यात प्राधान्य देण्यात येणार आहे.

**शब्दांकन : वर्षा फडके-आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

# अमृतवाहिनी होण्यासाठी...

**डॉ. राजेंद्र सिंग**

आज जगातील युरोप, अमेरिका आणि चीन या देशामध्ये तीव्र दुष्काळाची स्थिती आहे. या देशातील नद्या आटत आल्या असून चीनची यांगत्से कोरडी झाली असून, नदी खोऱ्यात तीव्र दुष्काळ आहे. भारत देशाला दुष्काळ काही नवीन नाही, राजा जनकाच्या काळापासून दुष्काळची नोंद आपल्याकडे आहे. कंसाच्या काळात पूर आलेला होता असे इतिहासात स्पष्ट होते.

मागील काही वर्षांपासून भारतात आणि महाराष्ट्रात देखील पूर आणि दुष्काळाची स्थिती वारंवार येत आहे. तथापि ही परिस्थिती मानवी हस्तक्षेपामुळे अधिक तीव्र होत आहे. विकासाच्या नियोजनात नद्यांना उचित स्थान नसल्यामुळे नद्यांचा विनाश अधिक होत आहे, असे माझे स्पष्ट मत आहे.

## नद्यांचे वास्तव

जगामध्ये विशेषतः युरोप आणि अमेरिका या देशांत अनेक नद्या आहेत, त्या दृश्य स्वरूपात खूप सुंदर आणि स्वच्छ दिसतात तथापि त्यांच्यामध्ये रासायनिक प्रदूषणदेखील मोठ्या प्रमाणावर आहे. प्रदूषणामुळे तेथील जीवनदेखील प्रभावित झाले होते. त्या देशांनी या नद्या प्रदूषणमुक्त करण्याचा निर्णय घेतला, अनेक मार्गांचा आणि साधनांचा वापर करून बऱ्याच नद्यांवरील प्रदूषणावर नियंत्रण मिळवले आहे, परंतु ज्या प्रदूषणावर निश्चित उपाय सापडलेला नाही, तर ते उद्योग त्यांनी बंद केलेत. उदाहरणार्थ टेक्स्टाईल इंडस्ट्रीजमध्ये क्रोमियम नावाचे घातक प्रदूषक आहे जे पाण्यामध्ये मिसळते. या प्रदूषकावर अजूनही निश्चित उपाय असा मिळालेला नाही.

जगभराच्या नद्यांचे वास्तव पाहता बऱ्याच देशांनी आपल्या नद्यांवर चांगले काम

**महाराष्ट्र शासनाने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने राज्यभरात सुमारे ७५ नद्यांवर, नदी संवाद यात्रा 'चला जाणूया नदीला' या नावाने सुरू केली आहे. ही बाब प्रशंसेस पात्र आहे. राज्यभरातून अनेक स्वयंस्फूर्तीने काम करणारे युवक-युवती ज्येष्ठ नागरिक, महिला यात सहभागी होत आहेत. नदीचा अभ्यास करून त्यांचे निष्कर्ष आणि अहवाल शासनास प्राप्त होतील. माझा आग्रह असेल त्यावर शासन आणि समाजाने एकत्र येऊन काम करावे आणि नद्यांना अमृतवाहिनी बनवण्यासाठी प्रयत्न करावेत.**



केलेले आहे आणि नद्या प्रदूषणमुक्त केल्या आहेत. तशाच काही नद्या नष्ट झाल्या असून काही नद्या अजून प्रतीक्षेत आहेत. नद्यावरील जगभरच्या प्रवासात मी अनेक नद्या पहिल्या आहेत त्यातील काही चांगल्या प्रयत्नांची आणि काही असफल प्रयत्नांची कथा मी तुम्हाला विषद करत आहे.

स्वीडनमधील स्टॉकहोम शहरातील द सोडरस्ट्रॉम नदी जी मालारेन जलाशयातून उगम पावते आणि बाल्टिक समुद्राला मिळते. या नदीच्या संक्रमणाचा मी स्वतः



साक्षी आहे. मी दरवर्षी ऑगस्ट महिन्यामध्ये तेथे जात असे. ही नदी शहराच्या मध्यभागातून राजभवन आणि संसद या दोघांच्या मधून वाहते. ही नदी अत्यंत प्रदूषित होती आणि त्याच्या काठावर उभे राहणेदेखील कठीण असायचे, त्या ठिकाणी दुर्गंध येत असे. या त्रासाने अशीही चर्चा झाली की, राजभवन आणि संसद या दोघांचेही स्थलांतर करावे. राजांनी राजमहाल बदलावा दुसरीकडे बांधावा, राजा काही काळ नवीन जागी राहायलादेखील गेले; तथापि संसद भवन स्थलांतरित करण्यास काही अडचणी आल्या. दरम्यानच्या काळात त्यांनी तेथील नदी सुधारण्यासाठी निश्चय केला आणि नदीवर काम केले. आज तीच नदी चांगली केल्यानंतर तिच्या काठी राहण्यास आनंद वाटतो. आज त्याच नदीमध्ये मासे आढळतात आणि सुगंध येतो. हा नदीवर झालेला बदल मला प्रत्यक्षपणे पाहता आला.

अमेरिकेतील थेम्स नदीवर मी २००२-२००३ या साली पदयात्रा केली आहे ही नदी हिंडन तलावापासून निघते आणि न्यूयॉर्क येथे समुद्राला मिळते. ही नदीदेखील मोठ्या प्रमाणावर प्रदूषित होती आजच्या भाषेत म्हणायला सांगितले तर ती आयसीयूमध्ये दाखल करण्याच्या स्थितीस पोहोचली होती. या नदीवर प्रदूषण एवढ्या मोठ्या प्रमाणावर होते, त्यातील प्रदूषणाच्या नेमक्या समस्या आणि कारणांचा अभ्यास केला. काही स्वयंसेवकाची फळी निर्माण केली त्यांनी कायदेशीर तोडगा त्यावर काढला आणि न्यायालयाच्या आदेशाने, प्रदूषण करणारे साखर कारखाने, कागद कारखाने असे उद्योग बंद केले. काही उद्योग शिल्लक राहिले तर त्यांनी स्वतःच्या कारखान्यातून निघणारे सांडपाणी त्या प्रदूषित पाण्यावर पूर्ण उपचार करून ते पाणी पुनर्वापरासाठी आणले. आज ती नदी देखील सदानीरा झालेली आढळते.

कॅनडाची ओट्टावा नदी जी ओंटारीओ आणि क्युबेक प्रांतातून वाहते त्या नदीवर मी स्वतः पदयात्रा केलेली आहे. या नदीच्या बाबतीत मला असे म्हणायचे आहे की, ही नदीदेखील मोठ्या प्रमाणावर प्रदूषित होती. प्रदूषण दूर करण्यासाठी प्रशासनाने कंबर कसली आणि सर्व प्रदूषण करणारे कारखाने बाजूला सारले. आज ती नदी पुन्हा अविरल आणि निर्मल झाल्याचे मी स्वतः बघितले आहे.

अमेरिकेतील आणखी एक नदी ओंस वेली या नावाने ओळखली जाते जी मोनोलेक या तलावापासून उगम पावते. त्या नदीला लॉसअँजेलीस शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी खूप मोठ्या पाईपद्वारे नेण्यात आले. नदीची मोठी वाताहत झाली, नदीचे पाणलोट शुष्क झाले आणि त्या पाणलोटांना मृत घोषित करण्यात आले. ती नदी आज पूर्णपणे नष्टप्राय झाली आहे. या नदीची हत्या झाली असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही.

आज जगभरात विकासाच्या नावावर जो विनाश होतो आहे तो चिंता करण्याजोगा आहे. जगातील अत्यंत विकसित देश अमेरिकादेखील आपल्या नद्यांना वाचवू शकला नाही ही वस्तुस्थिती आहे.

तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकीच्या विकासाने आधी नद्यांची स्थिती गंभीर केली आहे आणि काही ठिकाणी याच तंत्रज्ञानाने नद्या सुधारण्याचा प्रयत्न झाला आहे. काही नद्या प्रदूषणमुक्तदेखील झाल्या आहेत, तथापि माझे एक निरीक्षण आहे की, या नद्याचा प्रवाह निश्चित कमी झालेला आहे आणि त्यांचे स्वातंत्र्य नष्ट झाले आहे. जसे आपल्याला स्वच्छंदीपणे जगण्यासाठी जे स्वातंत्र्य आवश्यक आहे तसे नदीलादेखील स्वातंत्र्य आवश्यक असते तेच आपल्या विकासाने हिरावून घेतले आहे. अमेरिकेने नद्यांना स्वातंत्र्य परत देण्यासाठी सुमारे ९० बांध/धरणे तोडली आहेत.

मी प्रत्यक्ष पाहिलेल्या स्थितीचेच वर्णन करतो आहे. कॅलिफोर्निया जो अमेरिकेचा प्रांत आहे तेथील अतिशोषणामुळे भूजल आटले आहे, भूजल साठे रिकामे झाले आहेत. आज हेच देश उपायासाठी भारताकडे सहकार्याची मागणी करत आहेत. नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी भारताकडे विचारणा करत आहेत. मला त्यांनी अनेकदा बोलावले आहे. युरोपमध्ये सध्या पूर आणि दुष्काळ आहे त्यांनी भारताकडे मदत मागितली आहे. आंतरराष्ट्रीय पूर आणि दुष्काळ आयोगाचा मी अध्यक्ष आहे.

### भारतातील नद्या आणि वास्तव

भारतातील नद्यांमध्ये सर्वात प्रदूषित नदी गंगा आहे, तिच्यावर काम चालू आहे. भारतात सांडपाणी शुद्धीकरण संयंत्रे उपयोगी सिद्ध होत नाहीत, त्यांच्याऐवजी नैसर्गिक पद्धतीने प्रदूषण करण्याची प्रक्रिया असावे असे माझे मत आहे. त्यावर अधिक मूलगामी संशोधन होणे गरजेचे आहे. पाण्याचे प्रदूषण मोजण्याचे तंत्र आपण विदेशाकडून घेतले आहे, ते आधी संशोधित करून त्यात स्थानिक आणि स्वदेशी तंत्राचा समावेश होणे गरजेचे आहे.

भारतीय समाजाने नद्यांना मानवी दर्जा खूप आधीपासून दिला आहे किंबहुना ती आपली परंपरा आहे. ३०० वर्षांच्या



**२ ऑक्टोबर २०२२ रोजी वर्धा येथील यशवंत विद्यालयात विद्यार्थ्यांना 'माझी नदी' या विषयावर संबोधित करताना.**

संघर्षानंतर आता कुठे न्यूझीलंड देशाच्या नदीला २०१७ साली मानवी दर्जा मिळाला आहे. त्याच्या कितीतरी आधी आपल्या समाजाने तिला माता मानले आहे. खरे तर आपल्या संविधानानेदेखील नदीला मानवी दर्जा देणे गरजेचे आहे.

आज आपला समाज नदीला माता मानतो, पण ती सांडपाणी आणि मैला वाहण्याचे साधन झाली आहे हे सर्वथा अश्लाघ्य आहे. जेव्हा आपल्या विचार आणि कृती दोन्ही समसमान होत्या, त्या वेळी आपण विश्वगुरू होतो. परंतु आज विपरीत घडते आहे. विचार आणि कृती नेमकी भिन्न आहेत म्हणून आपण विश्वगुरू नाही.

आज आपल्या देशातील ७२ टक्के जलधर शुष्क झाले आहेत. त्यामुळे छोट्या नद्यादेखील सुकत आहेत आणि मोठ्या नद्यात प्रदूषण आहे, त्यात प्रदूषित पाणी आहे. पावसाळ्यात या नद्या पूर घेऊन येतात. जसे की, मी सध्या पटना-बिहारमध्ये आहे, येथे कोसी, गंगा या नद्या प्रचंड उत्पात माजवतात. नित्याने तिथे मोठा पूर येतो. नद्यांचा क्रोध आज इतका वाढला आहे की, पावसाळ्यात ती प्रचंड वेगाने वाहत पूर आणते बऱ्याचदा तो वित्त आणि मानवहानी करतो. जलाशयातील गाळ साचण्याने या पाण्याचे भूजलात रूपांतर होत नाही. आज नद्या तीन मोठ्या समस्यांनी ग्रासल्या आहेत. ते आपण समजून घेऊ या.

- नद्यांवरील अतिक्रमण : नदीच्या क्षेत्रावरील अतिक्रमण वाढले आहे.
- नद्यांचे प्रदूषण, वरील परिच्छेदात चर्चा केल्याप्रमाणे नद्यावरील प्रदूषण अतीव प्रमाणात वाढले आहे.
- नद्यांच्या पाण्याचा बेसुमार वापर आणि शोषण. या समस्येने आज नद्या जर्जर झाल्या आहेत.

  या सर्वांना कारणीभूत आपण आहोत, आपण म्हणजे सर्व समाज.

## महाराष्ट्रातील नद्या

महाराष्ट्रातील नद्या या देशातील इतर नद्यांप्रमाणेच क्षतिग्रस्त आहेत. त्यांची प्रकृतीदेखील नाजूक आणि अत्यंत चिंताजनक आहे. मुंबई एके काळी पाच नद्यांचे शहर म्हणून ओळखले जात असे. पैकी मिठी हा नाला असल्याचे लोकांना वाटत असे तथापि ती नदी असल्याचे आमचे प्रतिपादन होते. २००५ साली मुंबईचा तो थरारक महापूर जेव्हा ९४५ मिमी पाऊस एका दिवसात पडला होता. नद्या निरोगी असतील, तर मानवी आरोग्यदेखील निरोगी असेल. परंतु नद्या अस्वस्थ आहेत म्हणून समाजात आनुषंगिक आजार, कॅन्सरसारखे आजार बळावत आहेत हे देशातील वास्तव आहे. याचा परामर्श घेऊन महाराष्ट्र शासनाने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाच्या निमित्ताने राज्यभरात सुमारे ७५ नद्यांवर, नदी संवाद यात्रा 'चला जाणूया नदीला' या नावाने सुरू केली आहे. महाराष्ट्र शासनाची ही बाब प्रशंसेस पात्र आहे.

महाराष्ट्रात लोकसहभागाने नद्यांवर अनेक प्रशंसनीय कामे झालेली आहेत, जसे की, सांगोला तालुक्यातील कासाळगंगा, (महूद), माणगंगा (सोलापूर, सांगली, सातारा) तिळगंगा (इस्लामपूर), होळनानदी (अंबेजोगाई, बीड), तामसवाडा (सेलूवर्धा), अग्रणी आणि महाकाली (सांगली) शिवाय गडचिरोली, हिंगोली इत्यादी जिल्ह्यातून नद्यावर झालेली कामे शाश्वत आहेत आणि ती अनुकरणीयदेखील आहे.

## संवाद यात्रा

२ ऑक्टोबर २०२२ ते २६ जानेवारी २०२३ या कालावधीत चला जाणुया नदीला ही संवाद यात्रा सुरू होते आहे. राज्यभरातून अनेक स्वयंस्फूर्तीने काम करणारे युवक युवती, ज्येष्ठ नागरिक, महिला यात सहभागी आहेत. सर्वजण नदीचा अभ्यास करून त्यांचे निष्कर्ष आणि लोकांचा नदी अभ्यास अहवाल शासनास सादर करतील. माझा आग्रह असेल त्यावर शासन आणि समाजाने एकत्र येऊन काम करावे आणि नद्यांना अमृतवाहिनी बनवण्यासाठी प्रयत्न करावेत.

अमृत म्हणजे जे अविनाशी आहे, ज्यामुळे संजीवनी मिळते आणि हलाहलदेखील पचवण्याची ज्याच्यात शक्ती आहे ते अमृत. स्वातंत्र्यापूर्वी स्वातंत्र्यप्राप्तीसाठी विचारांचे अमृत होते. स्वातंत्र्याची ७५ वर्षे ही अमृतासमान आहेत. तथापि नद्यांमधील जल, शासन आणि लोकसहभागाने अमृत करण्याचा हा उपक्रम महाराष्ट्राने सुरू केला आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यात पुन्हा नवचैतन्य निर्माण होण्यास मदत मिळत आहे.

**(लेखक हे नद्यांचे अभ्यासक आहेत. राजस्थानमधील अलवर जिल्ह्यात केलेल्या जलसंधारणाच्या कामासाठी यांना जमनालाल बजाज पुरस्कार, मॅगसेसे पुरस्कार मिळाला असून, पाण्याचे नोबेल समजला जाणारा स्टोकहोम जल पुरस्कारानेदेखील त्यांना सन्मानित केलेले आहे. तरुण भारत संघाचे ते राष्ट्रीय अध्यक्ष आहेत, त्याचप्रमाणे जलबिरादरीचेही ते जनक आहेत.)**

**शब्दांकन : डॉ. सुमंत पांडे,** पुणे

# नदी संवाद यात्रा

**वेणूगोपाल रेड्डी**
प्रधान सचिव, वने विभाग

आपल्या वेदांमध्ये, संस्कृतीतही नद्यांचे महात्म्य सांगितलेले आहे. पण वेगवेगळ्या कारणांमुळे काळाच्या ओघात नद्यांची शुद्धता धोक्यात आली आहे. ती शुद्धता जपण्यासाठी नद्यांचे संगोपन करणे ही काळाची गरज बनली आहे. नदीचे प्रदूषण हा एक सामाजिक आणि पर्यावरणीय प्रश्न असून त्या प्रश्नाने आता गंभीर स्वरूप धारण केले आहे. मुळातच नद्यांची स्थिती वाईट होण्यासाठी अनेक बाबी कारणीभूत आहेत. नदीत टाकला जाणारा कचरा, नदीतील वाळूचा उपसा होणे, पाणलोट क्षेत्र कमी होणे या घटकांमुळे नदीचे प्रदूषण वाढत आहे.

निसर्गाच्या बदलामुळे राज्यात पावसाचे प्रमाण व त्याच्या वेळा अनिश्चित झाल्याने पाणी साठवणे त्याचे नियोजन करणे गरजेचे झालेले आहे. सजीवांच्या अस्तित्वासाठी मुबलक पाणी उपलब्धता असणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्याचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. राज्यात गेल्या काही वर्षांत निर्माण होणाऱ्या सततच्या अवर्षण परिस्थितीमुळे पाण्याचे संकट वाढत आहे. पाण्याची उपलब्धता व पाणी वापराचे नियोजन, पाण्याचा अपव्यय टाळणे, पाण्याचा गरजेपुरता वापर करणे, नैसर्गिक जलस्रोत, नद्या व जलाशयाचे प्रदूषण रोखणे, पायाभूत सुविधांचे संरक्षण करणे, पाण्यासंबंधी कायदे व नियमांचे पालन करणे, याबाबत समाजात जनजागृती व जलसाक्षरता निर्माण होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्राला वारंवार भेडसावणाऱ्या पूर आणि दुष्काळ या समस्येपासून मुक्तीसाठी नदी संवाद अभियानाचे आयोजन केलेले आहे. पावसाची अनियमितता वाढल्यामुळे कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ यासारखी परिस्थिती वारंवार येत आहे. भविष्यात ही परिस्थिती येऊ नये, यासाठी राज्याने प्रयत्न करणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील नद्यांची अवस्था बिकट होत आहे. नदीच्या केवळ उगमापासून काही अंतरापर्यंतच नदी आपल्याला शुद्ध स्वरूपात आढळते नंतर नदीची वाताहत होते. नदीच्या मार्गक्रमणात अनेक गावे, शहरे येतात. त्या वेळी नदीत मोठ्या प्रमाणात गाळ आलेला असतो.

**‘चला जाणूया नदीला’ या मोहिमेंतर्गत नद्यांचे संगोपन करणे, संवर्धन आणि संरक्षण करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. नदीचे प्रदूषण कमी करणे, नदी जलयुक्त करण्यासाठी लोकांमध्ये जनजागृती व्हावी यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवांतर्गत ‘चला जाणूया नदीला’ या अभियानाची अंमलबजावणी करताना. १०० किलोमीटर अंतरापर्यंत दिंडी काढली जाणार आहे. १०२ नद्यांचा ‘चला जाणूया नदीला’ या अभियानात समावेश करण्यात आला आहे.**



नदीची ही अवस्था बदलण्यासाठी समाज, शासन, प्रशासन आणि लोकसहभाग या घटकांनी एकत्र येऊन कृती करणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवांतर्गत 'चला जाणूया नदीला' या अभियानाची अंमलबजावणी करताना. १०० किलोमीटर अंतरापर्यंत दिंडी काढली जाणार आहे. १०२ नद्यांचा 'चला जाणूया नदीला' या अभियानात समावेश करण्यात आला आहे. वाढते औद्योगिकीकरण, नागरीकरण, शहरीकरण यामुळे पाण्याचा वापर वाढत चालला आहे. त्या तुलनते पाण्याची उपलब्धता कमी होत आहे. नद्या तसेच धरणे, तलावातील वाढत्या गाळामुळे पाण्याची वहन क्षमता आणि साठवण क्षमता कमी होत चालली आहे. याच पार्श्वभूमीवर नदीला जाणून घेणे, इतर समस्यांचा अभ्यास करणे या समस्यांवर उपाय शोधून या प्रश्नांची कायमस्वरूपी सोडवणूक करणे, त्यातून जलस्रोत वाढावे, यासाठी 'चला जाणूया नदीला' हे अभियान सुरू करण्यात आले आहे.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त २ ऑक्टोबर २०२२ सुरू झालेल्या या अभियानांतर्गत नदी संवाद यात्रा लोकसहभागातून राज्यभर वेग घेत आहे. या अभियानासाठी राज्यस्तरीय, जिल्हावार समित्या स्थापन केल्या आहेत. राज्याचे मुख्य सचिव राज्यस्तरीय समितीचे प्रमुख असतील. या अभियानामध्ये लोकसहभाग खूप महत्त्वाचा आहे. यासाठी प्रत्येक समिती प्रयत्न करणार आहे. प्रदूषणासारख्या वाढत्या समस्यांमुळे उपलब्ध भूपृष्ठजलाची उपयुक्तता घटत आहे. त्यावर उपाय म्हणून नदी जाणून घेणे आणि तिच्या समस्यांचा अभ्यास करून त्या दूर करणे हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. लोकसहभागातून हे अभियान निश्चित यशस्वी होईल व प्रत्येक समिती सकारात्मक दृष्टीने प्रयत्न करणार आहे.

## नदी आणि नदी यात्रीची निवड

अशासकीय सदस्य, जलबिरादरी आणि सामाजिक संघटना यांच्याशी चर्चा केल्यानंतर असे ठरले की, स्वेच्छेने आणि स्वयंप्रेरणेने यात सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांचा सहभाग नोंदवला आहे. नदीवर प्रेम करणाऱ्यांचा यामध्ये उत्साह असून राज्यातील सुमारे १०२ नद्यांवर ही यात्रा मार्गक्रमण करणार आहे. नदी संवाद यात्रा ही केवळ नद्यांची माहिती घेणे अथवा नदीला जाणून घेणे येथपर्यंत मर्यादित न राहता नदीचा सर्व बाजूंनी लोकांच्या सहकार्याने अभ्यास करणे अशी असणार आहे. नदीवर झालेल्या आघाताच्या कारणांचा अभ्यास करणे, संभाव्य उपाययोजना करण्यासाठी अहवाल तयार करून शासनास सादर करणे त्यासाठी ठोस उपाययोजना करणे हे व्यापक उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे. नमूद करण्यात आलेल्या घटकांचा लोकांच्या उपजीविकेवर आणि दैनंदिन व्यवहारावर झालेला परिणाम याबाबतची माहितीही अभ्यासण्यात येणार आहे.

## या नद्यांचा होणार अभ्यास

शिवना, मांजरा, सीता, धाम, लेंडी, मनार, दुधाना, जीवरेखा, कायाधु, मधुमती, गोमती, भडभडी, मोडबी, भुवन, चिंचोंडी, नाग, आदळा, इरई, कुंडलिका, निरगुडा, वालदेवी, अगस्ती, होलना, उघाडी, उमा, आसना, वरुणा, नेर पिंगलाई, खोलड, खाम, वेणा, चुलबंद, कपिला, नंदिनी, पिंजांडा, म्हाळुंगी, मोटी, खोब्रागडी, पेणगंगा, यशोदा, कृष्णा, वेणा, तिळगंगा, अग्रराणी, महाकाली, कडवी, पोहर, पंचगंगा, येरला, इंद्रायणी, पेवाना, मुथा, घोड, मीना, माणगंगा, सिना, वेलगंगा, राम नदी, कसाल गंगा, भिमा, आदिला नदी, धुबडूदी, वैतरणा, उल्हास, खुशीवली, सावित्री, काल, वशिष्ठी, काजवी, वाव, भातसा, भारंगी, कनकवीरा, चोर, लेणाद्री, दहिसर,मिठी, वालघाट, ओशिवरा, वालधुनी, कुंभेरी, कामवारी, भोगवती, जगबुडी, कासर्डी, खडसी, बंधारी, पोईसर, खडशी, डोंगरी, तितूर, बाणगंगा, बर्डी, भोनक, गोमती, वाती, पैंनगंगा, चंद्रभागा, गिरना, भट, जल मछली, देवानंद,

## असे असेल नदी यात्रेचे स्वरुप

नदी यात्रा आणि अभ्यास तीन टप्प्यात होणार आहे. पूर्वतयारी करताना नदीबाबतची माहिती करून घेणे, त्या गावातील प्रशासन, महत्त्वाच्या व्यक्ती तसेच संस्था इत्यादी यांना नदी यात्रेबाबत माहिती करून देणे. सर्वसाधारणपणे सूर्योदय ते सूर्यास्त या काळात नदी यात्रा असेल. नदी यात्रा काढताना गावातील लोकांशी चर्चा करण्यात येईल. तसेच आवश्यकता असेल तेथे शिवार फेरी, प्रक्षेत्र भेट, उद्योग भेट असेल. नदीच्या समस्या जाणून घेण्यासाठी शासन आणि नदी अभ्यासक यांच्यात विषयाची विभागणी केलेली असेल. जसे नदीचा अभ्यास गट, नदी निदान गट, नदी समस्या विश्लेषण गट, नदी उपचार गट, नदी क्षेत्रात असलेली शाळा महाविद्यालय, तंत्र महाविद्यालये इत्यादी संस्थांमधून तज्ज्ञ गट आणि लोकशिक्षण अशा भिन्न गटात तज्ज्ञ व्यक्तींसोबत शासनातील काही अधिकारी आणि कर्मचारी यांचा समावेश असणार आहे.

## नदी की पाठशाला

स्थानिक पातळीवर नदीच्या समस्या आणि त्यावरील संभाव्य उपाय, लोकशिक्षण यांचा मिलाफ असलेली 'नदी की पाठशाला' समाजातील विभिन्न घटकासाठी प्रस्तावित करण्यात आली आहे. शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी तसेच शेतकरी यांना या पाठशालेमध्ये सामावून घेण्यात येईल. राज्यातील सर्व नदी खोऱ्यातून ही यात्रा प्रस्तावित आहे. नद्यांचे संगोपन करणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

औद्योगिक विकास प्रक्रियेत नद्यांची शुद्धता धोक्यात आली आहे. ती शुद्धता जपण्यासाठी नद्यांचे संगोपन करणे आवश्यक आहे. 'चला जाणूया नदीला' या मोहिमेंतर्गत लोकसहभागातून नदीचे प्रदूषण कमी करणे आणि नद्यांचे संवर्धन करणे यावर भर देण्यात येणार आहे. येणाऱ्या काळात लोकसहभागातून नदी संरक्षण आणि संवर्धन ही लोकचळवळ उभी करणे हेच या अभियानाचे खरे फलित असेल.

**शब्दांकन : वर्षा फडके–आंधळे,**
विभागीय संपर्क अधिकारी

# नद्यांचे पुनरुज्जीवन

**एकनाथ डवले**
प्रधान सचिव, कृषी विभाग

नदीपात्रात गेल्या अनेक वर्षात मोठ्या प्रमाणात गाळ साचून नद्यांचे पात्र उथळ व अरुंद झाल्याने नदीपात्रातील पाणी साठवणुकीची क्षमता कमी झाली. त्यामुळे भूजल पुनर्भरण कमी प्रमाणात होत आहे. याशिवाय पुराचा धोका निर्माण होण्याची शक्यता असते. यामुळेच नदी पुनरुज्जीवनसारखा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे.

## पुनरुज्जीवन कार्यक्रमास प्रोत्साहन

राज्यात नदी, ओढा, नाला यामधील गाळ काढणे, सरळीकरण व खोलीकरण करणे ही कामे लोकसहभागातून करणे अभिप्रेत आहे. नदी, ओढा, नाला पुनर्जीवित करण्यास ज्या गावातील रहिवाशांनी पुढाकार घेऊन लोकवर्गणी, श्रमदानाद्वारे मोठ्या प्रमाणात योगदान दिले आहे किंवा देत आहेत, अशा गावांमध्ये नदी, ओढा, नाला पुनरुज्जीवन कार्यक्रमास प्रोत्साहन देण्यासाठी अभिसरणाच्या माध्यमातून कार्यक्रम राबवण्यास राज्य शासनाने ८ डिसेंबर २०१५ रोजीच मान्यता दिली आहे.

## लोकसहभाग अनिवार्य

हा नदी पुनरुज्जीवन कार्यक्रम राबवण्यातील महत्त्वाच्या बाबी पुढीलप्रमाणे आहेत. यामध्ये नदी पुनरुज्जीवनाची कामे अवर्षण प्रवण क्षेत्र अथवा पाणीटंचाई असलेल्या क्षेत्रात प्रथम प्राधान्याने घेण्यात येतात. नदी, ओढा, नाले पुनरुज्जीवित करताना लोकसहभाग अनिवार्य आहे. प्रामुख्याने नदी, ओढा, नाला पात्रातील गाळ काढणे, अतिक्रमण काढून खोलीकरण, रुंदीकरण करणे, वृक्षलागवड, जनजागृती पर्यवेक्षण इत्यादीमध्ये लोकांचा सहभाग आवश्यक आहे.

नदी, ओढा, नाल्यावर असलेली पूर्वीची बांधकामे प्राधान्याने दुरुस्त व पुनरुज्जीवित करण्यात येतात. नदी, ओढा, नाला रुंदीकरण खोलीकरण झालेल्या भागामध्ये पाण्याची अधिक उपलब्धता होण्यासाठी सिमेंट नाला बांध बांधकाम, केटी वेअरसाठी आवश्यकतेनुसार निधी प्राधान्याने उपलब्ध करून देण्यात येतो. नदी, ओढा, नाल्याजवळील पाणलोटाची कामे प्रकल्पाचा भाग म्हणून प्राधान्याने घेणे बिहार पॅटर्ननुसार नरेगातून लोकसहभागाद्वारे नदी, नाला, आढा काटावर वृक्षलागवडीचा कार्यक्रम हाती घेण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी व तालुकास्तरावर प्रांत अधिकारी यांच्या समितीमार्फत हा कार्यक्रम राबवण्यात येतो. सिमेंट नालाबांधसाठीही निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. इतर कामे अभिसरणातून करण्यात येत आहे. आतापर्यंत हा कार्यक्रम सुरू झाल्यापासूनच्या तीन वर्षांत (सन २०१५-१६ ते २०१७-१८) एकूण १५६८ बंधारे पूर्ण झाले असून, त्यासाठी ३३२ कोटी ९२ लाख रुपये इतका खर्च झाला आहे.

**शब्दांकन : दीपक चव्हाण,**
विभागीय संपर्क अधिकारी

**जलसंधारणाच्या माध्यमातून जलसमृद्धी आणण्याच्या दृष्टीने राज्य शासनाचे प्रयत्न सुरू आहेत. विविध योजनांच्या माध्यमातून आणि लोकसहभागातून मृद् व जलसंधारण कामांना गती देणे, शाश्वत जलसाठे निर्माण करणे यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. जलसाठे निर्माण करून भूजल पातळीत वाढ करणे आणि संरक्षित सिंचन क्षमता निर्माण करणे या बाबींना महत्त्व देण्यात येत आहे. त्याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणजे नदी पुनरुज्जीवन कार्यक्रम.**



# प्रत्येकासाठी पाणी !

**डॉ. संजय बेलसरे**

पाणी हा प्रत्येकासाठीच एक अत्यावश्यक असा घटक आहे. मात्र प्रतिमाणशी पाण्याची उपलब्धतता दिवसेंदिवस कमी होत आहे. पाण्याची वाढती मागणी ही एक जटील समस्या होऊन बसली असताना यावर प्रभावी उपाय म्हणून, महाराष्ट्र शासनाने एक सुनियोजित व्यवस्थापनाची जलनीती तयार करून, जलआराखडाही तयार केलेला आहे. 'प्रत्येकासाठी पाणी!' हा व्यापक दृष्टिकोन त्यातून पूर्णत्वास आणण्याचे प्रयत्न सातत्याने सुरू आहेत.

महाराष्ट्र राज्याने २००३ मध्ये स्वत:ची जलनीती तयार केली होती, त्यानंतर २०११ मध्ये त्यात अंशतः सुधारणा केल्या होत्या, जलक्षेत्रातील समस्या व आव्हाने विचारात घेऊन २००३ च्या जलनीतीमध्ये सुधारणा करून जलनीती धोरण २०१९ तयार केले आहे.

**राज्यात जलक्षेत्रासमोरील समस्या व आव्हाने आहेत, ती खालीलप्रमाणे :-**

- पाण्याची मागणी व पुरवठा यांतील वाढते असंतुलन.
- पाण्याच्या उपलब्धतेबाबत अनिश्चितता.
- उपलब्ध पाणी वाटपावरील मर्यादा.
- नियत वाटप केलेल्या ठरावीक हिश्श्याचे पाणी आश्वासितपणे मिळण्याचा अभाव.
- परिचालनाची अल्प कार्यक्षमता.
- निर्मित सिंचन क्षमता आणि प्रत्यक्ष वापर यातील तफावत.
- भूजलात होत असलेली घट.
- नागरी भागातील वितरण प्रणालीमध्ये व्यय.
- पाण्याच्या गुणवत्तेचा खालवणारा दर्जा.
- अचूक आधार सामग्री व प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव.
- नैसर्गिक जलसाठे आणि नदीनाल्यांवर अतिक्रमण.
- अंतिम सिंचन क्षमता निर्माण करणे.

## राज्य जलनीतीची उद्दिष्टे

राज्यातील पाण्याशी संबंधित सर्व विभाग, स्थानिक संस्था व जलक्षेत्राकरिता काम करणारी अभिकरणे (एजन्सी), उद्योगधंदे व जलवापरकर्ते यांना त्यांचे हक्क, जबाबदाऱ्या तसेच उद्दिष्टे साध्य करण्यासाठी राज्य शासनाने आखलेली रणनीती यामधील पाणी वापरकर्त्यांची भूमिका व शासनाच्या



अपेक्षा याबाबतची जाणीव करून देणे, हे राज्य जलनीतीचे उद्दिष्ट आहे.

**राज्य जलनीतीची ठळक उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :-**

- राज्यात शुद्ध जल व स्वच्छता याची सुनिश्चितता करणे.
- आवश्यक स्थितीस्थापकता (बिल्डिंग व रेझिलियन्स) निर्माण करणे.
- न्यायिक व धोरणी पद्धतीने पाण्याचे क्षेत्रीय वाटप करणे.
- पाण्याचे समन्याय वाटप करून, वाटप केलेल्या पाण्याची हमी देणे.
- परिसंस्थेचे (इकोसिस्टिम) संरक्षण करणे.
- भूपृष्ठ जल व भूजल यांच्या दर्जाचे संरक्षण करणे व त्यात वाढ करणे.
- पाण्याच्या वापराची उत्पादकता व कार्यक्षमता यात वाढ करणे.
- सुयोग्य सुधारणांसह जलसंपत्ती विकासाकडून एकात्मक जलसंपत्ती व्यवस्थापनाकडे पद्धतशीरपणे संक्रमण करणे.

## जलनीतीच्या केंद्रस्थानी असलेले विषय

- जल व्यवस्थापनेमध्ये लाभधारकांच्या सहभागाची सुनिश्चितता.
- धोरणात्मक नियोजन व गुंतवणुकीबाबत प्राधान्य ठरवणे.
- धोरणांचे निरंतर संनियंत्रण व अद्ययावतीकरण करणे.
- मागणी व्यवस्थापन
- सर्व जलवापर क्षेत्रांत पाणी वापराच्या कार्यक्षमतेत सुधारणा करणे.
- वापरयोग्य पाण्याचे प्रमाण वाढवणे.
- पारदर्शी व सूचित प्रक्रियेद्वारे सुशासन आणून समानता, सामाजिक न्याय आणि स्थिरता ही उद्दिष्टे साध्य करणे.

**राज्य जलनीतीमध्ये पाणी वापराचा प्राधान्यक्रम खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे:-**

- पिण्याकरिता व स्वच्छतेकरिता पाणी
- घरगुती वापरासाठी पाणी आणि पाळीव पशुधनासाठी पाणी
- कृषी व कृषी आधारित उद्योग
- उद्योग, औष्णिक विद्युत निर्मिती, जलविद्युत निर्मिती.
- पारिस्थितीकी संस्था (इकोसिस्टिम)
- सांस्कृतिक, धार्मिक समारंभ करमणूक, खेळ इत्यादींसारख्या इतर वापर घटकासाठी लागणारे पाणी.

## एकात्मिक राज्य जल आराखडा

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ मधील कलम १५ व १६ मध्ये एकात्मिक राज्य जल आराखडा करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

राज्यातील गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा, पश्चिम वाहिनी नद्या (कोकण) व महानदी असे एकूण सहा खोरे आहेत.

- गोदावरी - १५२५७८ चौ.कि.मी. (४९.६२%)
- कृष्णा- ६९०३२ चौ.कि.मी. (२२.४५%)
- नर्मदा - १३३८ चौ.कि.मी. (०.४३%)
- तापी - ५१३०४ चौ.कि.मी. (१६.६८%)
- पश्चिम वाहीनी नद्या- ३३२२८ चौ.कि.मी. (१०.८२%)
- महानदी - ३२२ चौ.कि.मी.(०.१०%)

असे एकूण - ३,०७,५०० चौ.कि.मी.

या सर्व सहा खोऱ्यांचा स्वतंत्र अभ्यास करून स्वतंत्र जल आराखडे तयार करण्यात आले आहेत. या आराखड्यांपैकी गोदावरी खोरे एकात्मिक जलआराखड्यास राज्य जल परिषदेच्या ३० नोव्हेंबर २०१७ रोजीच्या चौथ्या बैठकीत मान्यता देण्यात

**पाण्याची उपलब्धता आणि वर्तमान आणि भविष्यातील पाण्याचा वापर**

| २०१६ | | | | २०३० | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **पाणी उपलब्धता** | **अघफू** | **पाणी वापर** | **अघफू** | **पाणी उपलब्धता** | **अघफू** | **पाणी वापर** | **अघफू** |
| पृष्ठभागावरील पाणी ७५% विश्वासार्हता | ४९२८ | घरगुती | २२१ | पृष्ठभागावरील पाणी ७५% विश्वासार्हता | ४९२८ | घरगुती | २८० |
| पृष्ठभागावरील पाणी वाटप | ४०७२ | औद्योगिक | ७१ | पृष्ठभागावरील पाणी वाटप | ४०७२ | औद्योगिक | ३७ |
| पुनर्निर्माण | ४० | शेती | २२२२ | पुनर्निर्माण | ४३ | शेती | २३७४ |
| आयात | ४०१ | निर्यात | ५३३ | आयात | ७७७ | निर्यात | ८९० |
| भूजल | ७९८ | पर्यावरण | ० | भूजल | ७९८ | पर्यावरण | २० |
| पुनर्वापर पाणी | १९६ | पुनर्वापर | ० | पुनर्वापर पाणी | ३५९ | पुनर्वापर | ३३३ |
| **एकूण उपलब्ध पाणी** | **१०४३६** | **एकूण वापर** | **३०४७** | **एकूण उपलब्ध पाणी** | **१०९७७** | **एकूण वापर** | **३९३४** |

- एकूण उपलब्ध पाण्यात आयात आणि पुनर्वापर पाण्यामुळे ५४१ अघफू वाढ.
- एकूण पाणी वापरामध्ये पर्यावरण आणि पुनर्वापर पाण्यामुळे ३५३ अघफू वाढ.

आली व या प्रकारे राज्यात गोदावरी खोऱ्याचा पहिला जलआराखडा नोव्हेंबर २०१७ मध्ये अंतिम करण्यात आला.

याच धर्तीवर उर्वरित कृष्णा खोरे, तापी खोरे, नर्मदा खोरे, पश्चिम वाहिनी नदी खोरे व महानदी खोऱ्याचे एकात्मिक जलआराखडे यांना राज्य जल मंडळाची मान्यता प्राप्त करून राज्य जल परिषदेच्या २२ जून २०१८ रोजीच्या पाचव्या बैठकीत अंतिम मान्यता देण्यात आली.

गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा, पश्चिम वाहिनी व महानदी खोऱ्यांचे एकात्मिक जलआराखडे एकत्रीकरण व एकात्मिकरण करून राज्याचा 'एकात्मिक राज्य जलआराखडा' तयार करण्यासाठी महासंचालक, मेरी नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली कृती गट गठित करण्यात आला. या कृती गटाने सप्टेंबर २०१८ मध्ये राज्याचा एकात्मिक जलआराखडा करून शासनास सादर केला व त्यास मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या राज्य जलमंडळाच्या १७ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या पंधराव्या बैठकीत मसुदा राज्य जल परिषदेस मंजुरीस ठेवण्याबाबत मान्यता दिली.

या 'एकात्मिक राज्य जल आराखड्याला ११ फेब्रुवारी २०१९ रोजीच्या राज्य जल परिषदेच्या सहाव्या बैठकीत अंतिम मान्यता देण्यात आली.

या आराखड्यात राज्यास अनुज्ञेय भूपृष्ठीय तसेच भूगर्भीय पाण्याचे एकात्मिक नियोजन करण्यात आले असून भविष्यात, म्हणजे सन २०३० पर्यंतच्या एकूण जलवापराचेही नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये सांडपाण्याची प्रक्रिया करून पुनर्वापर करणे यावर विशेष भर देण्यात आलेला आहे. तसेच विपुलतेच्या पश्चिम वाहिनी नदी खोऱ्याचे अतिरिक्त पाणी वळण योजनेद्वारे तुटीचा असलेल्या तापी खोरे व गोदावरी खोरे मध्ये वळवण्याबाबतचे नियोजन अंतर्भूत आहे.



## जलआराखड्याची वैशिष्ट्ये

- सन २०१६ आणि २०३० मध्ये पाण्याची उपलब्धता आणि अपेक्षित पाण्याचा वापर.
- स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे १००% सांडपाण्यावर प्रक्रिया, किमान ३० % सांडपाणी पुढील पाच वर्षांपर्यंत पुनर्निर्माण आणि पुनर्वापर.
- शून्य सांडपाणी धोरण आणि प्रदूषक भरपाई तत्त्वाची अंमलबजावणी.
- सूक्ष्म सिंचनास प्राधान्य.
- जलसंपदा विभागाचे चालू प्रकल्प पूर्ण करण्यासाठीचे धोरण.
- भागधारकांमधील सहभाग आणि सहयोग.
- पूरपरिस्थिती अंदाज आणि निर्णय समर्थन प्रणाली.
- सिंचन राज्य एकात्मिक जलआराखड्याच्या अंमलबजावणीसाठी पाण्याशी संबंधित सर्व विभागांना नेमून दिलेले कर्तव्य व जबाबदारीप्रमाणे काम करणे.

एकात्मिक राज्य जलआराखडे तयार झाल्यामुळे जल आराखड्याअभावी मा. उच्च न्यायालयाच्या विविध आदेशान्वये रखडलेले सिंचन प्रकल्प मार्गी लागणार आहेत. त्यामुळे सिंचनाचे नियोजन साध्य करता येईल व पाण्याचा प्रत्यक्ष वापर वाढवण्यास मदत होईल.

येथून पुढे महाराष्ट्र राज्यात उपलब्ध पाण्याप्रमाणे त्या त्या भागात नियोजित प्रकल्पांना गती देता येऊ शकेल व सन २०३०चे नियोजन साध्य करता येईल. तसेच दुष्काळी परिस्थितीत काटेकोर व सुयोग्य नियोजनाद्वारे त्या परिस्थितीला तोंड देता येईल.

सविस्तर (खोरेनिहाय) माहिती मिळण्यासाठी Download ISWP from https:// wrd. .maharashtra. gov .in /under tab 'जल आराखडा' or Water Plan वर अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

(लेखक हे गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद येथे कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत आहेत.)

# भूशास्त्रीयरचना व नद्या


**डॉ. श्रीनिवास वडगबाळकर**

महाराष्ट्र राज्याच्या विशिष्ट प्राकृतिक रचनेमुळे पूर्ववाहिनी व पश्चिमवाहिनी अशा दोन नदीप्रणाल्या स्पष्टपणे दिसतात. कोकणातील नद्या व पठारावरील नद्या अशीही विभागणी करता येते. पश्चिमवाहिनी नद्या अरबी समुद्राला, तर पूर्ववाहिनी नद्या काहीशा पूर्वेस अगर आग्नेयेस वाहत जाऊन महाराष्ट्राच्या बाहेर बंगालच्या उपसागराला मिळतात. बहुतेक नद्या सह्याद्रीच्या रांगेत ५०० ते ७०० मी. उंचीच्या भागात उगम पावत असून सह्याद्री हा राज्यातील प्रमुख जलविभाजक आहे. याशिवाय सह्याद्रीच्या पूर्वेकडील उपडोंगररांगा व उत्तरेकडील सातपुडा पर्वतरांग यांमध्येही काही नद्या उगम पावत असून त्यांना दुय्यम जलविभाजक म्हणता येईल. दक्षिणोत्तर मुख्य सह्याद्री पर्वतातून पूर्वेकडे तीन महत्त्वाच्या जलविभाजक डोंगर उपरांगांनी- दक्षिणेकडे शंभू महादेवाची डोंगररांग, मध्य भागात बालाघाट डोंगररांगा व उत्तरेकडे अजंठा डोंगररांग- अनुक्रमे कृष्णा, भीमा व गोदावरी या तीन नद्यांची महत्त्वाची नदीखोरी बंदिस्त केलेली आहेत.

## राज्याचे तीन विभाग

राज्यातील सह्याद्री पर्वताच्या घाटमाथ्यावर सर्वात जास्त व सर्वात जोरात पाऊस पडतो. मात्र तेथून पूर्वेकडे जाताना पावसाची तीव्रता कमी होऊ लागते, व मराठवाड्यातील नांदेडपासून पुढे आणखीन पूर्वेकडे जाताना पावसाचे प्रमाण आणखी वाढताना दिसते. महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये पडणाऱ्या पावसाचा विचार करता राज्याची विभागणी तीन विभागात होवू शकते.

**अति पावसाचा प्रदेश -** पश्चिम घाट, सह्याद्री माथ्यासह कोकणातील रायगड, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व मुंबई या जिल्ह्यातील सुमारे ०.३० लक्ष चौ.कि.मी. क्षेत्रावर सरासरी २००० ते ३००० मि.मी., तर या भागातील सह्याद्रीच्या काही शिखरांवर सुमारे ४००० ते ६००० मि.मी.




**भूशास्त्रीय दृष्टिकोनातून पाणी योग्य जागी 'मुरवणे' (जिरवणे) व मोठ्या प्रमाणात योग्य जागी, गावोगावी 'पाणी साठवणे' या दोन तंत्रांची खूप गरज आहे. उपलब्ध पाणीसाठा जमिनीत योग्य पद्धतीने मुरण्यासाठी पाणलोट क्षेत्रांची भूस्तरीय रचना कोठे आणि किती अनुकूल आहे, याची तपशीलवार क्षेत्रीय पाहणी करायला हवी आणि तशा योजना तयार कराव्या लागतील.**

च्या आसपास पाऊस पडतो.

**मध्यम पावसाचा प्रदेश -** मुख्यतः विदर्भ, मध्य व दक्षिण महाराष्ट्राचा भाग - नांदेड, परभणी, कोल्हापूर, नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, अकोला व यवतमाळ या जिल्ह्यातील सुमारे १.२७ लक्ष चौ.कि.मी. क्षेत्रावर सुमारे ८०० ते १००० मि.मी.च्या आसपास शाश्वत स्वरूपाचा पाऊस पडतो.

**अवर्षण प्रवण वा पर्जन्य छायेचा प्रदेश -** मुख्यतः मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राचे भाग - पुणे, अहमदनगर, नाशिक, धुळे, जळगाव, सोलापूर, सातारा, सांगली, औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर व बुलडाणा या जिल्ह्यांच्या १.५४ लक्ष चौ.कि.मी. भागात सुमारे ४०० ते ७०० मि.मी. एवढा पाऊस पडतो. याच भागात दरवर्षी पाणी टंचाईच्या संकटाला सामोरे जावे लागते.

## महाराष्ट्रातील प्रमुख नदी खोरी

**तापी-पूर्णा खोरे -** पश्चिम वाहिनी तापी-पूर्णा नदीचे खोरे, सातपुडा पर्वत व सातमाळ अजिंठा डोंगररांगादरम्यान पसरलेले आहे. हे खोरे महाराष्ट्राच्या उत्तर भागात असून त्याने खानदेशाची भूमी सुपीक केली आहे. या खोऱ्यातून तापी व पूर्णा या नद्या पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहतात. प्रस्तर भंगामुळे हे खोरे खचदरी स्वरूपाचे आहे. या नदीखोऱ्यात जळगाव, धुळे, नंदुरबार व नाशिक व विदर्भातील बुलडाणा, अकोला, अमरावती या जिल्ह्यांचा समावेश होतो. महाराष्ट्रात तापी नदीची लांबी २०८ कि.मी. व जलवाहनक्षेत्र सु. ३१,३६० चौ. कि.मी. आहे. तापी-पूर्णा खोऱ्याचा दक्षिण भाग अधिक सपाट व सुपीक, तर उत्तर भाग वालुकामय व ओबडधोबड आहे.

पठारावरील पूर्ववाहिनी नद्यांमध्ये गोदावरी नदी, भीमा नदी व कृष्णा नदी या प्रमुख नद्या आहेत.

**गोदावरी खोरे -** महाराष्ट्रात सर्वाधिक क्षेत्र गोदावरी खोऱ्याने व्यापलेले आहे. महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळाच्या ४९ टक्के भाग हा या खोऱ्याने व्यापलेला आहे. सातमाळा- अजिंठा डोंगररांग व हरिश्चंद्र बालाघाट डोंगररांगादरम्यान गोदावरी नदीचे मुख्य खोरे विस्तारलेले आहे. या नदीखोऱ्यांचे स्वरूप पश्चिमेकडे अरुंद, तर पूर्वेकडे रुंद आहे. या नदीखोऱ्यात नाशिक, अहमदनगर व संपूर्ण मराठवाड्यातील जिल्ह्यांचा समावेश होतो. गोदावरीची महाराष्ट्रातील लांबी ६६८ कि.मी. व जलवाहनक्षेत्र ७८,५६४ चौ.कि.मी. आहे.

**भीमा खोरे -** भीमा नदी कृष्णेची उपनदी असून ती कृष्णेला कर्नाटकात मिळते. महाराष्ट्रात भीमेचे खोरे कृष्णा नदीखोरे पेक्षा मोठे आहे. हरिश्चंद्र बालाघाट डोंगररांग व शंभू महादेवाच्या डोंगररांगादरम्यान भीमा नदीचे खोरे पसरलेले आहे. या खोऱ्याचा आकार आयताकृती असून उतार आग्नेयकडे आहे. या खोऱ्यात पुणे, सोलापूर, सातारा जिल्ह्याचा उत्तर भाग, नगर जिल्ह्याचा दक्षिण भाग त्याचबरोबर उस्मानाबाद व बीड जिल्ह्यातील काही भागाचा समावेश होतो. भीमेची महाराष्ट्रातील लांबी ४५१ कि.मी. व जलवाहनक्षेत्र ४६,१८४ चौ. कि.मी. आहे. कुकडी, घोड, भामा, पवना, इंद्रायणी, मुळा-मुठा, गुंजवणी, येळवंडी, नीरा नदी, कऱ्हा, सीना, माण ह्या भीमेच्या उपनद्या आहेत.

**कृष्णा नदी खोरे -** भीमेच्या दक्षिणेस कृष्णा नदीचे खोरे असून ही दोन्ही खोरी महादेव डोंगररांगांनी एकमेकींपासून वेगळी केली आहेत. सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर येथे कृष्णा नदी उगम पावते. महाबळेश्वर येथे उगम पावणाऱ्या वेण्णा, कोयना तसेच वारणा, वेरळा, पंचगंगा या कृष्णेच्या प्रमुख उपनद्या आहेत. या नदीखोऱ्यात सातारा जिल्ह्याचा दक्षिण भाग, सांगली व कोल्हापूर जिल्ह्याचा भाग येतो. कृष्णेची राज्यातील लांबी २८२ कि.मी. व जलवाहनक्षेत्र २४,६८२ चौ. कि.मी. आहे.

**वर्धा वैनगंगा खोरे (प्राणहिता खोरे) -** हे खोरे हा गोदावरी खोऱ्याचाच भाग आहे. पैनगंगा, वर्धा व वैनगंगा या नद्या मिळून तयार होणारी प्राणहिता नदी ही गोदावरी नदीची दक्षिणवाहिनी उपनदी आहे. विदर्भातील सर्व जिल्ह्यांचा यात समावेश होतो. या नदीखोऱ्याचा उंचसखल भूभाग असून उतार दक्षिणेकडे आहे. वर्धा नदीची महाराष्ट्रातील लांबी ४५५ कि.मी. व जलवाहनक्षेत्र ४६,१८२ चौ.कि.मी. आहे, तर वैनगंगा नदीची महाराष्ट्रातील लांबी २९५ कि.मी. व जलवाहनक्षेत्र ३७,९८८ चौ.कि.मी. आहे.


## भूरचना व नदी संबंध

लाव्हारसांचे थरावरती थर पसरून लाव्हास्तर तयार झालेले आहेत. या प्रत्येक स्तरांमध्ये, भौतिक आणि रासायनिक स्तरावर बदल आढळतात. एका लाव्हा थरामध्ये त्याच्या वरचा व खालचा, अशा दोन्ही भागांमध्ये, कमी जास्त जाडीचे, थोड्याफार पोकळ्यांचे व संधी/भेगांचे प्रमाण असलेला, मऊ ते कठीण संधियुक्त खडक असतो, तर मधला भाग, जो जास्त जाडीचा असतो, तो मात्र संधी/भेगामुक्त,





**पृष्ठीय पाणी व भूजल यांची परस्परावलंबी व पूरक संबंध दर्शविणारी चित्राकृती**




घट्ट व कठीण असा खाणदगड असतो. म्हणजेच एकाच लाव्हा थरामध्ये वरचा व खालचा भाग हा सच्छिद्र जलधर असतो, तर मधला भाग हा अच्छिद्र जलरोधक असतो. याचमुळे सलग लाव्हा थरांचा जोडभाग हा चांगला जलधर असू शकतो, कारण त्या भागात खालच्या थराचा वरचा सच्छिद्र भाग व वरच्या थराचा खालचा सच्छिद्र भाग असे दोनही एकत्र आलेले असतात. अर्थात या सच्छिद्र खडक भागातील पोकळ्या, छिद्रे, रंध्रे व भेगा/ संधी यांचे आपापसातील जोडजाळ्याच्या जोडणीवर खडकातील पाण्याचे वहन म्हणजेच खडकाची पार्यता अवलंबून असते. लाव्हा थरांची जाडी ही २ ते ४ मीटर पासून जवळपास ५० ते ६० मीटरपर्यंत असू शकते. काही वेळेला काही ठिकाणी मात्र अपवादाने ती यापेक्षाही कमी किंवा जास्तही असू शकते.

जमीन जेव्हा भूजलाने संपृक्त असते तेव्हाच छोट्या झऱ्यापासून ते मोठ्या नदी मध्ये सातत्याने आजूबाजूच्या योग्य ठिकाणांतून भूजल झऱ्याच्या रूपाने त्यामध्ये मिसळत असल्याने ते कायम वाहते राहते. यामुळे नदी / प्रवाह भरलेले राहतात. यांनाच शास्त्रीय भाषेत पाणी घेणारी / पाणी मिळवणारी नदी - घेता प्रवाह म्हणतात. अशा ठिकाणी भूजल पातळी नेहमी नदी / प्रवाह पातळीच्या वर राहते. अन्यथा भूजलाची पातळी जेव्हा खालावते किंवा नदी / प्रवाह पातळीच्या खाली राहते त्या त्या वेळी पृष्ठीय / नदीतील पाणी, नदीपातळीखालील खोलीवर योग्य ठिकाणांतून भूजलात रूपांतरित होण्यासाठी जात असल्याने, कमी होण्यास सुरुवात होते व नदी आक्रसून लहान होऊ लागते. या स्थितीतील नदी / प्रवाहाला शास्त्रीय भाषेत पाणी देणारी / पाणी घालवणारी नदी - देता प्रवाह म्हणतात. अशी परिस्थिती सातत्याने राहिल्यास वा भूजलाचा अतिउपसा होत राहिल्यास कालांतराने नदी कोरडी पडते - निर्जली बनते. दुष्काळी भागातून ही परिस्थिती मोठ्या प्रमाणात आढळते. मोठ्या नद्या या पुनर्भरण क्षेत्रात घेता प्रवाह असतात, तर सखल क्षेत्रात देता प्रवाह असतात.

सखल भागात व सिंचन क्षेत्रात काही विशेष परिस्थितीत नदी पातळी व भूजल पातळी समसमान स्थितीत पाहावयास मिळतात. अशा भागातून पाणथळ जागा तयार होऊन जमिनी नापिक व क्षारपड होण्याचे प्रकार पाहावयास मिळतात. महाराष्ट्रातील बहुतांशी बारमाही वाहणाऱ्या नद्या या स्थितीशी काही भागातून निगडित आहेत.

## पाण्याचे योग्य व्यवस्थापन गरजेचे

महाराष्ट्रात पडणाऱ्या पावसाचा विचार करता आपल्याकडे पाणी मुबलक असून त्याचे योग्य व्यवस्थापन होत नाही. विभागनिहाय बदलणारी भौगोलिक, पायाभूत रचनेचा सखोल अभ्यास महत्त्वाचा आहे. वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये (उदा. कोकण, तापी खोरे, विदर्भ इ.) पाणी आणि जमिनीच्या संधारणाचे व व्यवस्थापनाचे वेगवेगळे आकृतिबंध स्वीकारावे आणि त्यासाठी लोकाभिमुख प्रशासनासह, लोकसहभाग, लोकशिक्षण आणि जलसाक्षर समाजाची जडणघडण व्हावयास हवी.

सर्व गोष्टींचा शास्त्रीय आधार आणि मानव कल्याणाचा विचार करून, प्रदूषण कमीतकमी होईल आणि पाणी व माती यांची गुणवत्ता चांगली राहील, याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. भूशास्त्रीय अभ्यासातून, माथा ते पायथा तत्त्वाने, एकात्मिक पाणलोट विकास योजनेंतर्गत मृद् व जलसंधारण तंत्रांचा कार्यक्रम राबवून, नदीला पुनर्जीवित करून निर्मळपणे अखंड वाहती ठेवणे हे ध्येय राहील.

**(लेखक हे दयानंद महाविद्यालय, सोलापूरचे सेवानिवृत्त प्राचार्य तथा भूगर्भशास्त्राचे संशोधक आहेत.)**

# कोकणातील नद्या

**डॉ. अजित गोखले**

कोकणातल्या आणि देशावरच्या नद्या या अजिबात सारख्या नाहीत. सामान्य पाणलोट क्षेत्र विकासापेक्षा वेगळे उपाय इथे लागतात. पावसाळ्यात उद्दामपणे मोठमोठे कडे आणि बांध फोडून टाकणाऱ्या या कोकणातल्या नद्या हिवाळ्यात छोट्या छोट्या बांधांनी अडतात आणि उन्हाळाभर पाणी देतात. भूमी अंतर्गत बांध उपळा बांध, शेत बांधाला लिंपणे (अस्तरीकरण) असेच उपाय इथे करावे लागतात. त्यांनी दरवर्षीची पाणी टंचाई कायम दूर करता येते हा अनुभव कोकणातल्या शंभरहून अधिक गावांमध्ये तसेच मेळघाटतील तीन गावांमध्ये घेतला.

या विक्राळ प्रवाहांना योग्य जागा दिली तर ते अजिबात उत्पात न करता शांतपणे आपल्या मार्गाने निघून जातात. हे यशस्वी शाश्वत उपाय करून व गेल्या जवळजवळ चार दशकांच्या देशभरातील भ्रमंती व अभ्यासातून मिळालेला अनुभव मी खाली मांडत आहे.

दहा टक्के = नव्वद टक्के आणि दोन हजार = पन्नास

उर्वरित सगळ्या महाराष्ट्रावर जेवढा पाऊस पडतो त्यापेक्षा जास्त पाऊस छोट्याशा कोकणातल्या नद्या दरवर्षी वाहून नेतात. कोकणाचे क्षेत्रफळ (३०,७२८ चौ. कि.मी.) महाराष्ट्राच्या क्षेत्रफळाच्या (३०७,७१३ चौ.कि.मी.) दहा टक्केसुद्धा नाही. पावसाचे पाणी मात्र पडते जवळजवळ अर्धे.

एवढे सगळे पाणी पडते ते कोकणातल्या डोंगर रांगांमधल्या सहा हजार खेडी, वाड्या, पाडे, वस्त्यांवर. तिथून ते वाहते किमान तेवढ्याच संख्येच्या ओढे-विरे-वहाळ-पऱ्हे यांमधून. ही सर्व स्ट्रिम (stream) या इंग्रजी शब्दाची स्थानिक नावे. त्या प्रत्येकात दोन जरी धरले तरी किमान बारा हजार डोह-कोंडी-डुरे-दहाड-ढव म्हणजेच पाण्याचे साठे किंवा आसरे आहेत. पूल इन अ रिव्हर (Pool in a river) या इंग्रजी शब्दाची ही स्थानिक नावे.

पूर्वी जवळजवळ सर्व उन्हाळाभर हे

**इतर ठिकाणच्या नद्या हजार दोन हजार किलोमीटरच्या प्रवासात कठीण कातळाला भरडून, रगडून गोटे, वाळू किंवा चिखलात परिवर्तित करतात. हेच काम कोकणातील नद्या फक्त पन्नास शंभर किलोमीटर लांबीत करतात. त्यांची क्षमता इतर नद्यांच्या तुलनेत दहा ते वीस पट जास्त आहे. अशा चक्क २२ मोठ्या नद्या या एवढ्याशा कोकणात आहेत.**



पाणीसाठे, मासे आणि थंडावा धरून ठेवत होते. उष्णता शोषून घेत होते. आता त्यातील बहुतांश खोलगट भागात दगडगोटे भरून ते कोरडे पडायला लागले आहेत.

इतर ठिकाणच्या नद्या हजार दोन हजार किलोमीटरच्या प्रवासात कठीण कातळाला भरडून, रगडून गोटे, वाळू किंवा चिखलात परिवर्तित करतात. हेच काम कोकणातील नद्या फक्त पन्नास शंभर किलोमीटर लांबीत करतात. त्यांची क्षमता इतर नद्यांच्या तुलनेत दहा ते वीस पट जास्त आहे. अशा चक्क २२ मोठ्या नद्या या एवढ्याशा कोकणात आहेत.

## चुकीच्या जलसंधारण योजना

'आमच्या दहाडात बंधारा व्हायच्या आधी पानी राहायचा. बंधारा जाला आन दहाड गोट्यानी ओहरला मनून बोलतो बंधारा जाला-आनी पानी पलाला'. चासगावच्या म्हातारबुवांनी मला त्यांच्या नदीची तिच्यातल्या दहाडाची कथा सांगितली. अशा अडथळ्यांनीही पाणीटंचाई निर्माण होते हे साधारण दहा वर्षांपूर्वी मला पालघर जिल्ह्यातील, मोखाड्यातील चास या गावात कळले. त्यावर आरोहन संस्थेने उपाय केला. त्या आधी आणि नंतरही मोखाडा, शहापूर, मुरबाड, माणगाव, तळे, महाड, श्रीवर्धन, म्हसळा व सुधागड या तालुक्यांच्या डोंगर भागातील पाणी टंचाईवर अनेक संस्थांच्या सहभागातून मदत करू शकलो.

'पाणी अडवा पाणी जिरवा' किंवा 'माती अडवा पाणी जिरवा' मोहिमा यांचे उद्दिष्टच मुळी वाहत्या पाण्याचा वेग तोडणे हा होता. धावते पाणी चालते करा, चालते पाणी रांगते करा, रांगते पाणी थांबते करा, थांबते पाणी जिरते करा. अशा पद्धतीने भले राजस्थानातल्या किंवा नगर जिल्ह्यातल्या गावांना फायदा झाला असेल. पण अशा प्रकारे वेग तोडलेले पाणी गाळ गोटे माती रेती अडवून पात्राची खोली व परिणामी वहनक्षमता कमी करते, याकडे या जलतज्ज्ञांचे आणि वॉटरशेड डेव्हलपमेंटवाल्यांचे लक्षच गेले नाही. याने परिस्थिती गंभीर होऊ लागली. चेक डॅम, धरणे आणि बराज हेही नद्यांच्या मार्गातील अडथळेच होय.

## बंधारे व अडथळ्यांमुळे येणारे पूर

पण या अडथळ्यांनी कोकणातील नद्यांना पूर येतात हे मात्र सिंधुदुर्गातील कणकवली जवळच्या नाटळ गावच्या नदीत व रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर जवळच्या विघ्रवली गावच्या सानवी नदीत पाहायला मिळाले. तेथील पूर तसे सामान्य होते. तिथून जवळच असलेल्या कडवई या गावातही नदीतल्या गोट्यांमुळे पाणी टंचाई झालेली



पाहायला मिळाली. तिथल्या अनुक्रमे विश्वनाथ सावंत, भालचंद्र सावंत व सहकारी आणि प्रा. कमलाकर इंदुलकर आणि सहकारी आणि कडवईच्या उमलती पृथ्वी फाऊंडेशनच्या अख्तार मोडक, इरफान चिक्ते आणि इतर ग्रामस्थ यांनी त्यावर काही उपाय केले. त्यांना सर्वांना नाम फाऊंडेशनने मदत केली.

मग रत्नागिरी जिल्ह्यातीलच साखरप्याहून बोलावणे आले. कोंडगाव साखरप्यातील लोकांना काजळी नदी गेली ७० वर्षे दरवर्षी पुराचा तडाखा देत होती. याही पुरांचे कारण मानवनिर्मित होते. पण ७० वर्षे हतबुद्ध होऊन कोंडगावकर त्या पुराला सहन करत होते. सरदेशपांडे व आठल्ये कुटुंबीय व श्रीधर कबनूरकर यांच्या संयुक्त नेतृत्वाखाली श्री दत्त देवस्थान ट्रस्ट आणि गणेश मित्रमंडळ यांनी नाम फाऊंडेशनच्या महत्त्वपूर्ण मदतीने व अनेक नागरिकांच्या आर्थिक पाठिंब्यावर सत्तर वर्षांची पुरांची मालिका यशस्वीरीत्या खंडित केली आहे. या वर्षीच्या उन्हाळ्यातही नाम आणि मानवलोक यांच्या साहाय्याने कोंडगाव-साखरपेकरांनी आणखी मजबुती करून घेतली आहे. याविषयी अधिक माहिती जाणून घेण्यासाठी इच्छुकांनी 'गोष्ट साखरपा कोंडगाव बाजारपेठेची' हा जलसंवाद मधील लेख वाचावा ... (web Link... https://jalsamvad.com/magazines/october-२०२१/ पृष्ठ ५ ते ७).

त्यांच्या उदाहरणावरून स्फूर्ती घेऊन शाहनवाज शहा, रामशेठ रेडीज, नाम संस्थेचे कोकण समन्वयक समीर जानवलकर आणि अनेक चिपळूणकर नागरिकांनी पुढाकार घेऊन शीव नदीतील गाळ काढला. या वर्षी चिपळूणच्या पुराची तीव्रता कमी झाली. जास्त जाणून घेण्यासाठी इच्छुकांनी श्री मकरंद अनासपुरे यांचा पुढील व्हिडिओ पाहावा. (https://www.youtube.com/watch?v=oYgcjJYq6šU ... ).

महाडच्या पुराला कारणीभूत होणाऱ्या तीन नद्या, सावित्री, काळनदी आणि गांधारी. यात मोठा वाटा काळनदीचा. साखरप्याच्या यशाचा कित्ता गिरवण्याचे या नदीतीरावरील शशिकांत उतेकर, चंद्रकांत उतेकर, शशिकांत कालगुडे आणि वाळण खोऱ्यातील व महाडमधील काही नागरिकांनी ठरवले. तहसीलदार, कलेक्टर, जलसंपदा खात्यातील अधिकारी, आमदार भरतशेठ गोगावले, आदितीताई तटकरे तसेच खासदार सुनिल तटकरे, यांच्याकडे सातत्यानी पाठपुरावा केला. साधारण अडीच-तीन किलोमीटर पट्ट्यातील मानवनिर्मित गोट्यांचा अडथळा स्वच्छ केला.

महाड प्रशासनानेही सावित्री पात्रात काही कामे केली. या वर्षी वाळण खोऱ्यात व महाडला पूर आला नाही. म्हणजे आम्ही





काळ्या प्रस्तरातील बोगदे



जांभ्या प्रस्तरातील बोगदे



पाण्याला पसरू न देता वाहू दिले. मोकळ्या कोंडींमध्ये आवश्यक पाणीसाठा झाल्याने पाणीटंचाई काही झाली नाही.

## कोकण रेल्वे, नद्या आणि पूर

नंतर एक मोठी मालिका घडली. तिचे नाव 'कोकण रेल्वे'. इंजिनिअरिंग क्षेत्रातले अभियांत्रिकीतील हे वंडर किंवा आश्चर्य जरी असले तरी त्याचा साईड इफेक्ट म्हणजे नद्यांच्या भरलेल्या कोंडी. शेकडो किलोमीटर लांबीच्या या रेल्वे लाईनमध्ये अनेक बोगदे. शेकडो मीटर लांबीचे, पाच सहा मीटर रुंदीचे आणि आठ मीटर उंच असे हे बोगदे. हे खोदताना मोठ्या प्रमाणावर दगड मुरूम आणि माती निघाली. ती तिथेच दोन्ही टोकांना ढिगारा मारून ठेवली गेली. वेगाने जाणाऱ्या मेल-एक्सप्रेसचे हादरे आणि जोरदार पर्जन्यवृष्टी यामुळे हे ढिगारे घसरत घसरत उताराला लागले. आधी ओहोळ, मग ओढे नंतर छोट्या नद्या असा प्रवास करत साधारण २००५-२००६ च्या आसपास ते मोठ्या नद्यांमध्ये पोहोचले. कोंडी भरल्या. नद्यांची वहनक्षमता कमी झाली. नद्यांनी काठांवर अतिक्रमण केले. तोडलेले डोंगर उताराआधीच हलके झाले होते. तेही उतरून नदीत गेले. शेतीचे बांध तुटले. शेतीही नदीत वाहून गेली.

करबुडे बोगद्याजवळून किती प्रचंड प्रमाणात डोंगर फोडावा लागला आहे याचा अंदाज या छायाचित्रावरून समजून येईल बोगद्याच्या दहापटीहून जास्त तर त्याच्या आत जाण्याचा रस्ता आहे ...कुठे गेले हे सगळे दगड खंड? शेजारच्या बाव नदीत. हे शेती वाहून गेलेल्या, घरे बुडणाऱ्या, सर्वहारा ग्रामस्थांना माहिती आहे. आणि कळते आहे. पूर्वी जिथे वीस तीस फूट पाणी उन्हाळ्यातही असे तिथे आता एक इंचही पाणी डिसेंबर महिन्यातही पाहायला मिळत नाही अशी परिस्थिती आहे.

आता थोडा पाऊस झाला तरी नद्या आपले काठ सोडून शेतात, गावात, शहरात घुसतात. जणू त्यांना सांगायचे असते, त्यांच्या अंतरातले दुःख, तीरावरच्या माणसांना. पण बहुतेक माणसांना नदीची भाषाच समजत नाही. वर्ष-दोन वर्षाकरिता कोरड्या दुष्काळी प्रदेशांमधून येणाऱ्या आणि बदलून दुसरीकडे जाणाऱ्या अधिकाऱ्यांना आणि इतरत्र काम करणाऱ्या, फक्त इंग्रजी पुस्तकातून पर्यावरण वाचणाऱ्या पर्यावरणवाद्यांना मात्र हे समजत नाही.

(लेखक हे वनस्पतीशास्त्राचे संशोधक तथा पर्यावरणपूरक आधारित पद्धतीने घनकचरा व्यवस्थापन विषयाचे तज्ज्ञ आहेत.)

# गोष्ट एका नदीची

शैलजा देशपांडे

नदी म्हटले की, आपल्या सगळ्यांच्या मनात पहिले नाव येते ते गंगा नदीचे. ते अगदी साहजिकच आहे. आपल्या संस्कृतीत गंगा नदीला सर्वोच्च स्थान दिले गेले आहे. तितकेच महत्त्व सिंधू नदीलाही आहे. सिंधू संस्कृतीप्रमाणेच अजून तीन संस्कृती आहेत. त्या म्हणजे इजिप्त, मेसोपोटेमिया आणि चीनी संस्कृती. या सगळ्यांमधील समान धागा म्हणजे त्याचे नदीशी असलेले अतूट नाते. उदा. इजिप्तची नाईल, चीनची यलो रिव्हर, मेसोपोटेमियामधील युफ्रातीस आणि तैग्रिस नद्या.

खरंतर मेसोपोटेमिया याचा अर्थच 'बिटवीन द रिव्हर्स' असा आहे. माणसाने जेव्हा शिकार करायची सोडून दिली आणि शेती करायला लागला आणि एका जागी समूहाने स्थिर होऊ लागला त्यावेळी विविध नद्यांच्या खोऱ्यांमध्ये विविध संस्कृतींचा जन्म झाला.

## मुठा नदीची प्रातिनिधिक गोष्ट

पुण्याच्या पश्चिमेला टेमघर धरण लागते. त्याच्या मागील बाजूस एक वेगरे नावाचे गाव आहे. हेच मुठेचे उगमस्थान आहे. अंबी आणि मोशी या मुठेच्या उपनद्या. ज्यांच्यावर पानशेत आणि वरसगाव ही धरणे बांधलेली आहेत. या धरणांच्या पुढील प्रवाह मुठा नदीच्या प्रवाहामध्ये मिसळतो. त्यावर पुढे खडकवासला धरण बांधलेले आहे. या धरणातूनच पुणे शहराला पाणीपुरवठा होतो. पुढे एन डी ए, वारजे, विठ्ठल मंदिर, राजाराम पूल, लाकडी पूल, बालगंधर्व पूल, शिवाजी पूल, संगम पूल असा शहरातून नदीचा प्रवाह आहे. संगम पुलाच्या जागी मुठा आणि मुळा नदीचा संगम आहे. आपल्या संस्कृतीत दोन नद्यांचा संगम ही एक पवित्र जागा मानली जाते, त्याप्रमाणेच मुळामुठा संगम हीसुद्धा पवित्र मानली गेलेली जागा होती. पुण्याचे नावच या नद्यांच्या संगमा मुळे पडले. पुण्यविषय, पुनवडी आणि पुढे पुणे असे शहराचे नाव मिळाले.

**नद्यांना संस्कृतीची जननी म्हटले गेले आहे. हे आजच्या आधुनिक समजल्या जाणाऱ्या तंत्रयुगातसुद्धा तितकेच खरे आहे. फक्त आज आपला प्रत्यक्ष नदीशी संपर्क तुटल्यामुळे आपल्याला हे जाणवत नाही. त्यामुळेच नदीच्या प्रश्नांकडे आपले दुर्लक्ष होत आहे. पुण्यातल्या मुठा नदीच्या प्रातिनिधिक गोष्टीवरून नद्यांचा ऱ्हास कसा होतो, हे समजू शकेल.**





मुळा मुठा एकत्र वाहत जाऊन पुढे भीमा नदीला मिळतात. भीमा पुढे कृष्णेला मिळते आणि अखेर आंध्र प्रदेशात बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते. हा पूर्व वाहिनी मुठा नदीचा साधारण ११०० किलोमीटरचा प्रवास!

हे सगळे कळले तरी एक महत्त्वाचा प्रश्न येतोच! मुठा नदीचे वय काय?

जिओलॉजिकल हिस्टरीनुसार मुठा नदीच अंदाजे वय हे एक ते दीड कोटी वर्षे असावे. होय, किमान एक कोटी वर्ष. आणि आपण आज ज्या पात्रातून ती वाहते आहे तो निदान दीड ते दोन लाख वर्षांपासून असाच आहे. म्हणजे नदीचा प्रवाह पण फारसा बदलला नाहीये. एक नोंद घेण्यासारखी गोष्ट म्हणजे मुठा नदी ही गंगा नदीपेक्षाही वयाने मोठी आहे! पण दुर्दैवाने गंगेला मिळते त्याच्या एक शतांशही महत्त्व पुणेकर मुठेला देत नाहीत.

## मुठा नदीवरचा पहिला पूल

१७६१ मध्ये लकडी पूल बांधला गेला. मूळचा पूल खरोखरच लाकडी होता त्यामुळे हे नाव पडले. १८४० मध्ये नदीला मोठा पूर आला होता त्यात तो पडला. मग ब्रिटिशांनी दगडी पूल बांधला.

गमतीची गोष्ट म्हणजे १८१० मध्ये दुसऱ्या बाजीरावाने लकडी पुलाच्या अलीकडे एक धरण बांधायचे ठरवले होते. पुराचे पाणी थेट लकडी पुलाच्या खांबांवर धडकू नये यासाठी ही योजना होती. पण ती प्रत्यक्षात आली नाही.

१२ जुलै १९६१ हा दिवस पुणेकरांसाठी काळ दिवस ठरला. पानशेत धरण फुटले. ज्या धरणांवर पुण्याचा पूर्ण वर्षाचा पाणीपुरवठा अवलंबून होता ती धरणे (खडकवासला आणि पानशेत) दोन दिवसांत रिकामी झाली होती. अतोनात जीवितहानी आणि साधन संपत्तीचे नुकसान झाले. पण तरीही त्या वेळेला नदीला येऊन मिळणारे ओढे आणि झरे प्रदूषित नसल्याने पाण्याच्या उपलब्धतेचा प्रश्न मोठा झाला नाही. त्या वर्षी पुण्याची बरीच तहान ही किरकट वाडीच्या आणि इतर छोट्या मोठ्या ओढ्यांनी भागली.

आज पर्यावरण बदलामुळे जर धरणातील पाणी संपले, तर तोही पर्याय आपल्याला प्रदूषणामुळे उपलब्ध नाही. पानशेतच्या पुरानंतर पुणे हळूहळू सावरले. जनजीवन पूर्वपदावर आले. हळूहळू पुण्याची लोकसंख्या वाढत होती. पण दुर्दैवाने मुठा नदीची परिस्थिती मात्र टप्प्याटप्प्याने खालावतच गेली.

आताची यादी पहिली तर आपल्या नद्या का जिवंत नाहीत याचा पुरावाच मिळतो. पुण्याचा विचार केला तर नद्यांवरचे पूल गंमत म्हणून मोजून पाहा. एक पूल म्हणजे प्रवाह थांबवून केलेले डबके. त्यात भर पडत आहे ती नदी काठी वाढत जाणारे मोठमोठे स्मशान घाट, नदी पात्रात घातलेल्या ड्रेनेज पाइपलाइन, प्रक्रिया न करता रोज प्रवाहात सोडले जाणार सांडपाणी, नदीपात्रात झालेली आणि आजही होत असलेली अनिर्बंध अतिक्रमणे, ओढे नाले यांमधून वाहत येणारा घनकचरा आणि प्लास्टिक, आपल्या घरातून आणि कारखान्यांमधून नदीच्या प्रवाहात रोज मिसळली जाणारी रसायने, कचराकुंडी झालेले नदीचे किनारे. हे कमी की काय म्हणून नदी पात्रात रस्ते, नदी पात्रात मेट्रो आणि नदी काठ सुशोभीकरणासारखे प्रकल्प. या सगळ्या गोष्टीत फक्त मानवकेंद्रित विचारच दिसतो. ही एक अत्यंत खेदाची बाब आहे. आणि जागरूक आणि संवेदनशील समजल्या जाणाऱ्या आपण नागरिकांच्या दृष्टीने तर ही एक शरमेची गोष्ट आहे.

## मुठेकाठचे घनदाट अरण्य

मग एवढ्या प्राचीन काळी मुठेच्या काठी तसेच इतर नद्यांच्या काठीसुद्धा काय असावे? तर मुठे काठी होत एक जैवविविधतेने नटलेल घनदाट अरण्य. इतके समृद्ध की हत्तीसारख्या अवाढव्य प्राण्यांनादेखील आसरा मिळू शकत होता. डेक्कन कॉलेजच्या पुरातत्त्व विभागाने यावर अतिशय महत्त्वपूर्ण आणि पुराव्यासहित संशोधन केले. या मुठेच्या आजुबाजूला एके काळी हत्तींचे कळप वावरत होते. याचे जीवाष्मांच्या स्वरूपात पुरावे मिळाले आहेत. तसेच ऑरिच नावाच्या गायी-म्हशीसारख्या दिसणाऱ्या पण त्यापेक्षा अवाढव्य अशा प्राण्याचेदेखील फॉसील मिळालेले आहेत. हा प्राणी आता नामशेष झाला आहे.

हे झाले इतर प्राण्यांबद्दल. पण मनुष्यप्राणी येथे कधी आला? पुण्याच्या भागात भातशेती केली जात होती. आज हे सगळ इमॅजिन करणेसुद्धा खूप अवघड आहे.

## मुठेकाठचा पुण्याचा इतिहास

पूर्वी पुण्येश्वर आणि नारायणेश्वर अशी दोन यादवकालीन मंदिरे होती. काही लोकांचे मत आहे की, या पुण्येश्वर मंदिरामुळेच या शहराला पुणे हे नाव मिळाले. पुढे अल्लादिन खिलजीने यादव राजा रामदेव याचा पराभव केला. त्या काळात ही मंदिरे पाडून थोरला आणि धाकटा शेखसल्ला असे दोन दर्गे बांधण्यात आले. यादवकालीन घाटाचे अवशेष अजूनही तिथे दिसतात. त्या नंतर साधारण ३५० वर्षे मुठा काठी फारसे काही घडले नसावे.

१७व्या शतकात बडा अरब याने मुठेच्या काठावर एक गढी बांधली त्याला किल्ले



डेक्कन कॉलेजने यावर सुद्धा काही उत्खनने आणि अभ्यास केलेला आहे. त्यानुसार मुठेच्या काठी एक ते दीड लाख वर्षांपासून येथे मानवाची वस्ती असल्याचे आढळून आले आहे. पाषाणयुगीन मानवाची काही हत्यारे / शस्त्रे मिळाली आहेत.

शेतीचे पुरावे मात्र बरेच नंतरच्या काळातील आहेत. म्हणजेच साधारणपणे दोन हजार वर्षांपूर्वीचे. तेव्हा आजच्या अगदी मध्य वस्तीत म्हणजे नारायण पेठ

हिसार किंवा पांढरीचा कोट असे म्हणत. आता सूर्या हॉस्पिटल जिथे आहे, साधारण तिथे हा कोट होता.

शहाजीराजांनी १७व्या शतकात स्वराज्य स्थापण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. मुरार जगदेव या सरदाराने त्यांचा पराभव केला आणि पुण्यातून गाढवाचा नांगर फिरवला. पुणे आता राहणे योग्य नाही असा त्याचा अर्थ होता. त्या काळात बरेच लोक पुणे सोडून गेले.

नंतर छत्रपती शिवाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ जेव्हा येथे राहू लागल्या तेव्हा त्यांनी सोन्याचा नांगर फिरवून लोकांना परत येण्याचे आवाहन केले. हळूहळू पुण्यात परत वस्ती होऊ लागली.

शिवाजी महाराजांच्या काळात आता जी कसबा पेठ आहे तेवढेही पुणे नव्हते. ह्याही काळात नदी काठी काही विशेष घडल्याची नोंद नाही. कारण महाराजांचा जास्त जोर गडकिल्ल्यांवर होता. बहुदा अंबिल ओढा आणि नागझरी ओढा या दोन ओढ्यामुळे पाण्याची गरज भागत होती त्यामुळे नदीवर लोकांचा फारसा वावर नसावा.

१७३६ मध्ये चिमाजी अप्पांनी मुठेकाठी ओंकारेश्वर मंदिर बांधले गेले. त्यानंतर पुढच्या १०० वर्षांत नदीच्या काठावर अनेक मंदिरे बांधली गेली. नानासाहेब पेशव्यांच्या काळात पुण्याला शहराचे स्वरूप आले. त्यांनी पेठांची रचना केली. १७९० मध्ये नाना फडणविसांनी नऱ्हे आंबेगावच्या ओढ्यातले पाणी सदाशिव पेठेत आणि विश्रामबाग वाड्यात आणले. सरदार रस्ते आणि चौधरी यांनी कोंढव्याचा ओढा वळवून रास्ता पेठ, गंज - वेताळ पेठेत पाणी आणले.

पूर्वी अंबिल ओढा शनिवार वाड्याजवळ नदीला येऊन मिळत असे. आता म्हात्रे पुलाजवळ मिळतो. याचे कारण होते, अंबिल ओढ्याला पूर यायचा आणि त्यामुळे खूप नुकसान व्हायचे. शहराच्या विस्तारासाठी त्याचा अडथळा होत होता म्हणून कदाचित हे करण्यात आले असावे. (१७४० आणि १७६१ असे पुण्याचे दोन नकाशे आहेत. १७६१ च्या नकाशात अंबिल ओढ्याचा बदललेला मार्ग )

१९व्या शतकात ब्रिटिशांनी पुणे ही बॉम्बे प्रेसिडेन्सीची पावसाळी राजधानी म्हणून जाहीर केली आणि पुण्याची लोकसंख्या वाढायला लागली.

१८८० मध्ये खडकवासला धरण बांधले. नदीच्या परिसंस्थेवर परिणाम करणारे हे पहिलेच intervention होते. १९०३ मध्ये विश्वेशरय्यांनी flood gates design केली.

**(लेखिका या 'जिवित नदी' चळवळीच्या प्रणेत्या आणि नद्यांच्या ज्येष्ठ अभ्यासक आहेत.)**

# नदी : जीवनदायी परिसंस्था

डॉ. गुरुदास नूलकर

प्राचीन मानव शेतीकडे वळल्यावर आपला गोड्या पाण्याचा वापर वाढू लागला. भटकंती करणारा शिकारी-अन्न संकलक अवस्थेतला माणूस आता शेतीमुळे एका जागी जखडला गेला. शेतीची सुरुवात मोठ्या नद्यांच्या काठी झाली. टिग्रीस आणि युफ्रेटिस नद्यांच्या भोवतालच्या मेसोपोटेमिया प्रदेशात मोठ्या प्रमाणात शेती सुरू झाली आणि येथेच मोठी गावे वसू लागली. या भागाला संस्कृतीचे पाळणाघर म्हटले जाते. शिकारी अन्न-संकलक मानवाला अन्नाचा साठा करून ठेवणे शक्य नव्हते. पण शेतीत तसे शक्य झाले कारण यात प्रचंड अतिरिक्त (सरप्लस) उत्पादन मिळू लागले. अन्नाचा साठा ही संपत्तीच्या संकल्पनेची सुरुवात होती. ज्याच्याकडे जास्त साठा तो जास्त श्रीमंत. शेत उत्पादकता आणि संपत्ती यांचे नाते स्पष्ट झाल्यावर गोड्या पाण्याचे महत्त्व वाढत गेले आणि आपल्या पूर्वजांना नदीच्या आर्थिक मूल्याची प्रचिती झाली. दुर्दैवाने आजपर्यंत सरकारदरबारी नदीकडे केवळ अर्थचक्रातील एक संसाधन म्हणून पाहिले जाते.

**समृद्ध अन्नसाखळी असलेल्या भूरूपात सौरऊर्जेच्या वापरातून भौगोलिक आणि जैविक घटकांत देवाणघेवाण चालू असते. यालाच परिसंस्था म्हणतात. नदीच्या निर्जीव आणि सजीव घटकातून ऊर्जा आणि पदार्थांची देवाणघेवाण चालू असते. या विनिमयातून पर्यावरणीय सेवा म्हणजे 'इकॉलॉजिकल सर्व्हिसेस' मिळतात. अशा प्रकारच्या अन्योन्यक्रियेत गुंतलेल्या सर्वांच्या योगदानातून सशक्त परिसंस्था बनते.**

## नदीची परिसंस्था

समृद्ध अन्नसाखळी असलेल्या भुरूपात सौरऊर्जेच्या वापरातून भौगोलिक आणि जैविक घटकांत देवाण-घेवाण चालू असते. यालाच परिसंस्था म्हणतात. नदीत पाणी, दगड, माती, वाळू, चढ-उतार, खाचखळगे असे अनेक निर्जीव घटक असतात. त्यांच्याबरोबर काठावरची झाडेझुडपे, गवत, पाणथळ वनस्पती, मासे आणि जलचर सजीव असतात. नदीच्या निर्जीव आणि सजीव घटकातून ऊर्जा आणि पदार्थांची देवाणघेवाण चालू असते. या विनिमयातून पर्यावरणीय सेवा म्हणजे 'इकॉलॉजिकल सर्व्हिसेस' मिळतात. अशा प्रकारच्या अन्योन्यक्रियेत गुंतलेल्या सर्वांच्या योगदानातून सशक्त परिसंस्था बनते.

नदी एक विशिष्ट प्रकारची परिसंस्था आहे, कारण त्यात पाण्याच्या माध्यमातून ऊर्जेचा प्रवाह चालू असतो. उंच डोंगरात पडणारा पावसाचा थेंब जेव्हा दूर समुद्राला जाऊन मिळतो, तेव्हा वाटेत येणाऱ्या माती आणि दगडाची झीज करीत तो पुढे जातो. त्या पाण्याला उगमाजवळ मोठमोठे दगड हलवण्याची ताकत असते आणि हजारो किलोमीटर दूर माती आणि गाळ वाहून नेण्याची क्षमता असते. यामुळे वर्कस भागावरून पोषणयुक्त गाळ पठारावर पसरला जातो.

## भारतीय नद्यांची ओळख

हिमालयात उगम पावणाऱ्या आपल्या नद्या बारमाही आहेत, तर भारताच्या द्वीपकल्पावरच्या नद्यांना पर्जन्यमानातून



मिळणारे पाणी हंगामी आहे. पण या व्यतिरिक्त नद्यांना झऱ्यातून भूजलाचे स्रोतही येऊन मिळतात आणि नदीला वर्षभर थोडेफार पाणी असते. याला 'बेस फ्लो' म्हणतात. जमिनीत मुरलेल्या पावसाच्या पाण्याचा प्रवाह जमिनीखाली चालू असतो. हा प्रवाह नदीपर्यंत पोहोचायला काही काळ जातो. हा अदृश्य प्रवाह म्हणजे बेस फ्लो. म्हणजेच नदी आणि भूजलाचा घनिष्ठ संबंध असतो. म्हणून पूर्वी नद्यांना वर्षभर पाणी राहत असे, पण धरणामुळे आणि भूजलाचा भरमसाठ उपसा झाल्याने बहुतांश झरे कोरडे पडले आहेत. आज आपल्या नद्या शहराच्या सांडपाण्याने बारमाही झाल्या आहेत.

भारताच्या प्लेटचा मोठा भाग पूर्वेकडे झुकला आहे. नर्मदा, तापी, साबरमती अशा काही मध्यम लांबीच्या आणि सह्याद्रीच्या पश्चिमेच्या छोट्या नद्या सोडल्या तर इतर नद्या पूर्वेला जाऊन मिळतात. हिमालयात उगम पावणाऱ्या काही नद्या पश्चिमेकडे, म्हणजे पाकिस्तानातून अरबी समुद्रात विलीन होतात. नद्यांच्या प्रवाहाच्या दिशेवरून देशातील पावसाच्या विभाजनाची रेष काढता येते *(आकृती पाहा)*. या रेषेच्या पूर्वेकडे पडणारा पाऊस बंगालच्या महासागरात जातो आणि पश्चिमेला पडणारा अरबी समुद्रात. गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा, महानदी, गोदावरी, कृष्णा, पेन्नार, कावेरी या मोठ्या नद्या लाखो वर्षे गाळ आणत असल्यामुळे पूर्व किनारपट्टीच्या क्षेत्रफळाचा



विस्तार होत आहे *(आकृती पाहा)*. पण आज या नद्यांवर धरणांची शृंखला आहे आणि आता गाळ येण्याचे प्रमाण कमी झाले आहे.

आज भारतात ५,७४५ मोठी धरणे आहेत. त्यापैकी २,३५४ महाराष्ट्रात आहेत. धरणामुळे नदीच्या परिसंस्थेत एक मोठा बदल होतो. धरणाने वाहत्या पाण्याच्या परिसंस्थेचा (लेंटिक इकोसिस्टिम) अचल पाणीसाठा (लोटिक इकोसिस्टिम) होतो. निसर्गात दोन्ही परिसंस्थांमधील वनस्पती आणि सजीव काही प्रमाणात वेगळे असतात आणि त्यांची नैसर्गिक उत्पादकताही भिन्न असते. कोयना, पानशेत, वरसगाव अशी सह्याद्री पर्वतरांगेतील धरणे खोल आहेत, पण उजनी, जायकवाडी सारखी काही उथळ आहेत. खोल धरणात खालपर्यंत ऊन पोहोचत नसल्यामुळे वनस्पती जवळजवळ नसतात आणि उन्हाळ्यामध्ये पाणी आटल्यावर काठ ओसाड दिसतात. त्याउलट उथळ काठाच्या धरणाला भरपूर सूर्यप्रकाश मिळाल्याने तिथे 'वेटलँड' म्हणजे पाणथळ भाग तयार होऊन भरपूर वनस्पती उगवते. याचा परिणाम म्हणजे उथळ जलाशयात वैविध्यपूर्ण जलचर असतात.



भारताच्या नद्या आणि पर्जन्य विभाजन

## अर्थव्यवस्थेतील नदीचे मूल्य

पृथ्वी ७० टक्के पाण्याने व्याप्त असली तरीही हे पाणी मानवाच्या थेट उपयोगाचे नाही. आपली गोड्या पाण्याची गरज नदी, हिमनदी, तलाव आणि भूजल स्रोतातून पुरवली जाते. पाण्याचा सर्वाधिक वापर शेतीत होतो, नंतर घरगुती आणि औद्योगिक वापर असतो. त्यामुळे नदीचे अर्थव्यवस्थेत सर्वात मोठे योगदान म्हणजे पाणीपुरवठा. भारतात पाण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे कारण आपली ५८ टक्के जनता शेती आणि शेतीजन्य व्यवसायात कार्यरत आहे. पण हवामान बदलामुळे शेतीचे उत्पन्न धोक्यात आले आहे. जागतिक तापमान वाढीमुळे काही दुष्काळी भागात पूर परिस्थिती निर्माण होत आहे, तर मुबलक पाण्याच्या ठिकाणी टंचाई झाली आहे. दोन्ही गोष्टींचा शेतीवर आणि सामाजिक जीवनावर विपरीत परिणाम होतो. त्याच बरोबर अनेक शहरांना दरवर्षी पाण्याचा तुटवडा होत आहे. बंगलूरू, जमशेदपूर, कानपूर, विशाखापट्टणम या शहरात नद्या असूनही पाणी पुरेसे नाही. आपल्याकडे मागणी, पुरवठा, पर्जन्यवृष्टी, बाष्पीभवन या आकडेवारीवर पाण्याचे नियोजन होत नाही, तर राजकीय अंगाने होते. दर उन्हाळ्यात शहर आणि ग्रामीण भागात पाण्याचे वाद पेटतात आणि चढाओढ चालू होते. उपलब्ध पाण्याचा विचार न करता आणि पीक नियोजनाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून घेतलेले निर्णय कधीच योग्य ठरत नाहीत. गेल्या अनेक वर्षांच्या अनुभवातून आपण काहीच शिकलो नाही. अयोग्य निर्णयामुळे पाणीपुरवठ्याचे लाभार्थी आणि पाण्यापासून वंचित शेतकरी अशी समाजात दुफळी होते. गेले अनेक वर्षे कावेरीच्या पाणी वाटप प्रश्नामुळे तामिळनाडू आणि कर्नाटकात युद्धपरिस्थिती निर्माण झाली आहे. २०१६ साली या वादाचे रूपांतर दंगलीत झाले आणि बंगलोरच्या आयटी कंपन्या अनेक दिवस बंद ठेवाव्या लागल्या. असोचेमच्या अंदाजाने यातून कर्नाटकाला २५ हजार कोटी रुपयांचा तोटा झाला.

भारतात किमान नऊ नद्यांच्या पाण्यावरून राज्यात अशा प्रकारचे वाद चालू आहेत. याचा आर्थिक भार शेवटी करदात्यांच्या खांद्यावरच टाकला जातो आणि देशाच्या विकासाला बाधा येते.

कोयना वीज निर्मिती प्रकल्प



अर्थव्यवस्थेत नदीचे दुसरे मोठे योगदान म्हणजे वीज निर्मिती. डोंगराळ प्रदेशातील धरणांमधून हायड्रो-इलेक्ट्रिसिटीचे उत्पादन होते. देशातील सुमारे १२ टक्के, म्हणजे ४५,७०० मेगावॅट वीज निर्मिती जलस्रोतातून होते. कोणत्याही औद्योगिक उत्पादनाला वीज अनिवार्य असते, त्यामुळे वीज निर्मितीने नदीचे जीडीपीत थेट योगदान होते. भारतात २०३० सालापर्यंत ७० हजार मेगावॅट हायड्रो इलेक्ट्रिक वीज निर्मिती होणार असल्याचे नियोजन आहे. हायड्रो इलेक्ट्रिसिटी निर्मितीमध्ये भारत आज पाचव्या स्थानावर आहे. याव्यतिरिक्त थर्मल वीज निर्मितीतही गोड्या पाण्याचा प्रचंड वापर होतो.

नैसर्गिक प्रवाह असलेल्या नद्यात मोठ्या प्रमाणात मत्स्योत्पादन होते. आज इतकी धरणे असूनही सुमारे दहा दशलक्ष नागरिक गोड्या पाण्यात मासेमारी करत आहेत. ट्राउट, महाशीर आणि हिलसा सारखे चवीला उत्तम आणि पोषक मासे भारताच्या नद्यांमध्ये आहेत. पण धरणांमुळे त्यांची संख्या कमी होत आहे. धरणे आली की मासेमारी समूहांची उपजीविका बंद होते आणि इतर व्यवसायाच्या शोधात ते शहराकडे वळतात. तरीही धरण बांधताना मच्छीमारांचा कधीही विचार केला जात नाही. शहराच्या सांडपाण्याच्या प्रदूषणाने आज गप्पी आणि तिलापियासारख्या माश्यांच्या विदेशी प्रजातींची संख्या वाढली आहे. स्थानिक प्रजातींसाठी हे उपद्रवी आहेत.

पाणी प्रवाहातील ऊर्जेतून स्थानिक पातळीवर पानचक्कीसाठी उत्तम वापर होतो. यात वीज खर्ची पडत नाही, पाण्याने चाक फिरवून गिरणी चालविली जाते. निसर्गाच्या नियमांचा वापर करून हे उपयुक्त तंत्रज्ञान काही शतकांपूर्वी विकसित झाले. आजही या पाणचक्या हिमालयातील गावागावांतून आहेत. याव्यतिरिक्त नदीतून बांधकामासाठी वाळू, पर्यटन, माल वाहतूक आशा अनेक सेवा पुरवल्या जातात, ज्यांच्यामुळे अर्थव्यवस्थेला पुष्टी मिळते. आज या व्यवसायांतून लाखो लोकांना रोजगार मिळत आहे.

## निसर्गातील मूल्य

नदीची निसर्गातील भूमिका अर्थव्यवस्थेपेक्षा कित्येक पटीने जास्त आहे. पण यांचे आर्थिक मूल्यांकन केले जात नाही, म्हणून हे योगदान दृष्टिआड राहते. नदीतून मिळणाऱ्या पर्यावरणीय सेवांमधून पृथ्वीला सजीव सृष्टी पोसण्याची क्षमता प्राप्त होते. सौरऊर्जेने वनस्पती आपले खाद्य बनवतात आणि नदी त्यांना पाणी पुरवते. याच झाडांची पानझड नदीत होते. जमीन आणि पाण्याची अशी सतत देवाणघेवाण चालू असते. या जैविक मालाचे विघटन होऊन जलचरांना पोषणद्रव्ये उपलब्ध होतात आणि प्रजातींच्या विविध प्रकारांतून पाण्यात अन्नसाखळी तयार होते. शिकारी-भक्ष प्रणालीतून जलचरांची देवाणघेवाण चालू होते. आशा प्रकारे नदीच्या परिसंस्थेत ऊर्जा आणि पदार्थांचा विनिमय चालू असतो. अशा समृद्ध परिसंस्थेतून आपल्याला अनेक पर्यावरणीय सेवा प्राप्त होतात. प्राथमिक जैविक उत्पादन, पोषणद्रव्यांवर पुनर्प्रक्रिया, कार्बन शोषण, जलचक्र, जनुकीय विविधतेचा सांभाळ, जैविक मालावर विघटन प्रक्रिया, स्थानिक हवामानावर नियमन अशा सेवा प्राप्त होतात. आपले अन्न, पाणी, हवा आणि संतुलित हवामानाच्या गरजांची पूर्तता पर्यावरणीय सेवांच्या माध्यमातून होते. नद्या पोषणयुक्त गाळ समुद्रात पोहोचवतात ज्यामुळे समुद्राची जैविक उत्पादकता टिकून राहते. यातील कोणतीही सेवा तंत्रज्ञानाचा वापर करून करावी लागली, तर त्यात प्रचंड खर्च होईल आणि त्यात कार्बन उत्सर्जन अनिवार्य असेल.

पृथ्वीतलावावर नद्यांचे क्षेत्रफळ अत्यल्प असले तरी जागतिक कार्बन शोषणामध्ये (कार्बन सिक्वेस्ट्रेशन) त्यांची मौलिक भूमिका आहे. नदीच्या स्वच्छ पाण्यामध्ये फायटोप्लँक्टन नावाच्या सूक्ष्म एकपेशीय वनस्पती असतात. इतर वनस्पतींप्रमाणे त्या प्रकाश संश्लेषण करून आपले अन्न बनवतात. त्यासाठी फायटोप्लँक्टन पाण्यातून कार्बन डायऑक्साइड घेतात आणि त्याचे रूपांतर बायोमास म्हणजे जैविक मालात करतात. या विनिमयातून पाण्यातील कार्बन डायऑक्साइड कमी होतो आणि हवेत व पाण्यात कार्बन घनतेचा फरक (ग्रेडियंट) निर्माण होतो. या ग्रेडियंटमुळे हवेतून नदीत कार्बन शोषण होते. पृथ्वीवर सर्वाधिक कार्बन शोषण समुद्रातील फायटोप्लँक्टन कडून होतं, पण स्वच्छ पाण्याच्या नद्यांतूनही ही सेवा मिळते. या पद्धतीचे कार्बन शोषण अतिशय जलद असल्यामुळे जागतिक तापमान वाढ कमी करण्यात समुद्र आणि नदीतील फायटोप्लँक्टनची मोठी भूमिका आहे.

मानवी दृष्टिकोनातून पूर धोकादायक असतो. पण नदीसाठी पूर एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. उगम प्रदेशातून पुढे जाऊन नद्यांच्या भोवताली पुराचे पठार तयार होतात. यांना ‘फ्लडप्लेन्स’ म्हणजे पूरमैदान म्हणतात. नदीला पूर आला की हा भाग जलमय होतो. भूजलासाठी महत्त्वपूर्ण आणि पर्यावरणीयदृष्ट्या अत्यंत उत्पादक असे हे क्षेत्र आहे. पुरातून पोषक आणि सुपीक गाळ वाहून येतो. लाखो वर्षे गंगा आणि यमुनेच्या गाळामुळे उत्तर प्रदेश आणि बिहारमध्ये अत्यंत सुपीक प्रदेश तयार झाला आहे. त्यामुळे हा भाग शेतीसाठी सर्वोत्तम आहे. नदीचा पूर आपल्याला धोकादायक ठरतो कारण नदीच्या निळ्या आणि लाल पूररेषांकडे पूर्णपणे दुर्लक्ष करतो. या रेषा अनुक्रमे २५ वर्षांत आणि १०० वर्षांत येणाऱ्या पुराच्या पातळीप्रमाणे आखलेल्या

आहेत. यांचे उल्लंघन करून बांधकाम केले की, पुराचा फटका बसणार यात शंका नाही.

नदी काठाच्या दोन्ही बाजूला वैविध्यपूर्ण वनस्पती पोसली जाते. याला 'रायपेरियन झोन' म्हटले जाते. पाणवनस्पती, गवत, झुडपे आणि वृक्ष या सर्वांना नदी पोषणयुक्त गाळ आणि पाणी पुरवठा करत असते. त्यामुळे नैसर्गिक रायपेरियन जंगल सशक्त असते. येथे प्राणी, पक्षी आणि जलचरांना अधिवास आणि अन्न उपलब्ध होते आणि मोठ्या प्रमाणात जैवविविधता आढळते. भारतातील नद्यांच्या काठावर अर्जुन, सीता अशोक, करंज, उंबर, वाळुंज असे ठरावीक वृक्ष आढळतात. या भागात 'इकॉलॉजिकल प्रॉटडक्टिविटी' म्हणजे पर्यावरणीय उत्पादकता अत्यंत कार्यक्षम असते आणि यातून कार्बन सिक्वेस्ट्रेशन मोठ्या प्रमाणात होते. निसर्गचक्रात रायपेरियन जंगलांचे इतके महत्त्व आहे की, त्यांना खरंतर आरक्षित करायला हवे. उलट शहरातील नदीकाठ सिमेंट-काँक्रिटचे केले जातात आणि शोभिवंत वनस्पती लावली जाते. यामुळे तेथील पर्यावरणीय उत्पादकता जवळपास शून्य होऊन जाते. मानवी दृष्टिकोनातून केलेले सुशोभीकरण नेहमीच निसर्गाच्या विरोधात जाते.

मोठ्या धरणांच्या मागे पाणी तर अडतच पण पोषक गाळही आडला जातो. या दोन्हीचा पुरवठा बंद झाल्यामुळे धरणाच्या खालच्या भागात वनस्पती आणि जलचरांना जीवनावश्यक पुरवठा बंद होतो आणि नदीच्या नैसर्गिक सेवा कमकुवत होत जातात. अविरत वाहणाऱ्या आणि स्वच्छ नदीचे निसर्गात मोठे योगदान आहे, पण अर्थव्यवस्थेच्या झगमगाटात ते दुर्लक्षित राहते. प्रत्येक नदी सुधार योजनेत फक्त सुशोभीकरण आणि अर्थव्यवस्थेतील भूमिकेचा विचार केला जातो आणि नदीची परिसंस्था बिघडून त्याचा नाला होतो.

## नदी संवर्धन

आज भारतात एकही मोठी नदी अविरत प्रवाहाची आणि स्वच्छ राहिली नाही. काही छोट्या नद्या सोडल्या तर इतर सर्व नद्यांना धरणांच्या शृंखलाच आहेत. प्रत्येक नदीमध्ये सांडपाणी सोडले जाते. फार थोड्या ठिकाणी रायपेरियन जंगल शिल्लक आहे. प्रदूषणाने नद्यांमधील जैवविविधता घटली आहे आणि त्याची जागा वॉटर हायसिंथ (जलपर्णीने) आणि पाणकोबी सारख्या उपद्रवी वनस्पतीने घेतली आहे. यांचे पाण्यावर गालिचे तयार होतात आणि ऊन खाली पोहोचत नाही. हे जलचरांसाठी धोकादायक आहे. त्यांच्या पानांखाली डासांची पैदास मात्र जोमाने होते. पुणे शहराच्या कोणत्याही पुलावरून गेलात तरी मुळामुठेचा घाण वास आल्याशिवाय राहत नाही. नदीला मातेचे स्थान देणाऱ्या देशात नदीचे इतके हाल केले जात आहेत, हे आपल्याच दृष्टीने प्राणघातक आहे. पुण्याचे सांडपाणी मुळामुठेतून उजनी धरणात जाते आणि तेच पाणी वापरून झालेल्या शेतीचे



उत्पादन पुणेकरांच्या ताटात पडते. नदीचे संवर्धन ही मानवाची गरज आहे, हे आपल्या शिक्षणातून कधीही आले नाही. त्यामुळे घाणेरडी, वाशेरी नदी पाहिली तरी आपल्याला काहीही खटकत नाही.

नदी संवर्धनाची जबाबदारी पर्यावरण मंत्रालय आणि सिंचन खात्यावर सोपवणे पुरेसे नाही. शासनाकडून दर वर्षी फक्त आर्थिक तरतूद केली जाते. त्यातून नमामि गंगे, रिव्हरफ्रंट डेव्हलपमेंट, जलपर्णी हटवणे असे प्रकल्प राबवले जातात. नदी संवर्धनाची सुरवात प्रत्येक घरातूनच व्हायला हवी. आधुनिक जीवनशैलीत आपण घरात ढीगभर रसायने वापरतो. अगदी टूथपेस्ट, साबण, शांपू पासून ते फिनेल, धुण्याची पावडर आणि ॲसिडपर्यंत प्रत्येक रसायन शहराच्या सांडपाण्यात जाते आणि पुढे नदीला मिळते. आज गरज आहे आपल्या जीवनशैलीत आमूलाग्र बदल करण्याची. घनकचरा आणि सांडपाणी नदीत जायलाच नको, याची खबरदारी घ्यायची. सिवेज ट्रिटमेंट प्लांटवर कोट्यवधी रुपये खर्च केले तरी एखाद दोन वर्षांतच ते अपुरे पडणार आहेत. त्यांच्यावरचा 'लोड' कमी करून विकेंद्रित पद्धतीने सांडपाणी स्वच्छ करणे हेच योग्य ठरेल.

नदी संवर्धन म्हणजे नक्की काय? नदी संवर्धनाची दोन मुख्य उद्दिष्टे आहेत (अ) नदी आणि माणूस यांचे नाते पुन्हा जुळवणे. एक जीवनदायी परिसंस्था म्हणून नदीकडे पाहण्याचा दृष्टिकोन माणसाला पुन्हा मिळवून देणे (ब) उगमापासून मुखापर्यंत नदीची परिसंस्था नैसर्गिक अवस्थेकडे नेणे. या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी नागरिक आणि प्रशासन या दोन्ही पातळींवर काम केले जाते. प्रशासनाने नदीच्या आर्थिक आणि नैसर्गिक मूल्यांची दखल घेऊन निकोप नदी परिसंस्थेसाठी काटेकोर नियमावली आणि त्याचे पालन करणे आवश्यक आहे. नदी संवर्धनात सुरक्षा, स्वच्छता, जैवविविधता आणि नैसर्गिक प्रवाह या गोष्टींवर एकात्मक स्वरूपाचे काम झाले पाहिजे. तंत्रज्ञान आणि बांधकामाचा कमीत कमी वापर करून नदी संवर्धनाच्या कार्यात नैसर्गिक प्रक्रियांचे अनुकरण केले जाते. सुंदर आणि सशक्त नदी म्हणजे नैसर्गिक अवस्थेतील नदी, हे ध्यानात ठेवून काम केले तरच ते खऱ्या अर्थाने नदीचे संवर्धन होय.

आज जगभरात मोठ्या नद्यांच्या पाणी वाटपाचे वाद चालू आहेत. इस्रायल, सिंगापूर आणि आखाती देशांमध्ये गोड्या पाण्याचा तुटवडा आहे. निर्यात आणि डीसॅलिनेशन प्रकल्पातून ते आपली मागणी पुरवतात. या देशांच्या उत्पन्नाचा मोठा भाग अक्षरशः 'पाण्यात' जातो. सुदैवाने भारताला उत्तम नद्या लाभल्या आहेत. पण केवळ हलगर्जीपणामुळे आपली एकही नदी सुस्थितीत नाही. आपले कोट्यवधी रुपये पाणी शुद्धीकरणात ओतले जातात आणि खऱ्या विकासकामांना पैसा पुरत नाही. यातून बाहेर पडायचे असेल तर नदीच्या मूल्यांची दखल घेऊन आपले तिच्याबरोबर आचरण सुधारणे हीच पहिली पायरी आहे. त्यासाठी पर्यावरण मंत्रालय आणि सिंचन खात्याला नदीचे खरे मूल्य आणि संवर्धनाचे धडे तर द्यायला हवेतच, पण देशातल्या प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखून आपले आचरण बदलले पाहिजे. तरच पुढच्या पिढ्यांना पाणी विकत घेण्याची वेळ येणार नाही!

**(लेखक हे शाश्वत विकास आणि पर्यायी अर्थव्यवस्था या विषयाचे अभ्यासक आहेत. इकॉलॉजिकल सोसायटी पुणे येथे विश्वस्त आहेत.)**

# नद्यांशी संवाद

डॉ सुमंत पांडे

'जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा' हे महाराष्ट्र गीत ऐकताना अंगावर रोमांच उभे राहतात. रयतेच्या राजाने याच भीमा, वरदा, कृष्णा, कोयना इत्यादी नद्यांच्या साक्षीने, सह्याद्रीच्या साहाय्याने स्वराज्याची स्थापना केली. राज्याच्या इतिहासात तो कालखंड स्वर्णिम अक्षराने कोरला गेला आहे. या गीताच्या माध्यमातून महाराष्ट्राची भू-रचना, नद्या, धार्मिक आणि आध्यात्मिक बैठक मनःपटलावर स्पष्ट होते.

मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त नदी संवाद यात्रा आयोजित करून राज्यभरात 'चला जाणूया नदीला' अंतर्गत 'नद्यांशी संवाद' सुरू करण्याची शासनाची भूमिका स्पष्ट केली आहे. ३० सप्टेंबर २०२२ आणि १४ ऑक्टोबर २०२२ या शासन निर्णयाद्वारे शासन आणि समाज यांनी एकत्र येऊन नद्यांची संवाद करणे गरजेचे आहे हे स्पष्ट केले.

मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती गठित करून या नदी संवाद यात्रेचे नियोजन आणि अंमलबजावणीबाबत जबाबदारी या समितीस दिलेली आहे. त्यानंतर १४ ऑक्टोबर २०२२ च्या शासन निर्णयात जिल्हास्तरीय समितीची स्थापना आणि प्रत्यक्ष नद्यांशी संवाद कसा करावा? याबाबत स्पष्टता विशद केली आहे.

**राज्याला पूर, दुष्काळ आणि प्रदूषणमुक्त करणे ही केवळ राज्य शासनाची अथवा केंद्र शासनाची एकट्याची जबाबदारी नव्हे ही संपूर्ण समाजाची जबाबदारी ठरते. समाज आणि शासन या दोघांनी एकत्रपणे आणि समविचाराने काम करणे अपरिहार्य ठरते. म्हणून 'चला जाणूया नदीला' हे अभियान सार्थ ठरवण्यासाठी आपण सर्वांनी त्यात सहभागी होऊ या...**

## नदी संवाद का?

अनादी काळापासून नदी भारतीयांच्या श्रद्धेचे आणि संस्कृतीचे प्रतिक आहे. समर्थ रामदास स्वामींनी सुमारे ३५० वर्षांपूर्वी भारतभर केलेल्या भ्रमणाच्या कालावधीत आलेल्या अनुभवावरून पाण्याविषयी निरीक्षणे दासबोधातील १६व्या शतकात समास ४ मध्ये नोंदवले आहेत. उदाहरणादाखल खाली दुसरी ओवी खाली दिली आहे.

***पृथ्वीस आधार आवर्णोदक ।***
***सप्त सिंधूचे सिंधोदक ।***
***नाना मेघींचे मेघोदक भूमंडळ चालिले ।।***

पृथ्वीला सप्तसिंधूच्या पाण्याच्या आवरणाचे सुरक्षित कवच आहे. अनेक मेघातील मेघोदक पृथ्वीवर वृष्टी करते असे वर्णन केले आहे. वैदिक काळापासून नद्यांचे उल्लेख त्यांच्या नावासकट येतात.

अनेक पुराणात देखील नद्यांचा उल्लेख आहे. दासगणू महाराजांचे १९१९ साली लिहिलेले श्री गोदामाहात्म्य सर्वश्रुत आहे त्याचप्रमाणे नर्मदा, कृष्णा, तापी आणि इतर नद्यांचा देखील उल्लेख पुराणात येतो. नर्मदेची परिक्रमा ही तर अनेकांच्या आयुष्यातील उद्देश आहे. (संतवाणीतील जलसाक्षरता या यशदाने प्रकाशित वाचन साहित्यात याचा



उल्लेख विस्ताराने आहे).

भारतीय संस्कृतीमध्ये नदीला मानवी व्यक्तीचा प्रत्यक्ष मातेचा दर्जा दिलेला आहे. आजही गंगा नदीस गंगाजी, गोदावरीस गोदामाई, नर्मदा नदीस नर्मादामैय्या असा आदराने उल्लेख येतो. असे असताना नदीची ही स्थिती का झाली? याबाबत सर्वांनी अंतर्मुख होऊन विचार करावा लागेल.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांच्या कालावधीमध्ये आपण विज्ञान, तंत्रज्ञान, कला, कृषी आणि अनेक क्षेत्रात प्रगती केली आहे. तथापि नद्यांची स्थिती मात्र अतिशय विकल झालेली स्पष्टपणे दिसते आहे. नद्यांवर होणारे आघात प्रचंड आहेत, प्रदूषण, अतिक्रमण, मातीचे क्षरण आणि भूजलाचा प्रचंड उपसा इत्यादी कारणे या अघातामागे आहेत. या स्थितीस केवळ निसर्ग जबाबदार नाही, तर मानवी प्रवृत्ती, प्रशासनातील समन्वयाचा अभाव आणि उदासीनता. समाजातील आणि प्रशासनातील जलसाक्षरतेचा अभाव देखील तितकेच कारणीभूत आहेत.

## पूर आणि दुष्काळ

राज्यात पूर आणि दुष्काळाची वारंवारता गेल्या काही वर्षांमध्ये वाढल्याचे दिसून येत आहे. याचे प्रमुख कारण म्हणजे अनियमित मान्सून असला तरी जलव्यवस्थापन, मृदा व्यवस्थापन यामधील असलेल्या त्रुटी निश्चित त्यात भर घालतात.

## जलाशये आणि नद्यांवर अतिक्रमणे

पडलेल्या पावसाच्या पाण्याचे वहन करण्यासाठी, प्रत्येक पाणलोटातून ओढे, नाले, नद्या आहेत. अतिरिक्त पाणी यातून नदीच्या पात्रात जातात. तथापि अनपेक्षितपणे मोठा पाऊस आला तर वहन क्षमता घटल्यामुळे मातीचे वाहून जाणे मोठ्या प्रमाणावर वाढले आहे शेतीतील सुपीक मातीचा थर वाहून जातो यामुळे नद्यांचे पात्रदेखील उथळ होतात. कोकणात तर गाळ याचा अर्थ मोठे गोटे, जे डोंगरावरून वाहून येऊन नदी पात्रात पसरतात परिणामी नद्यांचा प्रवाह बदलणे, नागरी भागात पाणी साचणे इत्यादी समस्या पुढे येतात.

मागील काही दशकांमध्ये मातीचे क्षरण प्रमाण दुपटीने वाढले आहे असा शास्त्रज्ञांचा अहवाल आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे, कारण मातीचा एक थर निर्माण होण्यासाठी काही हजारो वर्ष लागतात आणि तो वाहून गेल्यानंतर मातीची सुपीकता जवळपास नष्ट होते. म्हणून रासायनिक खतांचा वापर करून शेती करावी लागते. ज्याचे दुष्परिणाम आज आपण अनुभवतो आहोत. नदीच्या जवळील काही क्षेत्रात जिथे उतार अधिक आहे, अशा ठिकाणी मातीचा क्षरणाचा दर ४४.३७ ते २४१.०३ टन प्रतिहेक्टर प्रतिवर्ष एवढा आधी आहे, तसेच वनआच्छादित क्षेत्रात हे प्रमाण अत्यल्प आहे. (संदर्भ: रिसर्च गेटमधील लेख जानेवारी २०२२)

## नदी आणि जलाशयातील प्रदूषण

जसजसे नागरीकरण आणि उद्योग वाढत आहेत तसतसे तेथे प्रदूषणाची समस्या तीव्र स्वरूप घेत आहे. सर्व महानगरात आणि नगरपालिका आणि पंचायत क्षेत्रात जेथे उद्योगांची उभारणी झालेली आहे तेथे तेथे ही बाब अग्रक्रमावर येते. प्रदूषणामुळे भू-पृष्ठजल तर प्रदूषित होतेच. परंतु, काही ठिकाणी भूजलदेखील प्रदूषित होते आहे. त्यामुळे पिण्यासाठी आणि शेतीसाठी असणारे पाणी अनुपयुक्त होते आणि कुठल्या तरी दूरच्या स्रोतातून पाणी आणण्यात येते. ही अत्यंत गंभीर बाब आहे.



### अभियानाचा उद्देश

- महाराष्ट्रातील नद्या अमृतवाहिनी होण्यासाठी मसुदा तयार करणे.
- अभियान कालावधी: २ ऑक्टोबर २०२२ ते २६ जानेवारी २०२३.
- २ ऑक्टोबर २०२२ रोजी सेवाग्राम वर्धा येथे उपमुख्यमंत्री, वने मंत्री आणि महसूल मंत्री यांचे हस्ते कलश आणि तिरंगा ध्वज देऊन अभियानाचा शुभारंभ.
- संपूर्ण राज्यभरात सुमारे ७५ नद्यांमधून स्वयंस्फूर्त आणि स्वयंप्रेरित स्वयंसेवकांमार्फत यात्रा प्रस्तावित आहे.
- नदी संवाद यात्रा ही केवळ नद्यांची माहिती घेणे अथवा नदीला जाणून घेणे इथपर्यंत मर्यादित न राहता नदीचा सर्व बाजूंनी लोकांच्या सहकार्याने अभ्यास करणे असा असणार आहे.

## भूजलाचा अतिवापर

मागील चार ते पाच दशकामध्ये बदललेल्या पीक पद्धतीमुळे, विशेषतः जास्त पाणी लागणारी नगदी पिके घेण्याकडे कल वाढला आहे. अवर्षणाच्या काळात अथवा ज्या वेळी पर्जन्याचे विचलन अधिक होते. त्या वेळी भूजलाचा आसरा घ्यावा लागतो. परिणामी मोठ्या प्रमाणावर विंधन विहिरी घेण्यात येतात आणि भूजलाचा उपसा मोठ्या प्रमाणात होतो. पिण्याच्या

पाण्यासाठी तर सुमारे ८० टक्के भूजलावर अवलंबून राहावे लागते हे वास्तव आहे. अडचणीच्या काळात हक्काचे स्रोत म्हणून ज्याच्याकडे आपण पाहतो त्याचा वापर केल्यामुळे भूजल भांडार रिकामे होत आहेत.

### जलयुक्त शिवार अभियानातील उपलब्धी

महाराष्ट्रामध्ये २०१२-१३, २०१५-१६ आणि २०१८-१९ या कालावधीमध्ये प्रचंड दुष्काळाला सामोरे जावे लागले. २०१२-१३ आणि १५-१६ च्या दुष्काळामुळे शासनाला काही धोरणात्मक बाबींवर निर्णय घेणे गरजेचे ठरले. सर्वांसाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ या नावाने हे अभियान राज्यभर सुरू झाले. विविध योजनांचे एकत्रीकरण करून (रोहयो, आमदार, खासदार निधी, जिल्हास्तर निधी, अशासकीय संस्था, सीएसआर आणि लोकसहभाग) पाणलोट निहाय, शिवार निहाय कामांचे नियोजन करण्यात आले. निश्चित पद्धतीने पाच वर्षांमध्ये प्रत्येक वर्षी सुमारे ५००० गावे, असे निवडून २४००० गावामध्ये काम केले आहे. *(सविस्तर माहितीसाठी शासन निर्णय ५ डिसेंबर २०१४ पाहावा.)*

महाराष्ट्रातील पाणलोटक्षेत्राचे शास्त्रीय नकाशे सुदूर संवेदन तंत्राचा वापर करून तयार करण्यात आले. याचा उपयोग सूक्ष्म पाणलोटक्षेत्राचा आराखडा करण्यास सुलभता होते आणि अचूकता येते. २०१५ ते २०१९ या कालावधीत केलेल्या कामाचे सकारात्मक परिणाम आता दिसत आहेत. पाणी फाऊंडेशनच्या माध्यमातून झालेले काम शाश्वत आणि परिणामकारक आहे. नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून, मराठवाड्यात आणि कोकणातील अनेक नद्यांवर झालेले कामे उपयुक्त सिद्ध झालेली आहे. भारतीय जैन संघटनेने काही जिल्ह्यातून केलेले काम अत्यंत स्पृहणीय आहे. त्याचप्रमाणे समस्त महाजन परिवाराने जालना जिल्ह्यात केलेले काम तसेच नागपूर जिल्ह्यात केलेले काम आज फलदायी ठरले आहे. टाटा ट्रस्ट, आर्ट ऑफ लिव्हिंगसारख्या संस्थेने झोकून देऊन लोकसहभागाने काम केले आहे. त्याची फलश्रुती आता दृष्टोत्पत्तीस येत आहे.

### नदी संवादातील अभ्यासाची दिशा

राज्याच्या जनतेस पूर आणि दुष्काळाच्या समस्येपासून मुक्ती मिळणेसाठी आणि लोकसहभागाने ही कामे होण्यासाठी नदी यात्रा प्रस्तावित केलेली आहे. यात्रेच्या दरम्यान लोकसहभागातून नदीचा, जलस्रोतांचा, पाणलोटक्षेत्राचा सूक्ष्म अभ्यास करणे आवश्यक आहे. यासाठी या संपूर्ण यात्रेत विविध विभागांचा सहभाग आवश्यक आहे. कोकणासाठी स्वतंत्रपणे विचार केला आहे.

### विषयाची विभागणी

नदीच्या समस्या जाणून घेण्यासाठी शासन आणि नदी अभ्यासक यांच्यातून पुढीलप्रमाणे विषयाची विभागणी असेल. नदीचा अभ्यास गट, नदी निदान गट, नदी समस्या विश्लेषण गट, नदी उपचार गट, नदी क्षेत्रात असलेली शाळा महाविद्यालय, तंत्र महाविद्यालये इत्यादी संस्थामधून विद्यार्थी आणि तज्ज्ञांचा यात सहभाग असेल.

'उन्नत भारत आणि उन्नत महाराष्ट्र' अभियान यात सहभागी असेल. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना अभ्यास प्रकल्प घेता येणार. राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी यात सहभागी असतील आणि लोकशिक्षण.



## नदी की पाठशाला

स्थानिक पातळीवर नदीच्या समस्या आणि त्यातील संभाव्य उपाय, लोकशिक्षणाचा मिलाफ असलेली नदी कि पाठशाला समाजातील विभिन्न घटकासाठी (उदा. शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन विद्यार्थी, महिला, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी, शेतकरी इ.). कृती योग्य अशा बाबींवर कमीत कमी संसाधनावर आधारित नदी की पाठशाला घेण्यात येणार आहे.

## माहितीचे संकलन

माहिती संकलनामध्ये नद्यांचे नकाशे, नदी, पूर रेषा, पाणलोट क्षेत्राचे नकाशे मातीचे क्षरण, पर्जन्याच्या नोंदी, मागील पाच वर्षांतील पूर आणि दुष्काळाच्या नोंदी असतील. लोकांच्या उपजीविकेवर आणि दैनंदिन व्यवहारावर झालेला परिणाम याबाबतची माहिती अभ्यासण्यात येईल. यात्रेच्या दरम्यान तेथील ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपालिका, महानगरपालिका येथे जाऊन वरीलप्रमाणे माहिती नागरिक आणि संबंधित शासकीय यंत्रणा यांच्या सहभागाने घेण्यात येणार आहे.

## ग्रामपंचायत आणि नदी संवाद

नदीसोबत सातत्याने संवाद हा अत्यंत गरजेचा आहे. आपल्या गावात येणारी नदी, आपल्या गावातून जाणारी नदी, आणि गावाबाहेर जाणारी नदी या तीनही स्वरूपामध्ये भिन्नता आढळते का? आपल्या गावातील सांडपाणी आपण कुठे सोडतो?, नक्की नदी तर सोडत नाही ना? या बाबी बघणे गरजेचे आहे. नदीला आपण माता मानतो आणि तिथे आपण जर सांडपाणी आणि कचरा टाकण्याचे साधन म्हणून वापरले, तर जलस्रोत प्रदूषित नक्कीच होतात. बऱ्याच ग्रामपंचायतींना घनकचरा व्यवस्थापनाबाबत अत्यंत अडचणी आहेत. प्रत्येकाच्या घरातून कचरा गोळा करण्यात येतो. तथापि त्या कचऱ्याचे व्यवस्थापन आणि विल्हेवाट कशी लावावी, याबाबत स्पष्टता नसल्यामुळे तो उचलून नदीच्या काठी अथवा नदीच्या पुलाच्या काठी अथवा रस्त्याच्या काठी सर्रास टाकून दिला जातो. त्याचे पर्यवसान प्रदूषणामध्ये होते.

आपल्या ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये काही उद्योग आहेत किंवा कसे? याची माहिती निश्चित असते. त्या उद्योगाच्या जलव्यवस्थापनाची माहिती घेणे ही ग्रामपंचायतीची प्राथमिक कर्तव्याची बाब आहे. प्रत्येक उद्योगाला त्यांच्या जल व्यवस्थापनाबाबत नियमावली आहेत. निर्माण होणारे प्रदूषित पाणी आणि त्यावर उपचार करून त्या पाण्याचा पुनर्वापर करणे. याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने काही अटी टाकून दिलेल्या आहेत. याचा नीट वापर होतो किंवा कसे? हे पाहणेही गरजेचे आहे. अनेक ठिकाणी असेही



निदर्शनास येते आहे की अशा कारखान्यांनी वापरलेले पाणी प्रदूषित होते त्यामध्ये अनेक घातक रासायनिक पदार्थ, ते थेट एक तर नदी पात्रात सोडण्यात येतात अथवा भूगर्भामध्ये बोर करून सोडण्यात येत असल्याच्या घटनाही कानावर येतात. याची सत्यासत्यता पडताळून पाहणे गरजेचे आहे.

## ग्रामविकास आराखडा आणि नदी संवाद

नदीमध्ये राडारोडा, कचरा, घनकचरा आणि सांडपाणी टाकण्यास प्रतिबंध केला पाहिजे असे होत असेल, तर त्याला प्रतिबंध आणि अटकाव कायद्याने केला गेला पाहिजे. ग्रामविकास आराखडा तयार करत असताना या सर्व बाबींच्या नोंदी आणि समावेश आराखड्यात करणे गरजेचे आहे. या नोंदीच्या आधारे उपायोजना निश्चित करून त्यापैकी आपल्या ग्रामीण विकास आराखड्याच्या माध्यमातून किती निधी उपचारांसाठी लागेल. याच्या नोंदी ठेवून त्याचा समावेश ग्रामविकास आराखड्यात केल्यास आपल्या गावापुरता तरी किमान पाण्याचा प्रश्न निकाली निघू शकतो.

## महानगरपालिका क्षेत्रातील नदी संवाद

नगर परिषदा आणि महानगरपालिका हद्दीतील वाहणाऱ्या नद्यामध्ये प्रदूषण आणि अतिक्रमणाचे प्रमाण अधिक आढळते. मैला पाणी शुद्धीकरण संयंत्र आणि तेथील जलव्यवस्थापन यांची माहिती घेणेदेखील महत्त्वाचे आहे. महानगरपालिका आणि नगरपालिकामधून एक नोडल अधिकारी या अभियानासाठी नियुक्त असेल.

## लोकांचा अहवाल

प्रत्यक्ष पाहणीअंती सहभागी स्वयंसेवक तज्ज्ञांच्या सहकार्याने लोकांचा अहवाल तयार करतील. माझी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकारी, पदाधिकारी आणि जनतेला विनंती आहे. नदी यात्रेचे स्वयंसेवक आपल्या ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका अथवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या हद्दीत येतील. त्यांच्याशी चर्चा आणि संवाद करून अचूक माहिती द्यावी आणि आपल्या गावाला पूर आणि दुष्काळापासून दूर ठेवण्यासाठी काय करता येईल, याबाबत निश्चित नियोजन करणे गरजेचे राहील.

नदीवर झालेल्या आघाताच्या कारणांचा अभ्यास करणे, संभाव्य उपाययोजना करण्यासाठी अहवाल तयार करून शासनाला सादर करणे आणि लोकसहभागाने उपाययोजना करण्यासाठी प्रयत्न करणे हे व्यापक उद्दिष्ट ठरवण्यात आले आहे.२६ जानेवारी २०२३ रोजी या यात्रेची सांगता होईल शासन आणि नदीवर काम करणारे व्यक्ती संस्था आणि समाजातील लोक, हे एकत्रितपणे एकाच वेळेस या नदी संवाद यात्रेत सहभागी असणार आहेत. यामुळे शासन आणि समाज एकत्र आल्यानंतर निश्चित सकारात्मक बदल दिसून येईल.

**(लेखक महाराष्ट्र शासनातील निवृत्त साहाय्यक आयुक्त (पशूसंवर्धन) असून, यशदा, पुणे येथील जलसाक्षरता केंद्राचे माजी कार्यकारी संचालक आहेत. 'चला जाणूया नदीला'च्या राज्यस्तरीय समितीतील अशासकीय सदस्य आहेत.)**

# वर्षाचक्र आणि पीकचक्र

**निशिकांत भालेराव**

**हवामान बदल आणि मान्सूनमधील झालेला बदल (उशिरा येणारा मान्सून) याच्याभोवती आपली शेती तिचे नशीब आजमावते आहे. मागील काही वर्षात पाहिले तर नेमका पीक काढणीस तयार असताना येणारा पाऊस आणि होणारे नुकसान सातत्याने दिसत आहे. हे हवामान बदलाचे चक्र सर्व सृष्टीवर आघात करत राहणार आहेच. आपल्याला व आपल्या शेतीला या हवामान बदलाच्या चक्राबरोबर फिरत राहण्यासाठी आपल्या पीकचक्रात काय बदल करता येतो का ते पाहिले पाहिजे.**

महाराष्ट्रातील शेतकरी संकटात आहे. हे संकट काल-आज निर्माण झालेले नाही. वर्षानुवर्षे चुकीची धोरणे, अंमलबजावणीतील ढिसाळपणा, हवामानातील बदल, सदोष कर्जवाटप, अपुऱ्या पायाभूत सुविधा आणि व्यवस्थापन आणि दुष्काळी भागांत भूजलाचा बेसुमार उपसा करणारी बोअरवेल संस्कृती असे अनेक घटक त्यासाठी जबाबदार आहेत. या दुष्टचक्रातून बाहेर पडणे सोपे नसले तरी त्यासाठी योग्य दिशा निवडणे आवश्यक आहे.

## यशस्वी उपक्रम

खुले कालवे आणि पाटांनी पाणी पुरवणाऱ्या मोठ्या खुले सिंचन प्रकल्पापेक्षा गावागावांत विकेंद्रीकृत पद्धतीने आणि स्थानिक सहभागातून शेततळी, विहीर पुनर्भरण, तलावातील गाळ काढणे, नाला खोलीकरण अशा अनेक उपक्रमांतून कास्तकाराच्या शेताजवळ पाण्याची उपलब्धी करणाऱ्या जलयुक्त शिवार प्रकल्प बऱ्याच प्रमाणात शेतकऱ्यांच्या शेतात आणि खिशात हिरवाई करून गेला. नाम तसेच पाणी फाऊंडेशनसारख्या संस्थांद्वारे जलसंवर्धनाच्या कार्यक्रमांस लोकसहभागाची जोड देणे, सामान्य जनतेला तसेच कॉर्पोरेट कंपन्यांना जलयुक्तच्या कामांमध्ये आपापल्या परीने हातभार लावण्यास उद्युक्त करणे असे अनेक उपक्रम हाती घेण्यात आले आणि ते यशस्वीपणे पार पडले.

## पीक पद्धतीत बदल

आजची शेती खूप धकाधकीची झाली आहे. पेरावे कधी काढावे कधी याच्यात सुसूत्रपणा दिसत नाही. पाणी, माती आणि पशुधन या घटकांना केंद्रित ठेवून केली जाणारी शाश्वत शेती आता आपल्या अधिकच्या उत्पादनासाठी एक पीक पद्धती, अधिकच्या निविष्ठा आणि अधिकचे पाणी यांचा भार सोसते आहे. पीक पद्धतीत बदल होणे आवश्यक आहे. हमखास उत्पन्न देणारे ऊस पिकाखालील क्षेत्र वाढते आहे. हलक्या मगदूराच्या जमिनीही ऊस पिकाखाली येत आहेत. हमखास उत्पन्न मिळण्याच्या



खात्रीमुळे एक पीक पद्धती वाढताना दिसते आहे. यात अधिकच्या उत्पन्नापोटी यात मातीचे आरोग्य पाहायला हवे. त्या मातीचा आपल्या पूर्वजांनी कसा सांभाळ केला आणि आपण कसा करतो आहे, आपल्या पुढच्या पिढीला तो कोणत्या स्वरूपात देणार आहोत, याकडे बारकाईने पाहणे आवश्यक वाटते.

आजच्या शेतीत असंख्य प्रश्न आहेत म्हणूनच नवखा शेतीकडे पाय वळवत नाही पण माती, पाणी आणि देशी पशुधन वाचवण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. अन्नदाता टिकला पाहिजे वाढला पाहिजे मोठा झाला पाहिजे, तर आपली पोट भरतील ही भावना मनात खोलवर रुजवली पाहिजे. आजच्या शेतीला प्रामुख्याने भेडसावणाऱ्या प्रश्नात हवामान बदल हा प्रमुख प्रश्न वाटतो आहे. मातीत एक दाणा टाकला तर असंख्य दाणे मिळतील की नाही याची शाश्वती नाही. मिळणारे धान्य लागेल इतके आपल्याला ठेवून उरलेले बाजारात विकायचे, पण आता खायला मिळतेय का नाही, याची खात्री नाही.

## समूह शेतीचा पर्याय

वाढत्या लोकसंख्येमुळे आणि विभक्त कुटुंबपद्धतीमुळे शेतजमिनीचे तुकडे पडत असून जमिनीच्या छोट्या तुकड्यावर फायद्याची शेती करणे शेतकऱ्याला अशक्यप्राय होत आहे. पूर्वी एकत्रित कुटुंब पद्धती आणि एकत्रित शेती अशी परंपरा होती. काळानुरूप ती बदलली आता विभक्त कुटुंब पद्धती त्या कुटुंबाबरोबर शेतजमिनीचेही तुकडे होत आहेत. प्रतिशेतकरी शेतजमीन (अन्नधान्य मिळण्यायोग्य) धारणा कमी होताना दिसत आहे. कागदोपत्री ती एक एकराच्या खाली विभागून मिळत नसेल शेतकऱ्याला मात्र ती विभागून करावी लागते. यातला पुढला धोका काही कालांतराने आता काही गुंठ्यात असणारी जमीन पुन्हा बांधावर येतील आपापले बांध त्या अनुषंगाने आपली जमीन शोधावी लागेल आणि कालांतराने भूमिहीन होतो की काय, असे वाटते.

अत्यल्प जमीनधारणा आणि अधिकच्या उत्पन्नासाठी अधिकच पाणी आणि निविष्ठांचा वापर होतो आहे. पीक फेरपालट, आंतरपीक व मिश्रपीक पद्धतीचा अवलंब दिवसेंदिवस कमी होताना दिसतो आहे. पीक उत्पादनावरील वाढता खर्च आजच्या मिळणाऱ्या बाजारभावाला खाऊन टाकतो आहे. आपले पूर्वज एकमनाने एकदिलाने एकत्रित शेती करत होते त्यात ते एकमेकाच्या शेतात शेतकामासाठी जात असत (वारंगुळा, पैरा, इर्जिक इ.) आज शेतकामासाठी मजूर मिळत नाहीत. मजूर मिळत नसल्याने शेतकाम लांबणीवर पडते आणि नुकसान सहन करावे लागते. याला समूह शेती पर्याय असू शकतो.

## मिश्रपीक आणि आंतरपीक पद्धत

एक पिक पद्धतीचा हट्ट न धरता मिश्रपीक आणि आंतरपीक पद्धतीचा अवलंब यात मातीच्या पोषणाबरोबर अन्नदात्याच्या स्वताच्या पोषणसुरक्षेकडे त्याने लक्ष द्यायला हवे आहे यात कडधान्य (कुळीथ/हुलगा, मटकी, मुग, हरभरा, उडीद, तूर, घेवडा व इतर डाळवर्गीय पिके) भरडधान्य (ज्वारी, बाजरी, नाचणी, राळा, कोदो, वरी, सावा इ.) तेलबिया (करडई, मोहरी, सुर्यफुल, तीळ, भुईमुग, सोयाबीन इ.) यांचा आपल्या शेतात तसेच आपल्या आहारात अंतर्भाव करणे खूप गरजेचे आहे. स्थानिक जैवविविधता टिकवण्यासाठी स्थानिक वाणांना आणि व स्थानिक पशुधानांचा सांभाळ यांना अग्रक्रम देणे गरजेचे आहे.

## हवामान आधारित शेती

हवामान बदल आधारित शेती आणि तंत्रज्ञान यात संरक्षित शेती, काटेकोर शेती यांचा अबलंब होताना दिसतो आहे. पण आज अल्प भूधारकांना हे सर्व आजमावणे कठीण आहे. कधी लांबणीवर पडणारा मान्सून, अतिवृष्टी, गारपीट पीक भरण्याच्या



काळात पावसाचा खंड या घटकांचा परिणाम शेतीवर तसेच शेतकऱ्यांच्या मनावर खोलपणे होताना दिसतो आहे. काही ठिकाणी उशिरा पावसामुळे उशिरा पेरणी, पीक काढणीला आल्यावर अतिवृष्टीने खरीप गेलाच. आता रब्बीची तयारी शेतातील पाण्याचा निचरा आणि खरीप उशिरा म्हणून रब्बी पण उशिरा यात संरक्षित पाण्याच्या सुविधेचा अभाव हे चक्र दिवसेंदिवस बदलत चालल आहे. आपल्याला या बदलाबरोबर आपल्या शेतीत बदल करावे लागणार आहेत. जसे पाण्याचा ताण सहन करणारे वाण आहेत तसे अती पाणी सहन करणारे वाण विकसित करावे लागतील. संरक्षित शेतीचा अवलंब करावा लागले.

## पाणी आणि मातीचे संवर्धन

पाणी आणि माती यांचा विचार करता यांना सुरक्षित ठेवून जैवविविधतेला हानी न करता यांचे संवर्धन करून सुरक्षितपणे पुढील पिढीस देणे हे आपले शेती आणि एकूणच शेतकरी ही संकल्पना वाचवण्यासाठीचे प्रमुख ध्येय असावे. उपलब्ध पाण्याचा ताळेबंद न करता पाण्याचा बेसुमार वापर, भूगर्भातील पाण्याच्या अभ्यास न करता सततचा पाणी उपसा, अधिकच्या हव्यासापोटी मातीवर होणारा रसायनांचा आघात यांचे दूरगामी परिणाम दिसायला सुरुवात झाली आहे मला वाटत हवामान बदल हे एक त्यातीलच एक छोट संकट असावे. माती, पाणी, पशुधन आणि निसर्गातील एकूणच नि:स्वार्थी जीवसृष्टी वाचवण्यासाठी आणि संवर्धित करण्यासाठी प्रयत्न करू.

## माणदेशातील पाणीदार लोधवडे

दुष्काळावर मात करायची तर सरकारी इच्छाशक्तीबरोबरच ग्रामस्थांची तयारीही हवी. प्रभावी उपाय, उपचार, दूरदृष्टीने जलसंधारण कार्यक्रमाची आखणी, अंमलबजावणी केली तर नक्कीच समाधानकारक चित्र पाहायला मिळते. त्यासाठी आपल्याला माणदेशमधील लोधवडे गावाला भेट द्यावी लागेल. दुष्काळी पट्ट्यातील या गावाने नवीन उमेद महाराष्ट्रासमोर ठेवली.

जिल्ह्यापासून (मुख्यालय) पूर्वेस सातारा पंढरपूर राज्य महामार्गावरील ८० किलोमीटर अंतरावर अवर्षणप्रवण माण तालुक्यातील २,०६८ लोकसंख्येचे गाव लोधवडे, चारही बाजूंनी हिरव्यागार टेकड्यांनी वेढलेला सुंदर परिसर पण पावसाचे प्रमाण अत्यंत कमी. गावातील जमीन उथळ ७० टक्के हलक्या प्रतीची व ३० टक्के मध्यम प्रतीची, गावातील सरासरी पर्जन्यमान ४६२ मि.मी. ग्रामीण भागाचा मुख्य व्यवसाय शेती असल्यामुळे गावातील बहुतांश लोकसंख्येचे पोट त्यावर अवलंबून. पावसाचा लहरीपणा अनुभवायला मिळत असला तरी जेवढा पाऊस पडेल त्याचे पाणी गावातच जिरवले व साठवले तर शेतकऱ्यांना केवळ पावसावर अवलंबून राहावे लागणार नाही. प्रतिकूल परिस्थितीवर



मात करण्यासाठी योग्य मार्गदर्शन मिळाले व सामूहिक प्रयत्न झाले तर यावचा कायापालट होऊ शकतो, याचे लोधवडे हे बोलके उदाहरण आहे.

लोधवडे गावात पावसावर आधारित पीकपद्धती असल्याने उत्पादकता वाढीवर मर्यादा होत्या. कायमस्वरूपी सिंचनाची सोय नव्हती. ही सोय करण्यासाठीच लोकसहभागातून शासनाचा पाणलोट विकास कार्यक्रम गावात राबवण्यात आला. त्यामुळे पडीक क्षेत्र फळबाग लागवडीखाली आले. त्याबरोबर कृषी उत्पादनात व वहितीखालील क्षेत्रात वाढ झाली.

## ध्यास जलयुक्त शिवाराचा गाव डोंगरकिन्ही

डोंगराच्या कुशीत लपलेले असले तरी ते गाव संपन्नतेपासून दूरच होते. डोलणारी शिवारे, स्वच्छता, एकी, पैसा या गोष्टी त्या गावापासून चार हात लांब होत्या. एक दिवस गावकऱ्यांना समजले, आपले कुठेतरी चुकतेय. पावसाचे पाणी आडवून जिरवण्याच्या दृष्टीने आपल्या गावाला उत्तम निसर्ग लाभला आहे, पण आपण आजपर्यंत अनभिज्ञच आहोत. पावसाचे पाणी गावच्या जमिनीत जिरले तर विहिरी, कूपनलिका यांना पाणी असेल. त्याचा उपयोग शेतीसाठी होईल. चांगली पिके डोलतील, हातात पैका येईल. झाले, गावकरी कामाला लागले, आपापसातील मतभेद बाजूला ठेवून.. त्यांना सरकारी अधिकाऱ्यांची उत्तम साथ मिळाली. इच्छाशक्ती आणि प्रत्यक्ष काम या मिलाफातून आकाराला आले एक जलसंपन्न गाव. मराठवाड्याच्या बीडमधील पाटोदा या दुष्काळी तालुक्यातील डोंगरकिन्ही.

## बदलेले धोंदलगाव

विविध क्षेत्रांतील संवेदनशील माणसे सामाजिक जाणिवेने चाकोरीपलीकडे जाऊन चांगले उपक्रम राबवत असतील तर ते अधिक परिणामकारक ठरतात. व्यवसायाने अभियंता असलेल्या आनंद असोलकर यांनी मराठवाड्यातील धोंदलगावच्या सर्वांगीण विकासाचा वसा घेतला आणि त्याला साज चढवला तो अभिनेते नाना पाटेकर-मकरंद अनासपुरे यांनी. धोंदलगाव दत्तक घेऊन आदर्श गाव कसे असावे याचे एक रोल मॉडेलच नाना व मकरंद यांनी तयार केले आहे.


**(लेखक हे मुक्त पत्रकार व जलयोद्धा आहेत. तसेच मराठवाडा प्रश्नांचे अभ्यासक आहेत. 'ॲग्रोवन' व 'आधुनिक किसान'चे माजी संपादक आहेत.)**

# नद्या आणि भूजल

**चिंतामणी जोशी**
आयुक्त, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.

**डॉ. चंद्रकांत भोयर**
वरिष्ठ भूवैज्ञानिक

निसर्ग चक्रातील अनेक चक्रांपैकी एक म्हणजे जलचक्र, ज्यामध्ये पाणी हे विविध अवस्थेतुन अव्याहतपणे भ्रमण करत असते. पृथ्वीवरील पाण्याचा एकमेव स्रोत म्हणजे निसर्गाचा पाऊस. जेव्हा हा पाऊस जमिनीवर अवतरतो, साचतो, उताराच्या दिशेने वाहतो, त्याचा पुढे छोटा ओहोळ, नाला, पुढे नदी आणि शेवटी समुद्र असा प्रवास होतो, त्याला आपण भूपृष्ठीय जल अशा नावाने संबोधतो. याच पाण्याचा काही अंश जो जमिनीमध्ये मुरतो, मातीला संपृक्त करतो, त्यामधून काही आणखी खोल झिरपतो आणि झिजलेल्या व भेगायुक्त खडकामंध्ये किंवा जमिनीखालील वालुकामय भागात साठतो व वहन होतो त्यास 'भूजल' असे संबोधले जाते. भू-पृष्ठीय पाण्याचे विसावण्याचे ठिकाण नदी-नाले आणि जलाशये असून भूजलाच्या विसावण्याच्या ठिकाणास जलधर (क्विफर) असे संबोधले जाते. सर्वसाधारणपणे ३० ते ७० फुटापर्यंतचा जलधर, ज्यामधील पाणी विहिरीद्वारे उपसता येते त्यास उथळ जलधर आणि २०० फुटाखालील जलधर, ज्यामधील पाणी विंधन विहिरीद्वारे उपसल्या जाते त्यास खोल जलधर अशा संज्ञा वापरल्या जातात.



नदी आणि भूजल (बेसफ्लो)

## नद्यांमध्ये जिवंत प्रवाह

डोंगरमाथ्यावर पडणारा पाऊस उताराच्या दिशेने जमिनीवरून वाहू लागतो आणि वाहतांनाच सखल भागात त्याच्या सान्निध्यात येणाऱ्या जमिनीत व खडकात मुरतो तो जलधरामध्ये साठवला जातो. जमिनीवरील पाण्याप्रमाणेच भूजलसुद्धा उताराच्या दिशेने भूपृष्ठाखालून वाहतच असते. त्यामुळे जलधराच्या साठवण क्षमतेनुसार जलधर संपृक्त झाल्यानंतर ज्याप्रमाणे जलाशये ओसंडून वाहतात त्याप्रमाणेच जलधरातील भूजल उताराच्या दिशेने वाहते आणि उथळ जलधराच्या माध्यमातून नदी-नाल्यांमध्ये पुन्हा अवतरते. त्यास शास्त्रीय भाषेत 'बेसफ्लो' असे संबोधले जाते. या बेसफ्लोमुळेच पावसाळा संपल्यानंतरही नद्यांमध्ये प्रवाह जिवंत राहतो.

संपृक्त झालेल्या जलधरातील भूजल फक्त नदी-नाल्यांमध्येच अवतरते असे नाही, तर खडकांच्या सांध्यामधून नैसर्गिकपणे जमिनीवरसुद्धा प्रत्यक्ष अवतरते, त्यास आपण निर्झर किंवा झरा (स्प्रिंग) असे संबोधतो. अर्थात झऱ्यांमधून अवतरणारे आणि वाहणारे पाणी हे भूजलाचाच भाग आहे किंबहुना ते भूजलच आहे.

## गंगावतरण

महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील आणि विश्वातील बहुतांश नदीचे उगमस्थान हे अशा झऱ्यांवर स्थित आहे. आपल्या संस्कृतीत त्यास गंगा अवतरणे असे म्हणतो. उदाहरणच द्यायचे झाल्यास गोदावरी नदीचा उगम त्र्यंबकेश्वर येथील ब्रम्हगिरी डोंगरावर आहे. परंतु डोंगरावरून पावसाचे पाणी खडकातील सांध्यांमध्ये गुप्त होते आणि नंतर मध्य डोंगरावर पुन्हा प्रगट होऊन त्र्यंबकेश्वर येथील कुंडामध्ये गोमुखातून पुन्हा प्रगटते.

**भूपृष्ठीय जल जमिनीवरून वाहणारे असल्यामुळे आणि भूजल हे जमिनीखालील खडकांच्या सान्निध्यात असल्यामुळे दोघांच्या रासायनिक आणि जैविक गुणधर्मामध्ये काहीसा फरक दिसतो, मात्र शेवटी पाणी हे पाणीच आहे. त्यामुळे मूळ गुणधर्म सारखाच!. या दोन्ही पाण्याच्या वेगवेगळ्या अवस्था असल्यातरीही या दोघांमध्ये परस्परसंबंध आहेत आणि ते एकमेकांना पूरक असेच आहेत.**

महाबळेश्वर येथून कृष्णेचा उगम अशाच प्रकारे आहे. आपल्या संस्कृतीमध्ये नदीचे उगमस्थान किंवा झरा (गोमुख) यांस अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि तसा वारसासुद्धा प्राप्त आहे. कारण नदी हे संस्कृतीचे उगमस्थान आहे. भूजल आणि नदी, नदी आणि भूजल या परस्पर हित संबंधी व्यवस्था असून त्या आपण परोपरीने जपायलाच हव्यात !!

नदी संवर्धनाचा विचार आणि कृती कार्यक्रम करताना नदीसोबतच त्या खोऱ्यातील जलधारक खडक त्यांचे प्रकार, भूजल उपसा साधणे (विहिरी व विंधन विहिरी), भूपृष्ठीय आणि भूजलाची रासायनिक व जैविक गुणवत्ता, पावसाचे क्षेत्रीय व वेळ सापेक्ष विचलन, पाण्याचा येवा, जलसंधारण व जलसाठवण, जैवविविधता, नद्यांमध्ये शहरी व निमशहरी भागातून होणारे सांडपाण्याचे व मल-मुत्राचे विसर्जन, इत्यादी बाबींचा एकत्रितपणे विचार व अभ्यास करून कार्यवाही होणे गरजेचे आहे. कारण नदीचे आरोग्य शाबूत राहिले तरच मानवी आरोग्य शाबूत राहील.

## भूजलाचा शाश्वत पर्याय

महाराष्ट्राचा विचार करता राज्यामध्ये ८२ टक्के क्षेत्र बेसाल्ट खडक व १० टक्के रूपांतरित खडक, असे एकूण ९२ टक्के क्षेत्र हे कठीण खडकांवर वसलेले आहे. बेसाल्ट आणि रूपांतरित खडक हे मुळातच पाणी साठवण आणि वहनास अनुकूल नसल्यामुळे भूजलाच्या साठवण क्षमतेस मर्यादा आहेत. तथापि जमिनीलगतच्या खडकाच्या झिजण्यामुळे किंवा त्यामध्ये निर्माण झालेल्या भेगा व संधीमुळे जमिनीपासून साधारणत: ३० ते् ७० फुटापर्यंतच्या खडकाचे उथळ जलधरात रूपांतर झालेले पाहण्यास मिळते. हा उथळ जलधर दरवर्षी पावसाच्या पाण्याने पुनर्भरित होऊन त्याद्वारे विहिरींमधून भूजल उपलब्ध होते.

पावसाच्या पाण्यामुळे दरवर्षी पुनर्भरित होत असल्यामुळे आणि त्याचा निश्चित अंदाज बांधता येत असल्यामुळे आपल्याकडे उथळ जलधर हाच भूजलाचा शाश्वत पर्याय उपलब्ध आहे. खोलवरील जलधराचा क्षेत्रीय विस्तार एकसारखा नसून तो दरवर्षी पुनर्भरित होत नसल्यामुळे खोल जलधरातील भूजलावर अवलंबून राहणे हिताचे नाही.

## भूजल शाश्वतीकरण

सद्य:स्थितीत राज्यातील नद्या बारमाही वाहण्याचे प्रमाण नगण्य आहे. त्यामुळे त्यावर आधारित जैवविवीधता नष्ट झाली आहे किंवा होण्याच्या मार्गावर आहे. नद्यांमधील प्रवाह बारमाही करण्याकरिता नद्यांमध्ये येणारा बेसफ्लो (भूजल) पुनर्जीवित करून शाश्वत ठेवणे आवश्यक आहे आणि त्याकरिता त्या खोऱ्यातील उथळ जलधरातील भूजल पातळीचे आणि तात्पर्याने भूजलाचे संवर्धन व शाश्वततेच्या दृष्टीने व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. कारण सद्य:स्थितीत सर्वच कारणांसाठी विहिरी व विंधन विहिरीमधून किंवा खोल जलधरातून होत असलेल्या बेसुमार भूजल उपशामुळे भूजल पातळी खोल गेलेली आहे. त्यामुळे उथळ जलधर पुरेशा प्रमाणात संपृक्त होत नाही किंवा जेवढा काही झाला तो बारमाही टिकून राहत नाही. राज्यातील उथळ जलधर बारमाही भूजल उपलब्धतेच्या दृष्टीने शाश्वत झाल्यासच नद्यांमधील बेसफ्लो पुनर्जीवित होऊन शाश्वत राहील अन्यथा ते शक्य नाही. ज्याभागामध्ये भूजलाचा उपसा अत्यंत कमी आहे किंवा उपलब्धतेच्या तुलनेत मर्यादित आहे त्या भागात आजही नद्यांमध्ये बारमाही प्रवाह पाहावयास मिळते. उदाहरणार्थ राज्याच्या पूर्व विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यातील भाग किंवा कोकणातील काही भागात आजही नदी-नाल्यांमध्ये बारमाही प्रवाह दिसतो.

## पाण्याची गुणवत्ता

नदी आणि भूजल यांचा एकत्रित विचार केला तर दुसरी बाब प्रामुख्याने लक्षात येते ती म्हणजे पाणी गुणवत्ता. नद्यांच्या काठावर वसलेल्या शहरांमधून सांडपाण्याचा जो विसर्ग नदीपात्रामध्ये सोडला जातो. त्यामुळे नदीपात्रातील पाणी तर दूषित झालेच आहे परंतु ते पाणी जमिनीत आणि पर्यायाने जलधरात झिरपल्यामुळे भूजलाची गुणवत्ता ढासळलेली आहे. उदा. पुणे शहर ते उजनी जलाशयामधील भूभाग. त्यामुळे पाणी गुणवत्ता पूर्ववत आणून ती शाश्वत ठेवणे अर्थात नदीस आरोग्यदायी ठेवणे अधिक आवश्यक आहे. गुणवत्तेमुळे पाणी उपलब्ध असून पिण्यास किंवा वापरण्यास निकामी असल्यास काय उपयोग!!

## भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा

महाराष्ट्र राज्यात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा गेली ५० वर्षे कार्यरत आहे. गेल्या ५० वर्षांत यंत्रणेने भूजलाच्या बाबतीत अनेक कामे केली आहेत. दुर्गम व ग्रामीण भागातील जनतेच्या पिण्याच्या पाण्याची एक सक्षम व्यवस्था निर्माण करण्यात यंत्रणेचा मोलाचा वाटा आहे. यंत्रणेकडे गाव पातळीवरील सविस्तर भूजल नकाशे, १,५०,००० या स्केलवरील राज्याचे भूजल क्षेत्र नकाशे (Groundwater Prospect Maps), निरीक्षण विहिरींद्वारे संकलित केलेली भूजल पातळी, गावनिहाय जलपुनर्भरण प्राधान्यक्रम नकाशे, दर तीन ते पाच वर्षांनी तयार केलेले राज्याचे भूजल अंदाज अहवाल, इत्यादीं माहिती यंत्रणेकडे उपलब्ध आहे. या माहितीचा उपयोग नद्या व त्यांच्या पाणलोट क्षेत्रामध्ये जलसंधारणाच्या उपाययोजना कोठे केल्यास जलधर पुनर्भरणास अधिक फायदा होईल, याबाबतचे निर्णय घेताना होईल, जेणेकरून अनावश्यक खर्चास आळा बसेल.

विभागाकडील तांत्रिकदृष्ट्या सक्षम, अनुभवी भू-शास्त्रज्ञांचा संच प्रत्येक स्तरावर उपलब्ध असून तो वरील सर्व उपाययोजना निश्चित करताना तांत्रिक निर्णय घेण्याच्या प्रक्रियेस मदतभूत राहील. विभागाद्वारे राष्ट्रीय जलविज्ञान प्रकल्प आणि १३ जिल्ह्यांतील ११३३ ग्रामपंचायतींमध्ये अटल भूजल योजना राबवण्यात येत आहे. अटल भूजल योजनेच्या माध्यमातून लोकसहभागातून भूगर्भातील पाण्याचा साठा वाढवणे आणि उपलब्ध होणाऱ्या पाण्याचा काटेकोरपणे, काळजीपूर्वक वापर करून भूजल पातळीत होणारी धोकादायक घसरण थांबवणे हा अनुभवसुद्धा भूजल यंत्रणेकडे उपलब्ध आहे.

तज्ज्ञ अधिकारी, परिपूर्ण माहिती, पाणी प्रयोगशाळांचे जाळे, लोकसहभागातून भूजल व्यवस्थापनाचा अनुभव इत्यादींमुळे 'चला जाणुया नदीला' या कार्यक्रमात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा ही निश्चितपणे साहाय्यभूत ठरेल.

# चळवळीचा शुभारंभ

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत आहे. या महोत्सवानिमित्ताने राज्यात अनेक उपक्रमांची सुरुवात झाली आहे. 'चला जाणूया नदीला' या अभियानांतर्गत ७५ नद्यांचे पुनरुज्जीवन करण्यात येणार आहे. या उपक्रमांचा शुभारंभ नुकताच करण्यात आला. या अभियानाच्या शुभारंभ प्रसंगाचा थोडक्यात वृत्तांत.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनापर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात सेवा पंधरवडा राबवण्यात आला. या राज्यस्तरीय उपक्रमाचा समारोप राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधत २ ऑक्टोबर रोजी वर्धा येथे उत्साहात झाला. 'चला जाणूया नदीला' व 'हॅलो ऐवजी वंदे मातरम्' या उपक्रमांचा शुभारंभदेखील उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. या वेळी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, वने व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार उपस्थित होते.

सर्वसामान्य नागरिकांची विविध कामे विविध वेळेत पूर्ण व्हावीत. शासकीय कामासाठी त्यांना वारंवार कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नये, त्यासाठी प्रलंबित व नव्याने दाखल प्रकरणे वेळेत निकाली काढण्यासाठी सेवा पंधरवडा अतिशय महत्त्वाचा ठरला आहे. वर्धासह संपूर्ण राज्यातील अडीच लाखांवर प्रकरणे निकाली निघाली.

## 'हॅलो ऐवजी वंदे मातरम्'

इंग्रजांच्या काळापासून दुरध्वनीवर हॅलो म्हणण्याची प्रथा आजही रूढ आहे. इंग्रज गेले परंतु त्यांची प्रथा अद्यापही तशीच आहे. हॅलो ऐवजी नागरिकांनी आपल्या संवादाची सुरुवात वंदे मातरम्ने करावी आणि या माध्यमातून नागरिकांमध्ये राष्ट्राभिमान जागृत व्हावा, या उदात्त हेतूने सांस्कृतिक कार्य विभागाने 'हॅलो ऐवजी वंदे मातरम्' हा उपक्रम सुरू केला.

## ७५ नद्यांचे पुनरुज्जीवन

स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवनिमित्त राज्यातील ७५ नदींच्या पुनरुज्जीवनाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. या पुनरुज्जीवनासाठी नदी काठावरील नागरिकांचा सहभाग मिळवणे, नद्यांचा सर्वंकष अभ्यास करणे, नदीचे स्वास्थ्य आणि मानवी आरोग्य यासाठी प्रचार प्रसाराची रूपरेषा तयार करणे, नदी खोऱ्यांचे नकाशे, तिची पुररेशा, पाणलोट क्षेत्र, मागील काही वर्षातील पूर व दुष्काळाच्या



नोंदी, अतिक्रमण, शोषण आणि प्रदूषण यांचा अभ्यास करण्यासाठी 'चला जाणूया नदीला' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. त्यासाठी या ७५ नदी काठांवरील गावात 'संवाद यात्रा' राबवली जात आहे. या नद्यांच्या संवाद परिक्रमेस सहभागी होणाऱ्या चमूंना कलशाचे वितरण याच कार्यक्रमात करण्यात आले.

सेवा पंधरवडा समारोप, चला जाणूया नदीला व हॅलो ऐवजी वंदे मातरम् अभियानाचा शुभारंभ एकत्रितपणे करण्यात आला. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या कर्मभूमीतून सुरू झालेले हे उपक्रम संपूर्ण राज्यभर राबवण्यात येणार आहेत.

## राष्ट्रपित्यांच्या विचारांवर कृती

सर्वसामान्य माणसाला स्वातंत्र्य लढ्याशी जोडून बापूंनी तो लढा खऱ्या अर्थाने एका मोठ्या जनांदोलनात परावर्तित केला. बापू सर्वसामान्य माणसाच्या सेवेला ईशसेवा - देशसेवा मानत होते. राष्ट्रपित्यांचे हेच विचार कृतीत आणण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सर्व पातळ्यांवर प्रयत्न सुरू केले आहेत. समाजातील प्रत्येक वर्गासाठी जाणिवेने काम केले जात आहे. म्हणून राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा सर्वार्थाने औचित्यपूर्ण आहे, अशी भावना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व्यक्त केली.

जगातील सर्व संस्कृती नदीच्या काठावरच निर्माण झाल्या आणि बहरल्या. जेव्हा या नद्या नष्ट झाल्या, तेव्हा संस्कृती नष्ट झाल्या. सर्वांनी नद्यांचे माहात्म्य जाणून घ्यावे. ती आपली माता आहे ती वाचली तरच आपण वाचणार आहोत. त्यामुळे या भावनेने साऱ्या नद्या समजून घ्याव्यात. त्यासाठी आवश्यक असणारी जनजागृती आणि प्रबोधन करण्यासाठी; तसेच या नद्या प्रवाही, स्वच्छ आणि अतिक्रमणमुक्त करण्यासाठी सुरू करण्यात आलेला ७५ नद्यांच्या परिक्रमेचा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे. या उपक्रमामुळे नद्यांशी असलेले आपले नाते पुनरुज्जीवित होईल.

स्वातंत्र्य लढ्यात 'वंदे मातरम्' हे शब्द खऱ्या अर्थाने राष्ट्रभावना चेतवणारे ठरले होते. 'हॅलो' ऐवजी 'वंदे मातरम्' म्हणणे म्हणजे गुलामगिरीच्या शृंखला तोडणे. 'वंदे मातरम्'च्या माध्यमातून इतिहासातील तीच ऊर्जा आणि प्रेरणा निर्माण करण्याचा निर्धार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

## सेवा पंधरवड्याची अंमलबजावणी

सर्वसामान्य व्यक्तींना विकासाचा केंद्रबिंदू मानून सेवा पंधरवडा हा उपक्रम राबवण्यात आला. महात्मा गांधी यांच्या विचारांची प्रेरणा आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या कार्याची ऊर्जा घेऊन राबवण्यात आलेल्या या उपक्रमात सर्वसामान्य नागरिकांना विविध दाखले घरपोच देण्यात आले. यापुढेही जनतेचे प्रश्न गतीने सोडवण्याचे काम शासनामार्फत करण्यात येणार असल्याचे महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी या वेळी सांगितले.

## स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाचे स्मरण

स्वातंत्र्यलढ्याचा जाज्वल्य इतिहास स्मरणात राहावा, यासाठी 'हॅलो' ऐवजी 'वंदे मातरम्' म्हणून संभाषणाची सुरुवात करावी. 'वंदे मातरम्' हे आपले राष्ट्रगाण असून त्याचा सन्मान करणे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य असल्याचे वने व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या वेळी सांगितले.

## जलसंधारण आणि जलसाक्षरता

जलसंधारण आणि जलसाक्षरता या दोन्ही संकल्पनांची सांगड घालणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. महाराष्ट्रात राबवण्यात आलेले जलयुक्त शिवार अभियान हे खऱ्या अर्थाने जनआंदोलन ठरले. महाराष्ट्र इतर राज्यांना मार्गदर्शक ठरेल, अशा पद्धतीने स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करत आहे. आजच्या काळात पाणी हेच अमृत आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवाचे निमित्त आयोजित ७५ नद्यांची परिक्रमा हा राज्यातील नद्या अमृतवाहिनी करण्याचा उपक्रम आहे. त्या माध्यमातून नदी जाणून घेण्याचा प्रयत्न होणार आहे. अतिक्रमण, अस्वच्छतेसारख्या विविध प्रकारच्या समस्यांपासून आता नद्यांनाही स्वातंत्र्य हवे आहे. त्यासाठी असे प्रयत्न महत्त्वाचे आहेत. या संदर्भात राज्य सरकारने घेतलेला निर्णय अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे. उत्सवांना लोककल्याणकारी योजनांशी जोडण्याचा हा प्रयत्न प्रशंसनीय असल्याचेही डॉ. राजेंद्र सिंह म्हणाले.

## नदी संवाद यात्रेत सहभाग

राज्यातील नद्यांचे संवर्धन करण्यासाठी प्रत्येक नागरिकांच्या मनात स्वयंप्रेरणा आणि स्वच्छा जागृत व्हावी, यासाठी जनजागृतीचे कार्यक्रम हाती घेतले पाहिजे. नदी संवर्धन आणि संरक्षणाची जबाबदारी प्रत्येक नागरिकांची आहे. त्यामुळे हे अभियान यशस्वी करण्यासाठी नदीवर काम करणाऱ्या संस्था, व्यक्ती यांनी एकत्र येऊन काम केल्यास निश्चित सकारात्मक बदल दिसून येईल.

## सेवा पंधरवड्याची वर्धा येथून सुरुवात

सर्वसामान्य नागरिकांना कालमर्यादेत सेवा उपलब्ध करून देण्यासोबतच त्यांच्या प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जन्मदिवस ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती दिनापर्यंत सेवा पंधरवाडा राबवण्यात वर्धा जिल्ह्यात हा उपक्रम राबवण्यात आला. या लोकोपयोगी उपक्रमाचे कौतुक करत संपूर्ण जिल्हाभर हा उपक्रण राबवावा आणि तो यशस्वी करावा, अशा सूचना ही उपमुख्यमंत्र्यांनी या वेळी केल्या.

## मंगल कलश सुपुर्द

'चला जाणूया नदीला' या अभियानांतर्गत राज्यातील ७५ नद्यांची परिक्रमा करण्यात येणार आहे. या मोहिमेत सहभागी झालेल्या चमूंना मंगल कलश आणि तिरंगा सुपुर्द करण्यात आला.

## शासन आणि लोकसहभाग महत्त्वाचा

नदीच्या समस्या जाणून घेण्यासाठी शासन आणि समाजातील अभ्यासू घटकांनी एकत्र येवून काम केल्यास नदी संवाद यात्रा यशस्वी होऊ शकते. आणि त्याचा येणाऱ्या काळात सकारात्मक परिणाम होऊ शकतो, असा विश्वास सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी या वेळी व्यक्त केला.

**– टीम लोकराज्य**

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली मंत्रिमंडळातील सर्व सदस्य काम करत आहेत. विविध योजना, अभियानांचा शुभारंभ केला जात आहे. विविध विभागांचा मंत्रिमंडळाकडून आढावा घेतला जात आहे. आढावा बैठकांमध्ये देण्यात आलेल्या सूचना, निर्देश तसेच प्रकल्पांचे लोकार्पण, प्रकल्पाच्या कामांची पाहणी, पुरस्कार वितरण आदींचा थोडक्यात आढावा...**



**एकनाथ शिंदे**
मुख्यमंत्री

# पाऊल पडते पुढे

## विकास कामांचे भूमिपूजन

मुंबई व ठाणे लगतचे शहर असलेले मीरा-भाईंदर हे शहर सर्व सोयीसुविधा युक्त मॉडेल शहर करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावे. राज्य शासन यासाठी सर्वतोपरी मदत करेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मिरा रोड (पूर्व ) महाजनवाडी येथे स्केटिंग रिंगचे लोकार्पण, महापालिकेच्या मल्टिस्पेशालिटी रुग्णालयाचे भूमीपूजन, भाईंदर (प.) येथील चिमाजी अप्पा यांच्या पुतळ्याचे लोकार्पण, घोडबंदर येथील महानगरपालिकेच्या नवीन प्रशासकीय भवनाचे भूमिपूजन, भाईंदर (पूर्व) येथील महाराणा प्रताप पुतळ्याचे व मिरारोड (पूर्व) येथील भारतरत्न गान सम्राज्ञी लता मंगेशकर नाट्यगृह इमारतीचे लोकार्पण मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

## मालमत्ताविषयक प्रदर्शनाचे उद्घाटन

मुंबई परिसरातील पुनर्विकासाच्या कामांचा क्लस्टरच्या माध्यमातून विकास करण्यासाठी शासन आणि बांधकाम व्यावसायिकांनी परस्पर सहकार्याने काम केल्यास गृहनिर्माण क्षेत्राला ऊर्जितावस्था मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. यासाठी शासनामार्फत आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. शासनाने विविध सवलती दिल्याने बांधकाम व्यावसायिकांनी सर्वसामान्यांसाठी परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करून द्यावीत, असे आवाहन त्यांनी केले.

कॉन्फेडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडिया - महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्री (क्रेडाई-एमसीएचआय) यांच्या वतीने वांद्रे-कुर्ला संकुलातील एमएमआरडीए मैदानात आयोजित मालमत्ताविषयक प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते झाले. या वेळी नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव भूषण गगराणी, एमएमआरडीएचे आयुक्त एसआरव्ही श्रीनिवास, क्रेडाई-एमसीएचआयचे अध्यक्ष बोमन इराणी, सचिव धवल अजमेरा आदी उपस्थित होते.



महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत लाभ हस्तांतरण योजनेचा शुभारंभ करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आदी मान्यवर.

## प्रोत्साहनपर रक्कम जमा

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत ५० हजार रुपये प्रोत्साहनपर रक्कम जमा करण्याचा शुभारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. एकाच वेळी राज्यातील ६ लाख ९० हजार शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे २५०० कोटी रुपये जमा करण्यात आले. अशा प्रकारे एकाच वेळी थेट खात्यात रक्कम जमा करणारे महाराष्ट्र पहिले राज्य असल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीमुळे बळीराजाने खचून जाऊ नये, राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याची ग्वाहीही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिली.

दरम्यान, शेतीच्या नुकसानीचे पंचनामे उपग्रह आधारित तंत्रज्ञानाच्या माध्यमातून करतानाच त्याची भरपाई ऑटोपायलट मोडच्या माध्यमातून देण्यासाठी यंत्रणा निर्माण करण्यात येत असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार यांनी प्रास्ताविक केले. कर सहकार आयुक्त अनिल कवडे यांनी आभार मानले.

## भंडारा मेट्रो प्रकल्पाचा आढावा

भंडारा रोड ते भंडारा शहरापर्यंत मेट्रो रेल्वे सुरू करण्याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत तत्त्वत: मान्यता देण्यात आली. या संदर्भात महारेल मार्फत रेल्वे आणि राज्य सरकार यांच्या ५०-५० टक्के आर्थिक सहभागासंदर्भात प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्र्यांनी या वेळी दिल्या.

भंडारा रोड ते भंडारा शहरापर्यंत मेट्रो रेल्वे सुरू करण्यासंदर्भात मंत्रालयात आढावा बैठक झाली. या वेळी आमदार नरेंद्र भोंडेकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, महारेलचे व्यवस्थापकीय संचालक राजेश कुमार जयस्वाल आदी उपस्थित होते.

## २६ गावांना पुनर्वसनाचा दिलासा

भंडारा जिल्ह्यातील गोसीखुर्द (ता. पवनी) राष्ट्रीय सिंचन प्रकल्पामुळे बाधित होणाऱ्या भंडारा विधानसभा क्षेत्रातील २६ गावांच्या पुनर्वसनाबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली या गावांच्या पुनर्वसनाच्या मागणीबाबत बैठक झाली. बैठकीस आमदार नरेंद्र भोंडेकर, जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर, मदत व पुनर्वसन विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, भंडारा जिल्हाधिकारी संदीप कदम यांच्यासह विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, लाभ क्षेत्र विकास मंडळ आदी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## रस्ता सुरक्षेचा आढावा

राज्यात रस्त्यांवर वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे घोषित करण्यात आलेले ब्लॅक स्पॉट संबंधित विभागांनी तातडीने दूर करावेत, असे निर्देश देतानाच राज्यात २३ ठिकाणी आधुनिक वाहन चाचणी केंद्र तसेच वाहन परवान्यासाठी स्वयंचलित वाहन चलन चाचणी पथ स्थापन करण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. जिल्हाधिकारी व जिल्हा पोलिस अधीक्षकांनी आपल्या हद्दीतील ब्लॅकस्पॉट दूर करण्यासाठी समन्वय करावे. वर्षातून किमान तीन वेळा रस्ता सुरक्षा सप्ताह साजरा करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले.

सह्याद्री अतिथिगृह येथे रस्ता सुरक्षा विषयक उपाययोजना व सुधारित धोरण ठरवण्याबाबत बैठक झाली. त्या वेळी मुख्यमंत्री बोलत होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, शिक्षण मंत्री दीपक केसरकर, आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव आदींसह विविध विभागांचे सचिव उपस्थित होते. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस प्रमुख दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी झाले होते.

## शहिदांना श्रद्धांजली

दहशतवादाशी लढा देणे ही संयुक्त राष्ट्र संघाची प्राथमिकता आहे, असे प्रतिपादन संयुक्त राष्ट्रसंघाचे सरचिटणीस एच.ई. अँटोनियो गुटेरेस यांनी केले. सरचिटणीस श्री. गुटेरेस यांनी हॉटेल ताज येथे भेट देऊन २६/११च्या हल्ल्यातील शहिदांना श्रद्धांजली वाहिली. या निमित्ताने आयोजित चित्रप्रदर्शनाला त्यांनी भेट दिल्यानंतर उपस्थितांशी त्यांनी संवाद साधला, त्या वेळी ते बोलत होते.

या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, राजशिष्टाचार विभागाच्या प्रधान सचिव मनिषा म्हैसकर व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## कागद निर्मिती उद्योगास मान्यता

कोविडमुळे मंदावलेला उद्योग क्षेत्राचा वेग वाढवण्यासाठी टाळेबंदीच्या काळात, राज्यातील ज्या उद्योगांना परताव्याचे दावे दाखल करता आले नाहीत, त्यांचे असे दावे मंजूर करण्याकरिता औद्योगिक प्रोत्साहन अनुदान कालावधी दोन वर्षांनी वाढवण्याचा निर्णय उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला आहे. बैठकीत रायगड जिल्ह्यातील सिनारमन्स पल्प या कागद निर्मितीच्या २० हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीच्या उद्योगासह अन्य उद्योग प्रकल्पांनाही मान्यता देण्यात आली. राज्यातील उद्योग क्षेत्रातील गुंतवणुकीला मोठी चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण उपाययोजना करण्यास प्राधान्य देण्याचे बैठकीत निश्चित करण्यात आले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मंत्रिमंडळ उपसमितीची तिसरी बैठक मंत्रालयात झाली. बैठकीस उद्योग मंत्री उदय सामंत, मुख्य सचिव मनु कुमार श्रीवास्तव आदी उपस्थित होते.

## 'सारथी'च्या माध्यमातून विकास

'सारथी'च्या नाशिक विभागीय कार्यालयाच्या माध्यमातून विभागातील मराठा व मराठा-कुणबी समाजातील तरुणांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार असून तरुणांचे भविष्य घडवण्याऱ्या 'सारथी'ला शासनाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

छत्रपती शाहू महाराज, संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था 'सारथी' पुणे या संस्थेच्या नाशिक विभागीय कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री बोलत होते. या वेळी बंदरे व खनिकर्म मंत्री तथा नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री दादाजी भुसे, खासदार हेमंत गोडसे, आमदार नरेंद्र किशोर दराडे, दिलीप बनकर, ॲड. राहुल ढिकले, देवयानी फरांदे, सीमा हिरे, छत्रपती संभाजीराजे भोसले, सारथीचे अध्यक्ष मधुकर कोकाटे तसेच पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

## शेतकऱ्यांसोबत दिवाळी

दीपावलीनिमित्त राज्यभर प्रकाशपर्व साजरे होत असताना मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या 'वर्षा' बंगल्याने अनोखी दिवाळी अनुभवली. राज्यातून आलेल्या शेतकरी कुटुंबीयांसोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सहकुटुंब दिवाळी साजरी केली. त्यांच्यासोबत फराळाचा आस्वाद घेतला. आलेल्या प्रत्येक शेतकरी कुटुंबाचे औक्षण करत त्यांचा दिवाळीचा आनंद द्विगुणित केला. मुख्यमंत्र्यांच्या या आगळ्यावेगळ्या कृतीमुळे भारावून गेलेले

शेतकरी बांधव वर्षा निवासस्थानातून बाहेर पडताना मुख्यमंत्र्यांनी बळीराजाची कदर केल्याची भावना व्यक्त करताना दिसून आले.

राज्यातील शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी कृषी कृती विकास आराखडा तयार करत असल्याचे सांगतानाच नैसर्गिक आपत्तीत सरकार तुम्हाला वाऱ्यावर सोडणार नाही. तुम्ही धीर सोडू नका. राज्य शासन तुमच्या पाठीशी असल्याची ग्वाही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी या वेळी दिली.

या वेळी मुख्यमंत्र्यांनी प्रातिनिधिक स्वरूपात दुधे दाम्पत्याला दिवाळी फराळ भरवला. वर्षावरील हिरवळीवर शेतकऱ्यांसाठी स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. मुख्यमंत्री श्री. शिंदे त्यांचे सुपुत्र खासदार डॉ. श्रीकांत शिंदे प्रत्येक शेतकऱ्याची विचारपूस करत होते. या वेळी अमरावतीच्या सौ. अर्चना सवाई आणि अहमदनगरचे सतीश कानवडे या शेतकऱ्यांनी मनोगत व्यक्त केले.

या वेळी कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी प्रास्ताविक केले. आमदार प्रताप सरनाईक, प्रवीण दरेकर, माजी खासदार आनंद अडसुळ यांच्यासह सहकार विभागाचे अपर मुख्य सचिव अनुपकुमार, मदत व पुर्नवसन विभागाचे प्रधान सचिव असीमकुमार गुप्ता, कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, आयुक्त धीरजकुमार, सहकार आयुक्त अनिल कवडे आदी उपस्थित होते.

## दहशतवादविरोधी समितीची बैठक

दहशतवादी गटांच्या आर्थिक स्रोतांपर्यंत पोहोचून त्यास आळा घालणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व देशातील सदस्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस.जयशंकर यांनी केले. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या दहशतवादविरोधी समितीची बैठक मुंबईमध्ये ताज हॉटेल येथे झाली. त्या वेळी ते बोलत होते.

२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईत (२६/११) झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांना संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सदस्य देशांच्या प्रतिनिधींनी श्रद्धांजली अर्पण केली. या वेळी परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर, संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेचे अध्यक्ष तथा गॅबॉन प्रजासत्ताक देशांचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मायकल मौस्सा अडामो प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन दहशतवादविरोधी समितीच्या अध्यक्षा आणि संयुक्त राष्ट्रातील भारताच्या स्थायी प्रतिनिधी राजदूत रुचिरा कंबोज यांनी केले.

दहशतवादविरोधी लढाई ही सर्वांनी एकत्रितपणे आणि एकजुटीने लढणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बैठकीनंतर माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना केले. या अनुषंगाने संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवाद विरोधी समितीची महत्त्वपूर्ण परिषद मुंबईत झाली.

## किंग्ज् गॅस कंपनीसोबत करार

राज्याची वाढती विजेची मागणी पूर्ण करण्याच्या उद्देशाने किंग्ज् गॅस कंपनीसोबत राज्य शासनाच्या ऊर्जा विभागाने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार केला. या करारामुळे राज्याला स्वच्छ आणि सुरक्षित ऊर्जा निर्मितीसाठी मदत होणार आहे. याबाबतचा पायलट प्रकल्प उरण प्रकल्पात राबवला जाणार आहे.



**देवेंद्र फडणवीस**
उपमुख्यमंत्री

लिक्विफाइड नॅचरल गॅस हे ऊर्जा निर्मिती क्षेत्रात स्वच्छ आणि सुरक्षित इंधन मानले जाते. यामुळे कार्बन उत्सर्जन कमी होते, त्याचबरोबर त्यातून कचऱ्याचीही निर्मिती होत नाही, त्याची कार्यक्षमता अधिक असून त्यामुळे राज्याची विजेची मागणी पूर्ण करण्यास मदत होणार आहे. या संदर्भातील सामंजस्य करार महाराष्ट्र शासनाच्या ऊर्जा विभाग व कतार येथील किंग्ज् गॅस कंपनीसोबत सह्याद्री अतिथिगृह येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत करण्यात आला. या वेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण, ऊर्जा विभागाचे सचिव दिनेश वाघमारे, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक विद्युत निर्मिती कंपनी डॉ. पी अनबलगन, एसटी महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक शेखर चन्ने, किंग्ज् गॅस प्रा.लि.चे व्यवस्थापक मोहम्मद कुरेशी, समीर वहाबे, समीर हमीदे उपस्थित होते.

## स्टार्टअप्सना विविध पुरस्कारांचे वितरण

मागील काही वर्षांत आपला देश विकासविषयक विविध क्षेत्रात यशस्वी वाटचाल करत आहे. देशामध्ये युवकांमधील नवनवीन संकल्पनांवर आधारित स्टार्टअप्स, युनिकॉर्न्स यांना चालना देण्यात येत आहे. या क्षेत्रात योगदान देत असलेल्या युवक-युवतींनी आपल्या कल्पना, आपले कार्य भारत देशासाठी समर्पित करावे, यामुळे देशातील इतरही युवक-युवतींना पुढे येण्यास मदत होईल. स्टार्टअप आणि युनिकॉर्न्सच्या विकासासाठी राज्यात विविध उपक्रम प्रभावीपणे राबवण्यात येत असून त्यामधून नावीन्यता आणि उद्योजकतेला मोठ्या प्रमाणात चालना मिळेल, असा विश्वास राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांनी व्यक्त केला.

राज्य शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागामार्फत राबवण्यात आलेल्या स्टार्टअप सप्ताह आणि स्टार्टअप यात्रेतील विजेत्यांना राजभवन येथे राज्यपाल श्री. कोश्यारी यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्याप्रसंगी ते बोलत होते. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा, ज्येष्ठ वैज्ञानिक डॉ. रघुनाथ माशेलकर, स्वीडनच्या कौन्सुलेट जनरल ॲना लॅकवॉल, कौशल्य विकास विभागाच्या प्रधान सचिव मनिषा वर्मा, महाराष्ट्र राज्य नावीन्यता सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी. डॉ. रामास्वामी एन. आदी मान्यवर उपस्थित.

## 'डेफिनेटिव्ह ॲग्रिमेंट'वर स्वाक्षरी

आशियातील सर्वांत मोठा पुनर्विकास प्रकल्प असलेल्या धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी रेल्वेची जागा प्राप्त करण्यासाठी रेल्वे मंत्रालयाच्या रेल लँड डेव्हलपमेंट ॲथॉरिटी आणि धारावी पुनर्विकास प्रकल्प प्राधिकरण यांच्यात उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत 'डेफिनेटिव्ह ॲग्रिमेंट'वर स्वाक्षरी करण्यात आली.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे मन:पूर्वक आभार मानले आहेत. या 'डेफिनेटिव्ह ॲग्रिमेंट'मुळे आशियातील सर्वांत मोठ्या अशा धारावी पुनर्विकास प्रकल्पाचा मार्ग मोकळा झालेला आहे. या बैठकी संदर्भात पत्रकारांशी संवाद साधताना श्री. फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्र समृद्धी महामार्गाला जोडून हायस्पीड रेल्वे आणि हायस्पीड कार्गो रेल्वे सुरू करण्याच्या प्रस्तावावर सुद्धा या वेळी केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा करण्यात आली.

## जलविद्युत प्रकल्पांचे नूतनीकरण

राज्यातील आठ जलविद्युत प्रकल्पांच्या नूतनीकरण आणि आधुनिकीकरणासाठी जलसंपदा विभाग आणि महानिर्मिती कंपनीने संयुक्तरीत्या महिन्याभरात धोरण तयार करावे, अशा सूचना उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा व लाभक्षेत्र विकास विभागाचे मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथिगृह येथे उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महानिर्मिती कंपनीद्वारे नवीन जलविद्युत प्रकल्प उभारणे, जुन्या जलविद्युत प्रकल्पाचा पुनर्विकास करण्याबाबत आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, लाभ क्षेत्र विकासचे प्रधान सचिव रा. र. शहा, ऊर्जा विभागाचे प्रधान सचिव दिनेश वाघमारे, महानिर्मिती कंपनीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक पी. अनबलगन, महाऊर्जाचे महासंचालक रवींद्र जगताप यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते.

## पोलीस स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

कर्तव्य बजावतांना शहीद झालेल्या पोलिसांना पोलीस स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

नायगावच्या पोलीस मुख्यालयातील मैदानात झालेल्या हुतात्मा दिन मानवंदना व संचलन कार्यक्रमाला शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव आनंद लिमये, पोलीस महासंचालक रजनीश सेठ, मुंबईचे पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

## २१३ युवकांना नियुक्तिपत्र

राज्यातील सरकारी नोकरीवरील अघोषित बंदी उठवली जाईल. येत्या एक वर्षाच्या कालावधीत राज्यात ७५ हजार युवकांना नोकरी देणार, अशी महत्त्वपूर्ण घोषणा दीपोत्सवाच्या पर्वावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नागपूर येथे केली. येथील अजनी परिसरात सेंटर रेल्वे कम्युनिटी हॉलमध्ये आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. या वेळी व्यासपीठावर केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले, मध्य रेल्वेच्या विभागीय रेल्वे व्यवस्थापक ऋचा खरे, आमदार प्रवीण दटके, आमदार कृष्णा खोपडे, आमदार विकास कुंभारे, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर उपस्थित होते. केंद्र शासनामार्फत पुढील १८ महिन्यांत १० लाख तरुणांना विविध शासकीय विभागामध्ये नोकरी दिली जाणार आहे. दीपोत्सवाच्या पर्वावर हा रोजगार मेळावा देशभरातील विविध ठिकाणी आयोजित केला होता. याच कार्यक्रमात नागपूर येथे २१३ युवकांना नियुक्तिपत्र देण्यात आले. बँक, रेल्वे, पोस्ट, इन्कम टॅक्स यांसह केंद्र शासनाच्या विविध जवळपास ३८ विभागांमध्ये ही नियुक्ती होणार आहे. एकाच दिवशी देशभरात ७५ हजार युवकांना नियुक्तिपत्र दिले गेले.

## सायबर इंटिलिजन्स युनिट उभारणार

सायबर आणि आर्थिक गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी महाराष्ट्रात डेडिकेटेड सायबर इंटिलिजन्स युनिट स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरजकुंड येथील चिंतन शिबिरात दिली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली देशभरातील विविध राज्यांचे गृहमंत्री आणि पोलीस महासंचालकांचे दोन दिवसांचे चिंतन शिबिर हरयाणातील सुरजकुंड येथे आयोजित करण्यात आले होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीदेखील या बैठकीला संबोधित केले. राष्ट्रीय सुरक्षेच्या अनेक विषयांवर या बैठकीत मंथन करण्यात आले.

## लसीकरण प्रमाणपत्र आवश्यक

राज्यात सुरू होणाऱ्या साखर गळीत हंगामाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध कारखान्यांकडे ऊसतोड मजुरांकडील गोवंशीय पशुधनास लम्पी रोगाचा प्रादुर्भाव वाढू नये, यासाठी लसीकरण प्रमाणपत्र आवश्यक करण्यात येणार असल्याचे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.

मंत्रालयात ऊस कारखान्यांकडे स्थलांतरित होणाऱ्या ऊस तोड मजुरांकडील गोवंशीय पशुधनाच्या लसीकरणाविषयी आयोजित बैठकीत ते बोलत होते. या वेळी सहकार मंत्री अतुल सावे, पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव जे. पी. गुप्ता, आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, सहसचिव मानिक गुट्टे उपस्थित होते. दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून साखर आयुक्त शेखर गायकवाड, राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, जिल्हा



**राधाकृष्ण विखे-पाटील**
मंत्री, महसूल, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास

परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित होते.

## तलाठी भरती प्रक्रियेला गती

महसूल विभागांतर्गत तलाठी भरती प्रक्रिया करण्यात येणार आहे. प्रथम टप्प्यात तलाठी संवर्गातील भरण्यात येणाऱ्या १ हजार पदांच्या भरती प्रक्रियेला गती देण्यात यावी, असे निर्देश महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिले.

महसूल मंत्री श्री. विखे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, मदत व पुनर्वसन विभागाचे सचिव असिम गुप्ता, महसूल विभागाचे सहसचिव श्रीराम यादव, सहसचिव संजय बनकर यांच्यासह महाराष्ट्र राज्य तलाठी संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## विशेष टपाल लिफाफ्याचे प्रकाशन

भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा होत असून, या निमित्ताने लवकरच विशेष टपाल तिकीट काढण्यात येईल, असे मत्स्यव्यवसाय मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

मत्स्यव्यवसाय विभाग आणि भारतीय डाक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक फिलाटेली दिवसाच्या निमित्ताने एक जिल्हा एक उत्पादन यासाठी मुंबई शहर जिल्ह्यासाठी चंदेरी पापलेट या माशाचे विशेष टपाल लिफाफ्याचे प्रकाशन मंत्री श्री. मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी आमदार सुधीर गाडगीळ, वन विभागाचे प्रधान सचिव वेणू गोपाल रेड्डी, मत्स्य व्यवसाय विभागाचे प्रधान सचिव पराग जैन-नैनुटिया, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख) डॉ. वाय.एल.पी.राव, मुंबई शहर जिल्हाधिकारी राजीव निवतकर, मुंबई क्षेत्राच्या पोस्ट मास्तर जनरल स्वाती पाण्डेय आदी उपस्थित होते.

## 'डीपीडीसी'तून मिळणार निधी

मत्स्यबीज निर्मितीकरिता लागणारे साहित्य, प्रजनक साठा व मत्स्यबीजाकरिता खाद्य, संप्रेरके, तलाव व्यवस्थापनाकरिता लागणारे खत, रासायनिक द्रव्ये, जाळे, हापे, मजुरी, सामग्री पुरवठा, लहान बांधकामे यासाठी आता जिल्हा वार्षिक योजनेमार्फत (डीपीडीसी) निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याची माहिती मत्स्यव्यवसाय विभाग मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.



**सुधीर मुनगंटीवार**
मंत्री, वने, सांस्कृतिक कार्ये, मत्स्यव्यवसाय

या निर्णयामुळे शासकीय मत्स्यबीज केंद्र व संवर्धन केंद्र यामध्ये मत्स्यबीज निर्मिती कार्यक्रम राबवणे शक्य होणार आहे. तसेच याचा फायदा मत्स्य बोटुकली उत्पादनात वाढ होऊन राज्यात मत्स्योत्पादनात वाढ होण्यास मदत होईल. यामध्ये मत्स्यबीज निर्मिती करण्यासाठी व केंद्रामधील तलावांचे व्यवस्थापन करण्यासाठी लागणारे साहित्य व सामग्री जसे प्रजनकसाठा व मत्स्यबीजाकरिता खाद्य, संप्रेरके, तलाव व्यवस्थापनाकरिता लागणारे खत, रासायनिक द्रव्ये, जाळे, हापे, मजुरी, सामग्री पुरवठा, लहान बांधकामे यासाठी जिल्हा वार्षिक योजना निधी उपलब्ध होणार आहे.

## मंत्रिमंडळ उपसमितीची पहिली बैठक

मराठा समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक विकासासोबतच मराठा आरक्षण आणि सुविधांसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नियुक्त केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची पहिली बैठक समितीचे अध्यक्ष उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

मंत्रालयात झालेल्या या बैठकीला महसूल मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, ग्रामविकास व वैद्यकीय शिक्षण मंत्री गिरीश महाजन, बंदरे व खनिकर्म मंत्री दादा भुसे, उद्योगमंत्री उदय सामंत, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. नितीन करीर, गृह विभागाचे अपर मुख्य सचिव आनंद लिमये, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, सामान्य प्रशासन विभागाचे सचिव सुमंत भांगे आदी उपस्थित होते.

## वसतिगृह सुरू करण्यास मान्यता

मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्यात १०० विद्यार्थी क्षमतेचे वसतिगृह सुरू करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. याचाच भाग म्हणून नाशिक येथे २०० मुलींचे वसतिगृह सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे, अशी माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.



**चंद्रकांत पाटील**
मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये

श्री. पाटील म्हणाले, 'इतर मागासवर्ग समाजातील विद्यार्थ्यांना मिळत असलेल्या शैक्षणिक सुविधा मराठा समाजातील विद्यार्थ्यांनादेखील मिळाव्यात, अशी शासनाची भूमिका आहे. नाशिक येथे सुरू करण्यात येणाऱ्या वसतिगृहात सारथी व महाज्योती या महामंडळाच्या त्यांच्या लक्षीत गटातील प्रत्येकी ७५ मुलींना प्रवेश देण्यात येणार असून उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील ५० मुलींना प्रवेश असे २०० मुलींचे वसतिगृह सुरू करण्यात येणार आहे.

### स्थलांतराचा प्रश्न सोडवणार

'आदिवासींच्या शिक्षण, आरोग्य व उपजीविका या तीन महत्त्वाच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन त्यासाठी आम्ही काम करत आहोत. आदिवासींच्या स्थलांतराचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध करून देणार', असे आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांनी सांगितले.



**डॉ. विजयकुमार गावित**
मंत्री, आदिवासी विकास

आदिवासी विकास मंत्री डॉ. विजयकुमार गावित यांच्या अध्यक्षतेखाली संसदीय संकुल विकास क्षेत्रातील आदिवासी विकास योजनांचा आढावा बैठक झाली. त्या वेळी ते बोलत होते. जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष खा. समीरजी उराव, योजक फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. गजानन डांगे, खा. अशोक नेते, खा.डॉ. हिनाताई गावित, आमदार अशोक उईके, आदिवासी विकास विभागाचे अपर मुख्य सचिव प्रदीप व्यास, आदिवासी विकास विभागाचे आयुक्त हिरालाल सोनवणे, नाशिकचे जिल्हाधिकारी गंगाथरन डी. आदी या बैठकीस उपस्थित होते.

### राज्याच्या चमूचे अभिनंदन

महाराष्ट्राच्या क्रीडा संघातील खेळाडूंनी तब्बल १४० पदकांची कमाई करून राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा गाजवत पदकतालिकेत दुसरे स्थान मिळवून महाराष्ट्राची क्रीडा परंपरा कायम राखणाऱ्या राज्याच्या चमूचे क्रीडा मंत्री गिरीश महाजन यांनी अभिनंदन केले.

या घवघवीत यशात खेळाडूंच्या अपार मेहनतीबरोबरच महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचाही मोलाचा वाटा आहे. केरळ येथे २०१५ मध्ये राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा झाल्यानंतर सात वर्षांच्या खंडानंतर गुजरातमध्ये या स्पर्धा पार पडल्या. ३६ क्रीडा प्रकारांत सात हजार खेळाडूंनी आपले कौशल्य सादर करून सर्वांची मने जिंकली. यात खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या खेळाडूंचे यश ठळकपणे दिसून आले. पदक तालिकेतील अव्वल स्थानावरील सर्व्हिसेस आणि तिसऱ्या स्थानावरील हरियाणा यांच्या तुलनेत महाराष्ट्राच्या खेळाडूंनी १४० पदकांची कमाई करून ही स्पर्धा गाजवली. खेळाडूंसाठी असलेल्या आधुनिक सुविधा आणि ऑलिम्पिकपटू, आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा समावेश असलेल्या सर्व्हिसेस आणि हरियाणाच्या खेळाडूंच्या कामगिरीच्या तुलनेत महाराष्ट्राच्या हौशी खेळाडूंनी दाखवलेले कौशल्य आणि मिळवलेले यश हे महाराष्ट्र क्रीडा क्षेत्रात देशात बलवान असल्याचे दिसून आले, मंत्री श्री. महाजन यांनी सांगितले.



**गिरीष महाजन**
मंत्री, ग्रामविकास व पंचायत राज,
वैद्यकीय शिक्षण, क्रीडा व युवक कल्याण

### क्रीडासंकुल निर्मितीसाठी कार्यवाही

विभाग, जिल्हा व तालुका स्तरावरील क्रीडासंकुलाच्या बांधकामास गती द्यावी. नवीन क्रीडासंकुलासाठीच्या आवश्यक मान्यतेसंदर्भात प्रशासकीय कार्यवाही गतीने करण्याची सूचना सूचना क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीष महाजन यांनी दिल्या.

मुंबई येथील क्रीडा विभागाकडील मैदाने, स्टेडियम, जागा - खेळपट्टीबाबत तसेच राज्य क्रीडा विकास समितीच्या बैठकीचे मंत्रालयात आयोजन करण्यात आले होते. या वेळी क्रीडा विभागांतर्गत खेळाडूंसाठी उपलब्ध क्रीडा संकूल, त्यांना देण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा क्रीडा मंत्री श्री. महाजन यांनी घेतला. त्या वेळी ते बोलत होते. क्रीडा व युवक कल्याण विभागाचे सचिव रणजीतसिंह देओल, आयुक्त सुहास दिवसे, मुंबईचे जिल्हाधिकारी राजीव निवतकर, उपसचिव सुनील हांजे, मुंबई उपनगरच्या जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के आदी उपस्थित होते.

### ग्राम स्वच्छता अभियान

ग्रामीण भागातील जनतेचे आरोग्यमान, जीवनस्तर उंचावण्यासाठी राज्य शासनाकडून विविध अभियान राबवण्यात येतात. परिसर स्वच्छता आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागातून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान पुन्हा अधिक जोमाने राबवण्यात येणार आहे. ११ ऑक्टोबरपासून या अभियानाची सुरुवात झाली असून येत्या १५ नोव्हेंबरपर्यंत हे अभियान राबवण्यात येणार आहे. या संदर्भात, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी मंत्रिमंडळातील सर्व सहकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पत्र लिहून अभियान यशस्वी करण्यासाठी पुढाकार घेण्याचे आवाहन केले आहे.



**गुलाबराव पाटील**
मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता

या अभियान / कार्यक्रमामध्ये निर्माण होणाऱ्या स्वच्छतेसंबंधी मत्ता, गावांमध्ये तयार होणाऱ्या स्वच्छतेच्या नव्या सुविधा, नागरिकांचे स्वच्छतेबाबत होणारे मत परिवर्तन व गावागावांतून सुरू असलेल्या स्वच्छतेच्या चळवळीत ग्रामीण भागातील सर्व नागरिक, ग्रामस्थांचा सक्रिय व

सातत्यपूर्ण सहभाग घेऊन त्यांच्या वेगवेगळ्या ग्रामपंचायती, तालुके व जिल्ह्यांत स्वच्छतेच्या विविध पैलूंतील प्रगतीबाबत एक सर्वसमावेशक स्पर्धा राबवून व त्या माध्यमातून ग्रामस्थांना प्रोत्साहित करून, स्वच्छतेच्या कार्यक्रमाचा आपलेपणा व महत्त्व पटवून देण्याकरिता, राज्यात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान राबवण्यात येत आहे.

## ‘मिनकॉन’ २०२२ परिषदेचे उद्‌घाटन

महाराष्ट्रामध्ये विदर्भा एवढे खनिज व खाणी कुठेच नाहीत. त्यामुळे राज्याचे नवीन खनिज धोरण ठरवताना विदर्भामध्ये खनिजावर आधारित उद्योगधंद्यांची बांधणी करण्याला प्राधान्य देण्यात येईल, असे प्रतिपादन बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे यांनी केले.



**दादाजी भुसे**
मंत्री, बंदरे आणि खनिकर्म

नागपूर येथे सिव्हिल लाईन्स येथील चिटणवीस पार्क येथे आयोजित ‘मिनकॉन २०२२’ परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री श्री. भुसे बोलत होते. केंद्रीय रस्ते व दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते या परिषदेचे उद्‌घाटन झाले. केंद्रीय कोळसा व खाण मंत्री प्रल्हाद जोशी, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, महाराष्ट्र राज्य खाण महामंडळाचे अध्यक्ष आमदार आशिष जयस्वाल, उद्योग व खाण विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, विदर्भ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट कौन्सिलचे (वेद) अध्यक्ष देवेंद्र पारेख, राहुल उपगल्लावार, शिवकुमार राव या वेळी उपस्थित होते.

## बंदरांचा विकास अधिक वेगाने

महाराष्ट्र सागरी वाहतूक व निर्यातीत कायमच अग्रेसर आहे. राज्यात बंदरांतील विविध पायाभूत सुविधांच्या विकासामुळे, महाराष्ट्र रस्ते, बंदरे आणि विमानतळांच्या संलग्नतेचे केंद्र बनत असून त्याद्वारे राज्यातील व्यापार आणि आर्थिक समृध्दी वाढण्यास मदत होत आहे.

येत्या काळात ‘पंतप्रधान गतिशक्ती नॅशनल मास्टर प्लॅन’ कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यातील बंदरांचा विकास अधिक वेगाने होईल, असे प्रतिपादन बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे यांनी केले.

ताज लॅन्डस एन्ड येथे दोन दिवसीय पी. एम. गतिशक्ती मल्टी मोडल मेरिटाईम रिजनल समिट २०२२ चे उद्‌घाटन बंदरे व खनिकर्म मंत्री दादाजी भुसे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी, एमबीपीएचे अध्यक्ष राजीव जलोटा, जेएनपीएचे उपाध्यक्ष उमेश वाघ, यांच्यासह अन्य विभागाचे अजय पटेल, अमित सैनी, जी. व्ही.एल. सत्यकुमार, अन्शूमाली श्रीवास्तव तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

## योजनांच्या समन्वयातून ग्रामसमृद्धी

राज्यात मनरेगा आणि राज्य शासनाच्या विविध विभागांच्या योजनांच्या समन्वयातून आणि विविध यंत्रणांच्या मदतीने ‘वंचितता निर्मूलन मिशन’ आणि ग्राम समृद्धी साध्य करण्यात येणार असल्याचे रोजगार हमी व फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांनी सांगितले.



**संदिपानराव भुमरे**
मंत्री, रोजगार हमी योजना, फलोत्पादन

रोजगार हमी योजनेविषयी आयोजित विविध उपक्रमांच्या मंत्रालयात आयोजित सादरीकरणाच्या वेळी मंत्री श्री. भुमरे बोलत होते. या वेळी रोजगार हमी योजनेचे अपर मुख्य सचिव नंदकुमार, राज्य गुणवत्ता नियंत्रक राजेंद्र शहाडे, सहायक संचालक श्री कलवले, उपसचिव श्रीमती खोपडे यांची उपस्थिती होती.

## कांदाचाळ साठवणूक मर्यादेत वाढ

राज्यात कांदाचाळीकरिता पाच मेट्रिक टन ते २५ मेट्रिक टनाची मर्यादा वाढवून ती ५० मेट्रिक टनापर्यंत वाढवण्यासाठीचे निर्देश फलोत्पादन मंत्री संदिपान भुमरे यांनी दिले. फलोत्पादन विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. या वेळी फलोत्पादन विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, आयुक्त धीरज कुमार, फलोत्पादन विभागाचे संचालक कैलास मोते यांच्यासह विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## सिल्लोडमध्ये कृषी औद्योगिक पार्क

औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड परिसरात प्रस्तावित असलेल्या महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) मध्ये निम्म्या भागात कृषी औद्योगिक पार्क आणि उर्वरित क्षेत्र सर्वसाधारण उद्योग उभारण्यासाठी वापरण्याचा निर्णय उद्योगमंत्री उदय सामंत अध्यक्षतेखालील बैठकीत घेण्यात आला.

सिल्लोड येथे एमआयडीसी स्थापन करण्याबाबत उद्योगमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. त्या वेळी हा निर्णय संयुक्तपणे घेण्यात आला. एमआयडीसी स्थापन करण्यासंदर्भात सिल्लोडचे आमदार तथा कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. याच पार्श्वभूमीवर ही बैठक घेण्यात आली होती. उद्योगमंत्र्यांसोबत झालेल्या या महत्त्वपूर्ण बैठकीमुळे सिल्लोड परिसरात एमआयडीसी सुरू करण्याच्या प्रक्रियेला गती मिळणार आहे.

या बैठकीला कृषी मंत्री अब्दुल सत्तार, एमआयडीसीचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी रंगा नाईक, औरंगाबादचे जिल्हाधिकारी सुनील चव्हाण (दूरदृश्यप्रणालीद्वारे), उद्योग विभागाचे



**उदय सामंत**
मंत्री, उद्योग

सहसचिव संजय देगांवकर, अवर सचिव किरण जाधव, औरंगाबादचे प्रादेशिक अधिकारी चेतन गिरासे आदी उपस्थित होते.

## उद्योजकांना प्रोत्साहन

राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक्स धोरणांतर्गत रांजणगाव (पुणे) येथे २९७.११ एकरमध्ये इलेक्ट्रॉनिक मॅन्युफॅक्चरिंग क्लस्टरसाठी केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. या माध्यमातून ५००० तरुणांना रोजगार उपलब्ध होणार आहेत. हा प्रकल्प राज्यात आणल्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी आभार मानले आहेत.

तसेच पुण्यामध्ये सी-डॅक हाही प्रकल्प लवकरच येणार असून या दोन्ही प्रकल्पांच्या माध्यमातून सुमारे २००० कोटींची गुंतवणूक करण्यात येणार आहे. युती सरकारने हे प्रकल्प राज्यात येण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा केलेला आहे. यास्तव समितीची १९ जुलै २०२२ रोजी बैठक घेण्यात आली होती. या क्लस्टरसाठी ४९२.८५ कोटी खर्च होणार असून हा प्रकल्प ३२ महिन्यांत पूर्ण होणार आहे. तसेच या प्रकल्पाच्या माध्यमातून उद्योजकांना प्रोत्साहन मिळणार असून इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स, कन्झ्युमर इलेक्ट्रॉनिक्स, सोलार पीव्ही मॅन्युफॅक्चरिंग, ई-मोबिलिटी उत्पादक असे अनेक उद्योग येणार आहेत, अशी माहिती मंत्री श्री. सामंत यांनी दिली आहे.

## आरोग्यावरील खर्चात वाढ

सुदृढ महाराष्ट्राची संकल्पना राबवण्यासाठी आरोग्यावरील खर्चात वाढ करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी केले. मुंबई मराठी पत्रकार संघ, सार्वजनिक आरोग्य विभाग आणि राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या वतीने महिला पत्रकार आणि पत्रकारांच्या कुटुंबीयांसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. त्या वेळी ते बोलत होते.

मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे, आरोग्य विभागाचे सहायक संचालक डॉ. धनंजय चाकूरकर, पत्रकार संघाच्या उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर, कार्यवाह संदीप चव्हाण, कार्यकारिणी सदस्य राजेंद्र हुंजे, प्रा. एम.बी. टकले आदी उपस्थित होते. मुंबई मराठी पत्रकार संघाच्या कार्यालयात हे आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.



**प्रा. डॉ. तानाजी सावंत**
मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण

## महिलांची आरोग्य तपासणी

राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियाना'स राज्यातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून राज्यातील सुमारे एक कोटींहून अधिक महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली असल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांनी दिली.

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात राज्यातील एक कोटी महिलांची मोफत आरोग्य तपासणी अवघ्या २० दिवसांत झाली हे विशेष आहे. राज्यातील दुर्गम, अतिदुर्गम, आदिवासी, डोंगराळ भागासह मोठ्या महानगरातील मॉडर्न वसाहतीत अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने आरोग्य शिबिराच्या माध्यमातून तपासणीस करण्यात येत असून ग्रामीण भागात महिलांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे, असे त्यांनी सांगितले.

या अभियानाचा एक कोटीचा टप्पा ओलांडल्यानंतर आरोग्यमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी आढावा घेतला. अभियानास अतिदुर्गम, आदिवासी पाडे, तांडा वस्तीसह खेड्यातील महिलांचा प्रतिसाद भरभरून मिळत आहे. कधीच दवाखान्याची पायरी न चढलेल्या माताभगिनी स्वतःच्या आरोग्याच्या तपासणीसाठी पुढे येत आहेत. या महिलांना त्यांच्या गावातून प्राथमिक आरोग्य केंद्रापर्यंत वाहनातून ने-आण करण्याची सुविधा आशाताई, अंगणवाडी सेविका यांच्या सहकार्याने केल्याने यास अपेक्षित असा प्रतिसाद मिळाल्याचे आरोग्य मंत्री श्री. सावंत यांनी सांगितले.

## आनंदाचा शिधा वितरणाचा शुभारंभ

दिवाळी निमित्ताने राज्यातील सुमारे ७ कोटी नागरिकांना देण्यात येणाऱ्या 'आनंदाचा शिधा' या माध्यमातून चार वस्तूंच्या वितरणाचा शुभारंभ अन्न व नागरी पुरवठा मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते झाला. काळा चौकी, घोडपदेव येथील रेशनिंग दुकानातील पात्र शिधापत्रिकाधारकांना चार जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

मंत्री श्री. चव्हाण यांनी या वेळी सांगितले की, राज्यातील गरिबांची दिवाळी गोड करण्याच्या दृष्टिकोनातून सरकारने पहिल्यांदाच हे पाऊल उचलले. चांगल्या प्रतीचा १ किलो रवा, १ किलो चणा डाळ,



**रवींद्र चव्हाण**
मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून), अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण

१ किलो साखर आणि १ लिटर पामतेल स्वस्त दरात १०० रुपयांमध्ये सर्वांना मिळाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने हे पाऊल उचलले आहे. आज महाराष्ट्रातील सर्व रेशनिंग दुकांनावर या चारही जीवनावश्यक वस्तू पोहचल्या आहेत, असेही श्री. चव्हाण यांनी स्पष्ट केले.

## योजनांचा आढावा

केंद्र सरकार आणि राज्य शासनाच्या कृषिविषयक योजना सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे आणि गरजू शेतकऱ्यांना त्याचा लाभ देणे याला प्राधान्य द्यावे, असे निर्देश राज्याचे कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी दिले.

मंत्रालय दालनात मंत्री श्री. सत्तार यांनी केंद्र पुरस्कृत योजना, राज्य शासनाच्या विविध कृषी योजना, मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोक्रा) आदींचा आढावा घेतला. त्या वेळी ते बोलत होते. कृषी आयुक्त धीरजकुमार, स्मार्टचे प्रकल्प संचालक डॉ. कौस्तुभ दिवेगावकर, कृषी सहसचिव सरिता बांदेकर - देशमुख, संचालक (विस्तार व प्रशिक्षण), फलोत्पादन संचालक डॉ. के. पी. मोते, आत्माचे प्रकल्प संचालक दशरथ तांभाळे, नियोजन संचालक सुभाष नागदे यांच्यासह कृषी विभागाचे विविध अधिकारी उपस्थित होते.



**अब्दुल सत्तार**
मंत्री, कृषी

## अतिवृष्टीचा आढावा

राज्यात गेल्या काही दिवसांपासून विविध भागात सुरू असलेल्या अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीबाबत कृषी मंत्री अब्दुल सत्तार यांनी मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी आणि विविध कृषी विद्यापीठांच्या अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. नुकसानीचे पंचनामे वेळेवर होतील, यासाठी विविध यंत्रणा समन्वयाने काम करून शेतकऱ्यांना दिलासा देतील, यादृष्टीने काम करण्याची सूचना त्यांनी केली.

या वेळी कृषी विभागाच्या सहसचिव सरिता बांदेकर, बी. एस. रासकर, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे संचालक श्री. भागडे, राज्याच्या चारही कृषी विद्यापीठांचे कुलसचिव उपस्थित होते.

मंत्री श्री. सत्तार यांनी या वेळी विभागनिहाय माहिती घेतली. मोसमी पाऊस परतीच्या मार्गावर असताना राज्याला अतिवृष्टीचा मोठा फटका बसला. विशेषत: काही भागात सोयाबीन, कांदा यासह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. याठिकाणी तत्काळ पंचनामे शासकीय यंत्रणेच्यावतीने करावेत. सर्व पंचनामे वेळेवर करून राज्यात किती नुकसान झाले, याची वस्तुनिष्ठ माहिती घेण्याची सूचना त्यांनी केली.

## रेल्वे पुलाची पाहणी

पश्चिम रेल्वेवरील चर्नी रोड स्थानकातील प्रवाशांसाठी बंद करण्यात आलेल्या पुलाची पालकमंत्री दीपक केसरकर यांनी पाहणी केली. प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत लवकरच जिल्हाधिकारी, रेल्वे, मुंबई महानगरपालिका आदी संबंधित यंत्रणांच्या अधिकाऱ्यांची बैठक घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.



**दीपक केसरकर**
मंत्री, शालेय शिक्षण, मराठी भाषा

चर्नी रोड स्थानकातील उत्तर बाजूचा प्लॅटफॉर्म क्रमांक २ आणि ३ वर उतरणारा पूल सुरक्षेच्या दृष्टीने बंद करण्यात आला आहे. येथे प्रवाशांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी नवीन पूल बांधण्यात येणार आहे. या परिसराची मंत्री श्री. केसरकर यांनी पाहणी केली. या वेळी स्थानिक लोकप्रतिनिधी, मुंबईचे जिल्हाधिकारी राजीव निवतकर, सहायक विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री. वर्मा, महानगरपालिकेचे सहायक आयुक्त शरद उघडे आदी उपस्थित होते.

## अभिवाचनाच्या कट्ट्याचे उद्घाटन

महाराष्ट्राला थोर संत, विचारवंत, प्रबोधनकार, सामाजिक शास्त्रज्ञ यांची परंपरा लाभलेली आहे. यांच्या विचाराने महाराष्ट्र घडला आहे. 'पुस्तकांचे गाव' या सारखे उत्तम उपक्रम शासनातर्फे राबवले जात आहेत. समृद्ध मराठी भाषेचे महत्व नव्या पिढीपर्यंत पोहोचावे, यासाठी शासन विविध उपक्रम राबवत असल्याचे मराठी भाषा मंत्री दीपक केसरकर यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या भाषा संचालनालय व मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयात आज 'वाचन प्रेरणा दिनाचे' आयोजन करण्यात आले होते, अभिवाचनाच्या कट्ट्याचे उद्घाटन मंत्री श्री. केसरकर यांनी केले. या वेळी जिल्हाधिकारी निधी चौधरी, भाषा संचालक विजया डोनीकर, भाषासंवर्धक ग्रंथसखा श्यामसुंदर जोशी उपस्थित होते.

## पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर

२०१७ ते २०२० या कालावधीत पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजारांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर करण्यात आल्याची माहिती सहकार मंत्री अतुल सावे यांनी दिली. ही यादी संबंधित बँक शाखा, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था, ग्रामपंचायत कार्यालय इत्यादी ठिकाणी सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.



**अतुल सावे**
मंत्री, सहकार, इतर मागास बहुजन कल्याण

या यादीतील शेतकऱ्यांनी आपले आधार कार्ड, कर्जखाते पासबुक व बचतखाते पासबूक घेऊन नजीकच्या 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा बँकेच्या शाखेत जाऊन आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन श्री. सावे यांनी केले.

सन २०१७ - १८, २०१८ - १९ व २०१९ - २० या तीन आर्थिक वर्षांपैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षांमध्ये पीक कर्जाची उचल करून शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या विहित कालावधीत परतफेड केलेली आहे. अशा शेतकऱ्यांना शासनाकडून ५० हजारपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

## तपास यंत्रणा सक्षम करणार

राज्यात तयार होणाऱ्या मद्याची बेकायदेशीर वाहतूक व विक्रीस पायबंद बसावा. तसेच परराज्यातून होणारी अवैध मद्य वाहतूक रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाची तपास यंत्रणा अधिक सक्षम करणार असल्याचे राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांनी सांगितले.



**शंभुराज देसाई**
मंत्री, राज्य उत्पादन शुल्क

राज्य उत्पादन शुल्क विभागात केंद्रीकृत सीसीटीव्ही यंत्रणा बसवणे, वाहनांना डिजिटल लॉकिंग यंत्रणा तसेच बांधण्यात येणाऱ्या क्षेत्रीय कार्यालयांच्या इमारत बांधकाम आराखडा याबाबत मंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली.

मद्यनिर्मिती ते मद्यविक्री या टप्प्यामध्ये वाहनांना डिजिटल लॉकिंग यंत्रणा असल्यास अवैध वाहतुकीस आळा बसेल. केंद्रीकृत सीसीटीव्ही यंत्रणेमुळे जिल्हास्तरावरील यंत्रणा अधिक कार्यक्षम होतील. तसेच विभागाच्या क्षेत्रीय इमारतीचा आराखडा सर्व ठिकाणी सारखा ठेवावा, अशा सूचनाही या वेळी मंत्री श्री. देसाई यांनी दिल्या.या बैठकीत केंद्रीकृत सीसीटीव्ही यंत्रणा व डिजिटल लॉकिंग प्रस्ताव याबाबत सादरीकरण करण्यात आले. या बैठकीस राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त कांतीलाल उमाप, राज्य उत्पादन शुल्कचे उपसचिव युवराज अजेटराव यांच्यासह विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## दिव्यांगासाठी एक खिडकी योजना

दिव्यांगासाठी राबवण्यात येत असलेल्या शासनाच्या सर्व योजनांचा लाभ महापालिका क्षेत्रात एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यासाठी एक खिडकी योजना सुरू करण्यासाठी महापालिकेने कार्यवाही करावी, असे निर्देश मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिले.

बोरिवली पश्चिम येथील आर सेंट्रल व आर नॉर्थ वॉर्ड येथे 'पालकमंत्री आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री श्री. लोढा बोलत होते. या वेळी खासदार गोपाळ शेट्टी, आमदार प्रवीण दरेकर, मंदा म्हात्रे, मनीषा चौधरी, प्रकाश सुर्वे, सहायक आयुक्त भाग्यश्री कापसे यांच्यासह सर्व विभागाचे अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बेरोजगारांना रोजगार

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागामार्फत राबवण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांद्वारे राज्यात विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योग यांमध्ये सप्टेंबर २०२२ मध्ये १३ हजार ०२४ बेरोजगार उमेदवारांना रोजगार मिळवून देण्यात आला असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली. महास्वयं वेबपोर्टल, ऑनलाईन रोजगार मेळावे आदी विविध उपक्रमांद्वारे राज्यात नोकरीइच्छुक उमेदवार आणि विविध कंपन्या, कॉर्पोरेट संस्था, उद्योग यांची सांगड घालून रोजगार उपलब्ध करून देण्यात येतो, असे त्यांनी सांगितले.



**मंगलप्रभात लोढा**
मंत्री, पर्यटन, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता, महिला व बालविकास.

मंत्री श्री. लोढा म्हणाले, 'बेरोजगार उमेदवार आणि उद्योजक यांच्यामध्ये सांगड घालण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता विभागाने https://rojgar.mahaswayam.gov.in हे वेबपोर्टल सुरू केले आहे. या वेबपोर्टलवर बेरोजगार उमेदवार आपले शिक्षण, कौशल्ये, अनुभव आदी माहीतीसह नोंदणी करतात. त्याचबरोबर कुशल उमेदवारांच्या शोधात असलेल्या कंपन्या, उद्योजक, कॉर्पोरेट्स हेसुद्धा या वेबपोर्टलवर नोंदणी करून त्यांना हवे असलेले कुशल उमेदवार शोधू शकतात. नोकरीइच्छुक उमेदवारांनी या वेबपोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. विभागामार्फत जिल्ह्यांमध्ये वेळोवेळी ऑनलाईन रोजगार मेळाव्यांचेही आयोजन करण्यात येते'.

**– टीम लोकराज्य**

राज्य मंत्रिमंडळाच्या १२, २० ऑक्टोबर २०२२ आणि २ नोव्हेंबर २०२२ रोजीच्या बैठकीत विधी व न्याय, ऊर्जा, नियोजन, सामान्य प्रशासन, परिवहन, गृह, वित्त, जलसंपदा, अल्पसंख्याक विकास, सार्वजनिक आरोग्य, माहिती तंत्रज्ञान, सहकार, पणन, आदिवासी विकास, महिला व बाल विकास, जलसंपदा आदी विभागाचे महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. या निर्णयांची थोडक्यात माहिती...



# मंत्रिमंडळात ठरले !

## दिवाणी न्यायालये स्थापण्यास मान्यता

माणगाव, रामटेक, इगतपुरी, बेलापूर, कर्जत, वाई, येवला, परांडा येथे न्यायालये स्थापन करून पदनिर्मिती करण्याचा निर्णय घेण्यात आला. रायगड-अलिबाग जिल्ह्यातील माणगाव येथे जिल्हा न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करण्यात येऊन २० पदांना मान्यता देण्यात येत आहे.



नागपूर जिल्ह्यातील रामटेक येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करण्यात येईल. यासाठी १४ नियमित पदे व एक पद बाह्य यंत्रणेद्वारे भरण्यात येईल. नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करण्यात येईल. यासाठी २० पदांना मान्यता देण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यात नवी मुंबई, बेलापूर हे जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायालय त्याचप्रमाणे बेलापूर येथेच जिल्हा न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली. जिल्हा न्यायालयासाठी जिल्हा न्यायाधीशांची १९ नियमित पदे निर्माण करण्यात येतील व ५ पदे बाह्य यंत्रणेद्वारे भरण्यात येतील, तर वरिष्ठ स्तर न्यायालयासाठी १६ नियमित व ४ पदे बाह्य यंत्रणेद्वारे घेण्यास मान्यता देण्यात आली.

बेलापूर येथेच एक कौटुंबिक न्यायालय स्थापन करून याकरिता १४ पदे भरण्यास मान्यता देण्यात आली. त्याचप्रमाणे विवाह समुपदेशक व त्यांचे साहाय्यभूत अशी ५ पदेदेखील या ठिकाणी भरण्यात येतील. अहमदनगर जिल्ह्यातील कर्जत येथे दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) कार्यालय स्थापन करून नियमित १६ व ३ बाह्य यंत्रणेद्वारे अशी १९ पदे भरण्यात येतील.

सातारा जिल्ह्यातील वाई येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यात येवून २४ पदे निर्माण करण्यात येतील. याकरिता १ कोटी ३ लाख ५३ हजार २२० इतका खर्च येईल. त्याचप्रमाणे वाई येथे दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर) स्थापन करण्यात येऊन १६ नियमित व ४ बाह्य यंत्रणेद्वारे अशा २० पदांना मान्यता देण्यात आली.

उस्मानाबाद जिल्ह्यातील परांडा येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यात येईल. यासाठी १९ नियमित पदे व ६ बाह्य यंत्रणेद्वारे अशी २५ पदे निर्माण करण्यात येतील. नाशिक जिल्ह्यातील येवला येथे जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यात येईल. यासाठी २५ पदांना मान्यता देण्यात आली आहे.

## मोबदल्याचे सुधारित धोरण

अतिउच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठीच्या मनोऱ्यांसाठी जमिनीचा मोबदला देण्याकरिता सुधारित धोरणास मान्यता देण्यात आली. वीज मनोरा आणि वाहिनी उभारण्यासाठी जमिनीचे अधिग्रहण केले जात नाही. केवळ जमिनीचा वापर केला जातो. मनोरा उभारतांना जमिनीच्या आणि पिकांच्या होणाऱ्या नुकसानीपोटी मोबदला दिला जातो. मात्र, यासाठी सध्या असलेल्या शासनाच्या धोरणात सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सध्याच्या धोरणात बाधित शेतकरी आणि जमीन मालकांना मिळणारी नुकसानभरपाई तुटपुंजी असल्याने त्यांचा तीव्र विरोध होत आहे. त्यामुळे पारेषण कंपन्याचे विविध प्रकल्प रखडले आहेत. नव्या धोरणामुळे मनोरा आणि वाहिनी उभारणी वेगाने होऊन वीज निर्मितीस मदत होईल. या सुधारित धोरणाप्रमाणे ६६ के.व्ही. व त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या अति उच्चदाब पारेषण वाहिन्यांसाठी पुढीलप्रमाणे मोबदला देण्यात येईल.

मनोऱ्याने व्याप्त जमिनीच्या क्षेत्रफळाचे रेडिरेकनरमधील किंवा मागील ३ वर्षांतील झालेल्या जमिनीच्या खरेदी विक्री व्यवहाराच्या आधारे सरासरी दर यापैकी जो दर अधिक असेल, त्या दराच्या दुप्पट मोबदला देण्यात येईल. मनोऱ्यातून जाणाऱ्या वाहिन्यांच्या पट्ट्याखालील येणाऱ्या क्षेत्रासाठी अतिरिक्त १५ टक्के तसेच रेडिरेकनर किंवा सरासरी दर यापैकी जो दर अधिक असेल, त्या दराच्या १५ टक्के असा एकूण ३० टक्के मोबदला दिला जाईल.

अपवादात्मक परिस्थितीत योग्य



मोबदला ठरवण्याचे अधिकार उप विभागीय मूल्यांकन समितीस राहतील. पारेषण वाहिनीच्या विहित मार्गात कोणतेही बांधकाम करण्यास मान्यता राहणार नाही. पिके, फळझाडे किंवा इतर झाडांसाठीची नुकसानभरपाई संबंधित विभागाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे दिली जाईल. हे धोरण मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांसह संपूर्ण महाराष्ट्राला लागू राहील.

मनोऱ्याने बाधित झालेल्या जमिनीचा मोबदला थेट संबंधित शेतकरी तसेच जमीन मालकाच्या बँक खात्यात जमा करण्यात येईल. हे धोरण संबंधित शासन निर्णय जाहीर झाल्यापासून काम सुरू असलेल्या व नवीन प्रस्तावित अशा सर्व अतिउच्चदाब पारेषण वाहिनी प्रकल्पांना लागू राहील. मोबदला निश्चित करण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली मूल्यांकन समिती असेल. या धोरणाच्या अंमलबजावणीत अडचण आल्यास धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती निर्णय घेईल.

## महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन–मित्र स्थापन करणार

नीति आयोगाप्रमाणेच राज्यात महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन-मित्र स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी भारत सरकारमार्फत नीति आयोगाच्या धर्तीवर राज्यामध्येही अशा संस्थेची स्थापना करण्याबाबत आयोगाकडून सूचना प्राप्त झाली होती. 'मित्र'ला मार्गदर्शन करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळ व दैनंदिन कामकाजासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी मंडळ असेल. नियामक मंडळात उपमुख्यमंत्र्यांसह अध्यक्ष राहतील. तसेच उपाध्यक्षपदी तज्ज्ञ व्यक्तीची नियुक्ती करण्यात येईल.

१८ सप्टेंबर २०२२ रोजी नीति आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, इतर तज्ज्ञ, विविध प्रशासकीय विभागांचे सचिव व वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्र्यांची बैठक झाली होती.

भारत सरकारकडून स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारताला २०४७ पर्यंत विकसित भारत - भारत २०४७ (India2047) करण्याचा संकल्प करण्यात आलेला आहे. यामध्ये सन २०२५-२६ पर्यंत भारताची अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट जाहीर केले आहे. तसेच सन २०३० पर्यंत शाश्वत विकास उद्दिष्टेसुद्धा साध्य करण्याचा भारत सरकारचा मानस आहे.

या दृष्टीने महाराष्ट्र राज्याची अर्थव्यवस्था सन २०२७ पर्यंत १ ट्रिलियन डॉलर व सन २०४७ पर्यंत ३.५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचवणे हे राज्याचे मुख्य ध्येय आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये राज्याची अर्थव्यवस्था ही सर्वात मोठी आहे. भारताच्या सकल उत्पन्नामध्ये राज्याचा वाटा १५% आहे. राज्याच्या सकल उत्पन्नामध्ये सन २०२०-२१ करिता कृषी, सेवा क्षेत्र, व उद्योग क्षेत्राचा वाटा अनुक्रमे १३.२%, ६०% व २६.८% आहे.

नीति आयोगाच्या धोरणाशी सुसंगत मात्र राज्याच्या गरजांची दखल घेत खासगी क्षेत्र व अशासकीय संस्थांच्या सहभागाद्वारे राज्याचा जलद आणि सर्वसमावेशक विकास साधणे हा मित्रच्या स्थापनेचा हेतू आहे. मित्र ही राज्याच्या विकासाला धोरणात्मक, तांत्रिक तसेच कार्यात्मक दिशा देणारी थिंक टँक असेल. मित्र राज्य शासनाचे विविध विभाग, भारत सरकार, नीति आयोग, सिव्हिल सोसायटी, विविध अशासकीय संस्था तसेच खासगी व्यावसायिक संस्था यांच्यात सन २०४७ पर्यंत राज्याचे निर्धारित उद्दिष्ट साध्य करण्याच्या हेतूने समन्वयाचे काम करेल.

## ७५ हजार पदे भरण्याचा मार्ग सुकर

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड पदभरतीसाठी परीक्षा टीसीएस, आयबीपीएसमार्फत नामनिर्देशनाद्वारे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे ७५ हजार रिक्त पदे भरतीचा मार्ग सुकर झाला आहे.

मागील वर्षाच्या कालावधीत परीक्षांसंदर्भात झालेल्या विविध घोटाळ्यांच्या संदर्भात टीसीएस-आयओएन, आयबीपीएस या कंपन्यांना नामनिर्देशनाने काम सोपवावे असे ठरले होते. त्याप्रमाणे भूतपूर्व महाराष्ट्र दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील सरळ सेवेची रिक्त पदे ऑनलाइन पद्धतीने वरील संस्थांमार्फत घेण्याचा निर्णय झाला. या कंपन्यांची नामनिर्देशनासह निवड झाल्यानंतर परीक्षांची विहित कार्यपद्धती व इतर अटी शर्ती सामान्य प्रशासन विभाग (सेवा) यांच्यामार्फत निश्चित करण्यात येतील.

## भंगार स्थितीतील वाहनांचा प्रश्न सुटणार

ऐच्छिकरीत्या वाहनांचे स्क्रॅपिंग करणाऱ्यांना व्याज व दंड माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे भंगार स्थितीतील वाहनांचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे. नोंदणीकृत वाहन स्क्रॅपिंग सुविधा देणाऱ्यांमार्फत स्क्रॅप करण्यात येणाऱ्या वाहनांचा थकीत असणारा मूळ मोटार वाहन कर वसूल करून त्यावरील व्याज व संपूर्ण पर्यावरण कर तसेच व्याज माफ करण्यात येईल. थकीत कराच्या वसुलीसाठी वाहनाची लिलाव किंमत ही मूळ करापेक्षा जास्त असल्यास थकीत कर वसूल करून उर्वरित रक्कम वाहन मालकास परत करण्यात येईल.

ही व्याज व दंड माफी धोरण ३ वर्षांच्या कालावधीसाठी राहील. केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९च्या नियम ५१-ए मध्ये दिल्यानुसार नोंदणी केल्यापासून स्वेच्छेने ८ वर्षाच्या आत वाहन स्क्रॅप केल्यास परिवहन वाहनांना वार्षिक कराच्या १० टक्के सूट मिळेल. नोंदणी केल्यापासून स्वेच्छेने १५ वर्षाच्या आत वाहन स्क्रॅप केल्यास परिवहनेतर वाहनांना एक रकमी कराच्या १० टक्के सूट मिळेल. ही सूट हे धोरण लागू

झाल्यापासून ३ वर्षांच्या कालावधीच्या आत जे वाहनधारक स्वेच्छेने त्यांचे वाहन स्क्रॅप करतील त्यांना मिळेल.

शासनाच्या सर्व विभागांनी बेवारस असलेल्या स्क्रॅप वाहनांचा लिलाव हा केवळ नोंदणीकृत वाहन स्क्रॅपिंग सुविधा देणाऱ्यांमार्फत करावा. तसेच लिलावाच्या वाहनाची किंमत ही स्क्रॅप बाजारमूल्यापेक्षा कमी नसावी. या धोरणामुळे रस्त्याच्या दोन्ही बाजूला सोडून दिलेल्या स्क्रॅप वाहनांचा प्रश्न सुटेल. तसेच पर्यावरणाची हानी होणार नाही आणि जुन्या वाहनांमुळे रस्त्यांवरील अपघातांचा धोकाही कमी होईल.

## आंदोलनातील खटले मागे

राजकीय आणि सामाजिक आंदोलनातील ३० जून २०२२ पर्यंतचे खटले आता मागे घेण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी हे खटले मागे घेण्यासाठी ३१ मार्च २०२२ ची कालमर्यादा होती. ती आता ३० जूनपर्यंत वाढवण्यात आली असून ५ लाखांपेक्षा जास्त नुकसान न झालेल्या तसेच जीवितहानी न झालेले खटले मागे घेण्याची कार्यवाही केली जाईल. या संदर्भात शासन निर्णयातील इतर सर्व अटी, शर्ती, तरतुदी कायम ठेवण्यात आलेल्या आहेत.



## माहिती तंत्रज्ञांची पदे स्वतंत्रपणे भरणार

माहिती तंत्रज्ञान विभागातील तज्ज्ञांची राजपत्रित पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतून वगळण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे नव्याने निर्माण करण्यात आलेली माहिती तंत्रज्ञान प्रशासक आज्ञावली तज्ज्ञ (गट-अ) तसेच आज्ञावली तज्ज्ञ (गट-अ), सहायक आज्ञावली तज्ज्ञ (गट-ब) अशी ३ राजपत्रित पदे आयोगाच्या कार्यकक्षेतून वगळण्यात येतील. तसेच या पदाचे सेवाप्रवेश नियम स्वतंत्रपणे तयार करण्यात येतील. सध्या



उपलब्ध असलेले तंत्रज्ञ अन्य ठिकाणी चांगली संधी मिळाल्यास काम सोडून जातात. असे अचानकपणे झाल्यास प्रणालीमध्ये काही तांत्रिक अडचणी उद्‌भवल्यास मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे ही पदे तातडीने भरता यावीत म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे.

## प्रकल्पांसाठी सुधारित मान्यता

बुलडाणा जिल्ह्यातील अरकचेरी आणि आलेवाडी बृहत लघू पाटबंधारे प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे सुमारे १९१८ हेक्टर जमिनीला सिंचनाचा फायदा होईल. अरकचेरी ही लघू पाटबंधारे योजना बुलडाणा जिल्ह्यातील संग्रामपूर तालुक्यातील सोनाळा गावाजवळ अरकचेरी नाल्यावर बांधण्यात येत आहे. या ठिकाणी १३.१०३ द.ल.घ.मी. साठवण क्षमतेचे माती धरणाचे बांधकाम सुरू आहे. या प्रकल्पामुळे ८ गावांतील ११६८ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पासाठी २७७.८५ कोटी इतक्या किमतीची पहिली सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

आलेवाडी बृहत लघू पाटबंधारे प्रकल्प संग्रामपूर तालुक्यातील आलेवाडी गावाजवळ बांधण्यात येत आहे. या ठिकाणी १०.७५४७ द.ल.घ.मी. क्षमतेचे माती धरणाचे बांधकाम सुरू आहे. या प्रकल्पामुळे ४ गावांतील ७५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. यासाठी २०५.६१ कोटी इतक्या किमतीची पहिली सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली.

## अल्पसंख्याक महिलांसाठी बचतगट

अल्पसंख्याक महिलांच्या आर्थिक विकासासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून राज्यातील १५ जिल्ह्यांमध्ये नवीन २ हजार ८०० बचतगटांची निर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली.

राज्यातील मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्राचा जलद विकास व्हावा, याकरिता विशेष कार्यक्रम २०१८ अंतर्गत राबवण्यात येत आहे. यामध्ये औरंगाबाद, अकोला, अमरावती, बुलडाणा, यवतमाळ, हिंगोली, जालना, उस्मानाबाद, लातूर, बीड, चंद्रपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, गडचिरोली या १५ जिल्ह्यांमध्ये प्रतिजिल्हा २०० प्रमाणे अंदाजे नवीन २८०० बचतगटांची निर्मिती महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत करण्यात येणार आहे.

तसेच नांदेड, कारंजा (जि. वाशिम), परभणी, औरंगाबाद, नागपूर या पाच शहरांमध्ये महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत अल्पसंख्याक महिलांसाठी स्वयंसाहाय्यता बचतगट सध्या स्थापन करण्यात आलेले आहेत. या बचतगटातील १ हजार ५०० महिलांना महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी व महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. बाजारातील विविध क्षेत्रातील कौशल्याच्या गरजेनुसार कौशल्य विकास प्रशिक्षण देण्याच्या महिला आर्थिक विकास महामंडळाच्या या सुधारित योजनेस या बैठकीत मान्यता देण्यात आली. यानुसार या प्रशिक्षण कार्यक्रमास २०२१-२२ ते २०२७-२८ या कालावधीत राबवण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

## मालमत्ता पुनर्रचना कंपनी

राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनीचे भागभांडवल ३११ कोटी करण्यास मान्यता देण्यात आली. २१ सप्टेंबर रोजी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्य मालमत्ता पुनर्रचना कंपनी स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली होती. त्याप्रमाणे कंपनी निबंधकाकडे नोंदणी झाली असून या कंपनीचे भागभांडवल १११ कोटींवरून आज ३११ कोटी असे वाढवण्यात आले.

## आकस्मिकता निधीत वाढ

महाराष्ट्र आकस्मिकता निधीच्या मर्यादेत २०० कोटींनी तात्पुरती वाढ

करण्यास मान्यता देण्यात आली. आकस्मिकता निधीची मर्यादा १५० कोटी रुपये इतकी असून २०० कोटींची तात्पुरती वाढ झाल्याने ती ३५० कोटी रुपये होईल. यासाठीचा अध्यादेश निर्गमित करण्यात येईल.

## मोहिमेसाठी निधी

राज्यातील माता सुरक्षित तर घर सुरक्षित या विशेष मोहिमेत महिलांना तपासणीसाठी नेण्याकरिता तसेच औषधांसाठी प्रतिजिल्हा २ कोटी रुपये निधी देण्यास मान्यता देण्यात आली. या मोहिमेला नवरात्री उत्सवापासून सुरुवात झाली असून आरोग्य तपासणीस चांगला प्रतिसाद आहे. या मोहिमेत राज्यातील अंदाजे ४ कोटी महिलांची आरोग्य तपासणी व औषधोपचार करण्यात येईल. यामध्ये १८ वर्षांवरील महिला, माता, गरोदर स्त्रिया यांचा समावेश आहे. हा कार्यक्रम १५ नोव्हेंबर २०२२ पर्यंत सुरू राहील.



## दूरसंचार पायाभूत सुविधा धोरण

राज्यात ५ जी तंत्रज्ञानासाठी पायाभूत सुविधा वेगाने वाढवण्याकरिता भारतीय टेलिग्राफ नियमांप्रमाणे राज्याचे दूरसंचार धोरण सुसंगत असे करण्यात आले आहे. यासंदर्भातील निर्णय घेण्यात आला. हे धोरण जमिनीवरून आणि जमिनीखालून टाकावयाच्या दोन्ही प्रकारच्या ऑप्टिकल फायबर केबलसाठी लागू राहतील. सक्षम प्राधिकरण नेटवर्क टाकण्यासाठी पर्यायी मार्ग सुचवू शकतील. ऑप्टिकल फायबर केबल टाकण्यासाठीचा सूचक कृती आराखडा राज्याच्या पोर्टलवर किमान ६ महिने अगोदर उपलब्ध करणे आवश्यक राहील. भारत सरकारच्या टेलिग्राफ नियम दुरुस्ती २०२२ नुसार, भारत सरकारने वेळोवेळी केलेल्या सुधारणांच्या अधीन विविध शुल्क आकारले जातील. भारताच्या टेलीग्राफ नियम सुधारणा २०२२ अंतर्गत निर्धारित केलेल्या मर्यादेच्या अधीन शुल्क आकारण्याबाबत सक्षम प्राधिकरणे निर्णय घेतील.

## नेटवर्क संस्थेस निधी

महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क संस्थेस अनुदान स्वरूपात निधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे शक्य होणार आहे. सप्टेंबर २०२० मध्ये एकूण १४२.९० दशलक्ष अमेरिकन डॉलर एवढ्या रकमेचा आशियाई विकास बँक अर्थसाहाय्यित ‘महाराष्ट्र ॲग्रीबिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पास मान्यता दिलेली आहे. हा प्रकल्प मॅग्नेट संस्थेमार्फत राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये ६ वर्षांसाठी राबवण्यात येत आहे. यामुळे नाशवंत शेतीमालाचे काढणी पश्चात होणारे नुकसान कमी होणार आहे. तसेच देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चांगले दर मिळण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना लाभदायक ठरणार आहे.

## शेतकऱ्यांना दिलासा

भूविकास बँकेचे कर्ज घेतलेल्या ३४,७८८ कर्जदार शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी ९६४ कोटी १५ लाख रुपयांची कर्जमाफी देण्याचा तसेच ही रक्कम भूविकास बँकेकडून शासनास येणे



असलेल्या रकमेमध्ये समायोजित करण्यास मान्यता देण्यात आली. या निर्णयामुळे राज्यातील सुमारे ६९ हजार हेक्टर शेतजमिनीवरील भूविकास बँकांच्या कर्जाचा बोजा कमी होणार आहे. तसेच राज्यातील सर्व भूविकास बँकांचे सेवानिवृत्त तसेच कार्यरत व कंत्राटी कर्मचाऱ्यांची एकूण देणी अदा करण्यात येणार असल्याने या सर्व कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

## गाळप क्षमता वाढवण्यासाठी भागभांडवल



सध्याच्या १२५० मे टन प्रतिदिन गाळप क्षमता असलेल्या सहकारी साखर कारखान्यांना २५०० मे.टन पर्यंत दररोज गाळप करणे शक्य व्हावे म्हणून त्यांना शासकीय भागभांडवल देण्याचा निर्णय घेण्यात आला. पाटण तालुक्यातील लोकनेते बाळासाहेब देसाई सहकारी साखर कारखाना, दौलतनगर व औसा तालुक्यातील शेतकरी सहकारी कारखाना, किल्लारी या दोन कारखान्यांना अर्थसाहाय्य देण्यात येईल. यासाठी येणाऱ्या ३४०६.९६ लाख रुपयांच्या आर्थिक भारास थकीत असलेला एफआरपी पूर्ण देण्याच्या अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली.

## शेतकऱ्यांना मदत करणार

राज्यातील शेतकऱ्यांना पावसामुळे झालेल्या नुकसानभरपाईपोटी आत्तापर्यंत ४७०० कोटी रुपयांची वाढीव दराने मदत दिल्यानंतर आता ऑक्टोबर २०२२ मध्ये झालेल्या पावसाने झालेल्या नुकसानीसाठीसुद्धा मदत देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे होते.

ऑक्टोबरमध्ये पावसामुळे राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. प्राथमिक अंदाजानुसार सुमारे २५ लाख हेक्टर जमिनीचे नुकसान झाले आहे. आजपर्यंत कधीही सततच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाई दिली जात नव्हती. मात्र शासनाने प्रथमच अशा शेतकऱ्यांना वाऱ्यावर न सोडता दिलासा देण्याचा निर्णय घेतला असून यासाठी सुमारे ७५० कोटी रुपये इतके वाटप करण्यात आले आहे. ऑक्टोबर महिन्यात झालेला सततचा पाऊस आणि नुकसानीसाठी हेच निर्णय लागू करण्यात येणार आहेत.



आपण महसूल आणि कृषी विभागाला निर्देश दिले होते, त्याप्रमाणे सततच्या पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे वेगाने सुरू असून यासंदर्भात प्रशासनाला सूचना दिल्याचे मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाल्याप्रमाणे या शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे लवकरात लवकर संपवावेत असे निर्देश देण्यात आले आहेत. जेणेकरून त्यांना मदत करता येईल.

मदत व पुनर्वसन विभागाने माहिती दिल्याप्रमाणे जून-जुलैपासून सुरू असलेल्या पावसामुळे नुकसान झालेल्या ४० लाख १५ हजार ८४७ शेतकऱ्यांना सुमारे ४७०० कोटींची मदत करण्यात आली आहे. ही मदत एनडीआरएफच्या निकषापेक्षा दुपटीने जास्त व दोनऐवजी तीन हेक्टर अशी वाढीव आहे.

या पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे. लवकर याबाबत विहित नमुन्यात शासनास निधी मागणीचे प्रस्ताव प्राप्त होतील. शासन शेतकऱ्यांच्या प्रति संवेदनशील असून मंत्रिमंडळाने झालेल्या बैठकीत या शेतीपिकांच्या नुकसानीची दखल घेण्यात आली. ऑक्टोबर २०२२ मधील या शेतीपिकांच्या नुकसानीकरितादेखील राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या दुप्पट दराने ३ हेक्टर मर्यादेपर्यंत मदत देण्याचे शासनाकडून आश्वासित करण्यात येत आहे.

## मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन

ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा या योजनेत घ्यावयाची कामे, अंमलबजावणी व इतर निकष सुधारित करण्याबाबत मंत्री मंडळास शिफारस करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात आला. या समितीच्या अध्यक्षस्थानी आदिवासी विकास मंत्री, तर सदस्य म्हणून वन व सांस्कृतिक कार्य मंत्री तसेच बंदरे व खनिकर्म मंत्री असतील. अनुसूचित जमातीच्या वाड्या/पाडे/वस्त्या/समूह यांचा विकास करण्याबाबत या समितीमध्ये चर्चा होईल.

## पोषण मिशनचा चौथा टप्पा

राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशनच्या चौथ्या टप्प्यास मान्यता देण्यात आली. महाराष्ट्रातील एकात्मिक बालविकास सेवा योजनेमधील सर्व ग्रामीण, आदिवासी, शहरी प्रकल्पांतर्गत ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी सन २००५ मध्ये राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन स्थापन झाले होते. त्यानंतर मिशनच्या कार्याची व्याप्ती वाढवून मिशनला दुसरा टप्पा (सन २०११ ते २०१५) व तिसरा टप्पा (सन २०१६ ते २०२०) याप्रमाणे मुदतवाढ देण्यात आली. मिशनमार्फत राबवण्यात येणाऱ्या उपक्रमांकरिताचा खर्च हा युनिसेफकडून मिळणाऱ्या निधीतून होत आहे.



राज्यात राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशन यांनी मागील ३ टप्प्यांमध्ये पोषणाचा दर्जा उंचावण्याबाबत दिलेले योगदान विचारात घेऊन यापुढे देखील पोषणाचा दर्जा सुधारणे, कुपोषणाचे प्रमाण कमी करणे, महिला सक्षमीकरण इ. विविध उपक्रम राबवण्याकरिता राजमाता जिजाऊ माता-बाल आरोग्य व पोषण मिशनच्या चौथ्या टप्प्यास मान्यता देण्यात आली.

## सपन मध्यम प्रकल्पाच्या कामास मान्यता

अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील सपन मध्यम प्रकल्पाच्या ४९५.२९ कोटी रुपये किमतीच्या कामास चौथी सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचा निर्णय घेण्यात आला.

हा प्रकल्प विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर अंतर्गत अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील सपन नदीवर बांधण्यात येत आहे. या प्रकल्पामुळे अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्यातील ३३ व चांदुरबाजार तालुक्यातील २ गावांमधील एकूण ६१३४ हे. हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. प्रकल्पांतर्गत उर्वरित कामे तातडीने पूर्ण करून प्रकल्पाद्वारे अमरावती जिल्ह्यातील अचलपुर व चांदूरबाजार तालुक्यातील एकुण ३५ गावांतील ६१३४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पाचा लाभ कृषी सिंचनासह पिण्यासाठी पाणीपुरवठा करायला होणार आहे.

**– टीम लोकराज्य**

# पेन्शन तुमच्या दारी

**सुधा सुधाकरन / संजीव राव**

> **सरकारी सेवेतून निवृत्त झालेले ज्येष्ठ नागरिक त्यांच्या पेन्शन प्रकरणाची स्थिती जाणून घेण्यासाठी, पेन्शनसाठी लागणारा विलंब टाळण्यासाठी वेळेत पेन्शनधारकाला पेन्शन मिळावी, यासाठी प्रधान महालेखापाल कार्यालयाने एक पाऊल पुढे टाकले आहे.**

### प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) – I, महाराष्ट्र राज्य

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची पेन्शन प्रकरणे/ सामान्य भविष्य निर्वाह निधी, अंतिम परतावा प्रकरणे प्राधिकृत/अंतिमीकरण लेखे संकलित करणे वार्षिक विनियोजन लेखे, वित्तीय लेखे तयार करण्याचे काम प्रधान महालेखापाल कार्यालयाकडून केले जाते. तसेच भारतीय प्रशासकीय सेवा, पोलीस, वन, अखिल भारतीय सेवेतील निवृत्त सरकारी कर्मचाऱ्यांची पेन्शन प्रकरणे, विधानसभा, विधानपरिषदेचे सदस्य, अशासकीय अनुदानित शाळा तसेच महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांची पेन्शन प्रकरणेदेखील कार्यालयाद्वारे प्राधिकृत केली आहेत. ५.१ लाखांहून अधिक चालू पेन्शन आणि १ लाखाहून अधिक कर्मचाऱ्यांचे सामान्य भविष्यनिर्वाह निधी खात्याच्या देखभालीचे काम या कार्यालयाकडून केले जाते.

जया भगत यांच्या निर्देशानुसार प्रधान महालेखापाल कार्यालयाने एक पाऊल पुढे टाकले आहे. यासाठी कार्यालयामार्फत विविध उपक्रम हाती घेतले आहेत. कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या १५ जिल्ह्यांतील (ठाणे, पालघर, पुणे, नाशिक, अहमदनगर, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, सांगली, धुळे, जळगाव, नंदुरबार, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई) तसेच पश्चिम आणि दक्षिण महाराष्ट्रात (पुणे, नाशिक आणि कोकण विभाग कार्यक्षेत्र) यांचा समावेश करण्यात आला आहे.



### 'पेन्शन संवाद' ऑनलाइन उपक्रम

एप्रिल २०२१ पासून पेन्शन संवाद हा ऑनलाइन उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमाद्वारे राज्य निवृत्तिवेतनधारकांपर्यंत सहज पोहोचणे शक्य झाले आहे. या कार्यालयाशी संपर्क साधणे, संवाद साधणे, व्हॉट्सअॅप किंवा झूम व्हिडिओ/व्हॉईस कॉलद्वारे संभाषणात भाग घेण्याची संधी दिली आहे. या उपक्रमामध्ये कार्यालयाचे अधिकारी, राज्य सरकारचे कोषागार अधिकारी, डिडिओ भाग घेऊ शकतात. पेन्शन संवाद हा उपक्रम दर आठवड्याला शुक्रवारी आयोजित केला जाणार आहे. यासाठी निवृत्तिवेतनधारक/ सामान्य भविष्यनिर्वाह निधी सदस्यांना नोंदणी करणे आवश्यक आहे.

निवृत्तिवेतनधारक सदस्यांना संवादासाठी खालील पर्याय दिले आहेत.

- प्रधान महालेखापाल कार्यालयाच्या संकेतस्थळावर पेन्शन संवाद लिंक उपलब्ध आहे. संवादाला उपस्थित राहू इच्छिणाऱ्या पेन्शनधारकांना ऑनलाइन फॉर्म भरता येतो.
- ०२०-७११७७७७५ या दूरध्वनी क्रमांकावर व्हॉईसमेल सेवा उपलब्ध आहे. ही सेवा २४/७ आणि वर्षातील ३६५ दिवस उपलब्ध आहे.
- १८००-२२००-१४ टोल-फ्री क्रमांकावर सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.३० ते सायं ६.०० या वेळेत पेन्शनसंबंधीच्या तक्रारी मांडता येतील.

### पेन्शन : ड्रॉप बॉक्स सेवा

पेन्शनधारकाला वेळेत मदत व्हावी यासाठी ऑनलाइन आणि फिजिकल ड्रॉप बॉक्स सेवा सुरू केली आहे. कार्यालयातील प्राप्त तक्रारींना वेळेवर प्रतिसाद देता यावा, यासाठी ड्रॉप बॉक्स सेवा सुरू केली आहे.

### पीएजी नॉलेज चॅनल व ऑनलाइन हेल्पडेस्क

कार्यालयाच्या संकेतस्थळावर नॉलेज चॅनेल (https://cag.gov.in/ae/mumbai/en) या हेल्पडेस्कवर मराठी, इंग्रजीतील व्हिडिओ, मॉड्युल्स कॅप्सूल लेखासंबंधीची माहिती आहे. या यंत्रणेद्वारे डिडिओ, कोषागार अधिकारी यांच्याकडून पेन्शनधारकांना मार्गदर्शन केले जाईल. राज्य सरकार, निवृत्तिवेतनधारक आणि सामान्य भविष्यनिर्वाह निधी सदस्य यांच्या प्रयत्नामुळे आणि सहभागामुळे हे परिवर्तन शक्य झाले.

(लेखक हे प्रधान महालेखापाल कार्यालय, मुंबई येथे वरिष्ठ लेखाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.)

## मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र

# विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २०२३

कालावधी : ०९ नोव्हेंबर २०२२ ते ०८ डिसेंबर २०२२

## वेळ काढून मतदार यादीत नाव नोंदवू
## देशाच्या लोकशाही व्यवस्थेत सहभागी होऊ



**मतदार** म्हणून नाव नोंदवण्यासाठी **एका वर्षात ४ संधी**

जर तुम्ही २०२३च्या **जानेवारी, एप्रिल, जुलै, ऑक्टोबर** महिन्याच्या **१ तारखेला** किंवा त्याच्या आधी १८ वर्षांचे होणार असाल तर दिनांक ०९.११.२०२२ रोजी सुरू होणाऱ्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत अर्ज क्र. ६ भरून आगाऊ मतदार नोंदणी करू शकता.

### ऑनलाइन मतदार नोंदणीसाठी

**https://nvsp.in, https://voterportal.eci.gov.in या संकेतस्थळांना भेट द्या किंवा Voter Helpline हे मोबाइल ॲप वापरा**

### प्रत्यक्ष मतदार नोंदणीसाठी

**आपल्या जवळच्या मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाला भेट द्या**


मतदार यादी पाहण्यासाठी **ceo.maharashtra.gov.in** अथवा **electoralsearch.in** या संकेतस्थळाला, वोटर हेल्पलाइन या मोबाइल ॲपला किंवा मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाला भेट द्या

**मतदार मदत क्रमांक: १८०० २२ १९५०**

मोबाइल ॲप्स डाऊनलोड करा

Chief Electoral Officer Maharashtra | ceo_maharashtra | CEO_Maharashtra | CEO Maharashtra

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

प्रति / **TO**

**O.I.G.S.** भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य **LOKRAJYA**

***If undelivered, please return to:***

प्रेषक / **From**

**अनिल आलूरकर**
उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक अनिल आलूरकर, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. क्वार्टरफोल्ड प्रिंटेबिलिटीज, प्लॉट क्र. बी-८, तळोजा एमआयडीसी, तळोजा महानगर गॅस, पेंढार फाटा जवळ, नवी मुंबई - ४१० २०८ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक : जयश्री भोज